मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | मुंबई, शनिवार, २८ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ९८ | पाने- ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## Aadhaar आणि PAN चा डेटा लीक करणाऱ्या 3 वेबसाईट ब्लॉक

**नवी दिल्ली :** आधार कार्ड आणि पॅन कार्डचा डेटा लीक करणाऱ्या 3 वेबसाइट्स केंद्र सरकारने ब्लॉक केल्या आहेत. या वेबसाइट्स स्टार हेल्थचा लीक झालेला डेटा आपल्या वेबसाइट्सवर दाखवत असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यानंतर आधार प्राधिकरणाने या वेबसाइट्सविरोधात एफआयआर दाखल केला आहे. अलीकडेच, स्टार हेल्थच्या 3कोटींहून अधिक लोकांचा वैयक्तिक डेटा लीक झाला आहे. स्टार हेल्थने हॅकर, टेलिग्राम आणि त्यात सामील असलेल्या इतरांविरोधात एफआयआरही दाखल केला आहे.



कट करून हसीनांना हटवले: मोहम्मद युनूस यांची कबुली

पान 8

## म ह त्त्वा चे

### दलित समाजाचा मुख्यमंत्री व्हावा, कुमारी सैलजांचा दावा

**चंदीगढ:** हरियाणात पुन्हा सत्तेत येण्यासाठी काँग्रेस सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. तसेच, हरियाणातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसमध्ये अनेक ज्येष्ठ नेते मुख्यमंत्रीपदासाठी दावा करत आहेत. दरम्यान, काँग्रेसमध्ये दलित समाजातून मुख्यमंत्री होऊ शकतो. दलित समाजाचीही ही मागणी आहे. काळानुरूप बदलही होत असतात. राहुल गांधींनाही दलित समाजाला पुढे आणायचे आहे आणि मुख्यमंत्री कोणाला करायचे हा निर्णय हायकमांड घेईल, असे काँग्रेसच्या खासदार कुमारी सैलजा यांनी सांगितले आहे. सिरसाच्या खासदार कुमारी सैलजा यांनी शुक्रवारी कालनवली येथे निवडणूक प्रचार केला. काँग्रेसचे उमेदवार शिशपाल केहरवाला यांच्या समर्थनार्थ कुमारी सैलजा यांची जाहीर सभा झाली. यावेळी कुमारी सैलजा यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, हरियाणात भाजपचा सफाया झाला आहे. काँग्रेस बहुमताने सरकार स्थापन करणार आहे. माझ्या रक्तात काँग्रेस आहे, मी मरेपर्यंत काँग्रेसमध्येच राहणार आहे.

### महाकाल मंदिराजवळ भिंत कोसळली, दोघांचा मृत्यू

**उज्जैन :** उज्जैनमध्ये शुक्रवारी झालेल्या मुसळधार पावसात महाकाल मंदिराच्या गेट क्रमांक चारजवळ भिंत कोसळली. ढिगाऱ्याखाली दबल्याने दोघांचा मृत्यू झाला. त्यात चार जण जखमी झाले आहेत. माहिती मिळताच पोलिस दल आणि बचाव पथक घटनास्थळी पोहोचले. पथकाने जखमींना बाहेर काढून रुग्णालयात नेले. महाराजवाडा शाळेचे नूतनीकरण करून महाकाल फेज 2 चे काम सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. शुक्रवारी सकाळपासूनच येथे ढगाळ वातावरण होते. दुपारी जोरदार पाऊस झाला. ही दुर्घटना झाली तेव्हा मुसळधार पाऊस पडत होता. महाकाल मंदिराचे पुजारी म्हणाले, ही नैसर्गिक आपत्ती आहे महाकाल मंदिराचे पुजारी पंडित आशिष शर्मा यांनी सांगितले की, मुसळधार पावसामुळे भिंत कोसळली. आम्ही चरक हॉस्पिटलमध्ये व्यवस्था करत आहोत. ही नैसर्गिक आपत्ती आहे. पोलिस आणि प्रशासनही घटनास्थळी आहे.

### "माझ्या क्लीन चिटमुळेच चांदीवाल अहवाल दडवला"



**पुणे :** गृहमंत्री असताना मुंबईचे तत्कालीन पोलिस आयुक्त परमवीर सिंग यांनी माझ्यावर 100 कोटी रुपये वसुलीचा आरोप केल्यानंतर या प्रकारणाची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती कैलास चांदीवाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात आला. या संपूर्ण चौकशीनंतर आयोगाने दिलेल्या अहवालात मला क्लीन चिट देण्यात आली. मात्र राज्य सरकारने हा अहवाल मला क्लीन चिट मिळाल्यामुळे जाणीवपूर्वक दडवून ठेवला असल्याचा आरोप माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला आहे. या अहवालासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य सचिव यांना कायदेशीर नोटीस पाठविण्यात आली असून, पुढील दहा दिवसात हा अहवाल सार्वजनिक करावा अन्यथा न्यायालयात जाण्याचा इशारा देशमुख यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिला. यावेळी प्रसिद्ध विधिज्ञ असीम सरोदे उपस्थित होते.

# पंतप्रधान ज्याच्यावर घोटाळ्याचा आरोप करतात त्यालाच उपमुख्यमंत्री करतात!

**केजरीवालांची अजित पवारांवरुन मोदींवर टीका**

## मुश्रीफ, जाधव, सरनाईकांचाही केजरीवालांकडून दिल्ली विधानसभेत उल्लेख

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभेत गुरुवारपासून अधिवेशन सुरू आहे. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत भाषण करताना दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. पंतप्रधान ज्याच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करतात त्याला उपमुख्यमंत्री बनवतात, असा जोरदार टोला केजरीवाल यांनी लगावला आहे.



अशी 25 रत्ने पंतप्रधान मोदींची महान रत्ने आहेत, असेही केजरीवाल पुढे म्हणाले. पुढे तपास यंत्रणांच्या गैरवापराचा मुद्दा उपस्थित करत भाजपला लाज वाटते का? लाल किल्ल्यावर उभे राहून देशाला मूर्ख बनवताना लाज वाटत नाही का? असे सवालही केजरीवाल यांनी केले.

केजरीवाल म्हणाले, मी चार-पाच दिवसांपूर्वी मोहन भागवत यांना पत्र लिहिले होते. त्या पत्रात मी त्यांच्याशी पाच मुद्द्यांवर बोललो होतो. यातील एक मुद्दा म्हणजे पंतप्रधान मोदी ईडी आणि सीबीआयचा धाक दाखवून किंवा पैशाचे आमिष दाखवून देशातील सर्वात भ्रष्ट नेत्यांना त्यांच्या पक्षातून फोडून आपल्या पक्षात आहेत, याला ते (मोहन भागवत) सहमत आहेत का?

अजित पवार यांच्यावर 70 हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप आहे. आम्ही त्यांना तुरुंगात पाठवू, असे 27 जून 2023 रोजी पंतप्रधान म्हणाले. मग पाच दिवसांनंतर 2 जुलै रोजी अजित पवार यांचा त्यांच्याच सरकारमध्ये समावेश करण्यात आला. आणि त्यांना उपमुख्यमंत्री केले. मला त्यांना विचारायचे आहे की तुम्हाला काही लाज वाटते का? तुम्ही तुमच्या परिसरात आणि घरी जाताना कोणता चेहरा दाखवता? असे म्हणत पान 8 वर

# सिनेट निवडणुकीत युवासेनेकडून 'अभाविप'चा धुव्वा

## जिंकल्या दहाच्या दहा जागा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी चर्चेत असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या सिनेटचा निकाल लागला आहे. यामध्ये आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वाखालील युवासेनेने पुन्हा एकदा बाजी मारल्याचं दिसून आलं. आदित्य ठाकरेंच्या युवासेनेने दहाच्या दहा जागा जिंकून भाजपप्रणित आखिल भारतीय विद्यार्थी परिषद म्हणजे ABVP चा धुव्वा उडवला आहे. गेल्या निवडणुकीप्रमाणे यंदाही युवासेनेने सिनेटवरील आपलं वर्चस्व कायम ठेवल्याचं दिसून येतंय.

आदित्य ठाकरेंच्या युवासेनेच्या उमेदवारांनी पाच हजारांच्या वर मतं घेतली. तर त्याचवेळी ABVP च्या उमेदवार हे हजारांच्या आतच गुंडाळल्याचं दिसून आलं. सिनेट निवडणुकीतील





मतमोजणी प्रक्रियेला स्थगिती देण्यास हायकोर्टाने नकार दिला. बोगस पोलिंग एजंट प्रकरणात विद्यापीठ प्रशासन आणि संबंधित उमेदवारला हायकोर्टाकडून नोटीस जारी करण्यात आली आहे. एका ठिकाणच्या गोंधळावरून संपूर्ण निवडणूक प्रक्रियेला स्थगिती देता येणार नाही असं हायकोर्टाने म्हटलं आहे. अभाविपकडून मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवरील सुनावणी तूर्तास तहकूब करण्यात आली आहे. पान 8 वर

### *एकूण 28 उमेदवार रिंगणात*

*मतपत्रिकांची छाननी झाल्यानंतर आणि मतपत्रिका वैध-अवैध ठरवल्यानंतर पसंती क्रमांक नुसार मतमोजणीला सुरुवात झाली. त्यामध्ये 7200 पैकी 6684 मतपत्रिका यावेळी वैध ठरल्या. खुल्या प्रवर्गासाठी साधारणपणे 1114 मतांचा कोटा ठरवण्यात आला.सिनेटच्या निवडणुकीत आदित्य ठाकरेंच्या युवासेनेने दहा जागांवर उमेदवार उभे केले होते. ते भाजपप्रणित आखिल भारतीय विद्यार्थी परिषदेनेही दहा उमेदवार दिले होते.*

# 'लाडकी बहीण' योजनेचा पैसा कुणाच्या बापाचा नाही!

## फडणवीसांनी काढला 'बाप'

**प्रतिनिधी**
**शिर्डी**

'लाडकी बहीण योजने'वरुन सध्या राजकारण तापलं आहे. या योजनेविरोधात विरोधक मत मांडत आहेत, तर ही योजना कशी फायद्याची आहे हे पटवून सांगण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. आता खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योजनेवरुन विरोधकांचा 'बाप' काढला. तर खासदार प्रणिती शिंदे यांनाही प्रत्युत्तर दिलं.

लाडकी बहीण योजनाट बंद पडावी यासाठी काँग्रेसवाल्यांनी कोर्टात धाव घेतली. महाविकास आघाडी सत्तेत आल्यावर महायुतीच्या 'लाडकी बहीण



योजने'सह सर्व योजना रद्द करण्याची भाषा आदित्य ठाकरेंनी केली. तर ही लाचखोर योजना असल्याचं काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या होत्या. मात्र, हा सरकारचा पैसा असून कुणाच्या बापाचा पैसा नाही. त्यामुळं लाचखोर म्हणण्याचा अधिकार नाही, अशा शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांसह खासदार प्रणिती शिंदे यांना सुनावलं. येत्या काळात सावत्र भावांपासून सावध राहण्याचा सल्लाही फडणवीस यांनी महिलांना दिला.

आतापर्यंत 1 कोटी 90 लाख महिलांच्या खात्यावर पैसे पोहोचले आहेत. ऑक्टोंबर महिन्यात राज्यातील 2 कोटी 50 लाख महिलांच्या खात्यावर पैसे जमा होतील. तसंच यापुढंही सर्व योजना तसंच विशेषतः 'लाडकी बहीण योजना' वाढीव पद्धतीने सुरुच ठेवणार असल्याची ग्वाही फडणवीस यांनी दिली.

देवेंद्र फडणवीस हे शुक्रवारी शिर्डीत आले होते. शिर्डीसह जिल्ह्यातील अनेंक विकासकामांचं भूमिपूजन करण्यात आलं. यानंतर देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी साईबाबांच्या मंदिरात जावून साई समाधीचं दर्शन घेतलं. दर्शनानंतर संस्थानच्या वतीनं शाल , साई मूर्ती देवून फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. शिर्डी औद्योगिक वसाहत, शिर्डी थीम पार्क आणि पशुवैद्यकीय महाविद्यालयासह जिल्ह्यातील अन्य विकासात्मक कामाचा भूमिपूजन समारंभ पार पडला.

# भारताने कलम 370 पुन्हा लागू करावं

## संयुक्त राष्ट्राच्या मंचावर शाहबाज शरीफ यांची गरळ

**वृत्तसंस्था**
**संयुक्त राष्ट्रे**

पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी शुक्रवारी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे संयुक्त राष्ट्र महासभेच्या (UNGA) 79 व्या अधिवेशनाला संबोधित केले. शरीफ यांनी आपल्या भाषणात गाझा येथील इस्रायली हल्ल्यावर जोरदार टीका केली. यासोबतच, त्यांनी पुन्हा एकदा काश्मीरबाबत गरळ ओकली. भारत काश्मिरींचे हक्क हिरावून घेत आहे. सरकारने ऑगस्ट 2019 मध्ये काढून घेतलेला काश्मीरचा विशेष दर्जा परत करावा, असे शरीफ म्हणाले.

काश्मीरचा मुद्दा संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या अजेंड्यामध्ये समाविष्ट आहे, त्यामुळे भारतकलम



370 हटवण्यासारखे पाऊल उचलू शकत नाही. भारत काश्मीरची संरचना बदलण्याचा प्रयत्न करत आहे. या भागात बाहेरुन लोकांना आणून वसवले जात आहे. हे थांबले पाहिजे, आम्ही याचा निषेध करतो. भारताने कलम 370 लागू करावे, असेही शरीफ यावेळी म्हणाले. यावेळी शरीफ यांनी दहशतवादी बुरहान वाणीचाही उल्लेख केला.

## बीडमध्ये भयंकर प्रकार

# सासऱ्यांनी प्रेमविवाह केल्याने गावकऱ्यांची सुनेला शिक्षा

**प्रतिनिधी**
**बीड**

बीड जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. जिथे प्रेमविवाह केल्याबद्दल गावकऱ्यांनी एका पुरुषाच्या सुनेला शिक्षा केली आहे. यामुळे खळबळ उडाली आहे. निकाल देताना पंचायतीने सांगितले की, समाजाची परवानगी न घेता प्रेमविवाह केला. त्यामुळे अडीच लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. यासोबतच या कुटुंबाला सात पिढ्यांसाठी समाजातून बहिष्कृत करण्याचे आदेशही देण्यात आले.

पीडित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी 9 जणांवर गुन्हा दाखल केला. ही घटना डोईठाण गावात घडली.महिलेने धाडस दाखवत स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. मालन फुलमाळी नावाच्या महिलेचा सासरा नरसू फुलमाळी याने समाजाची परवानगी न घेता प्रेमविवाह केल्याचे पोलिसांनी सांगितले. ही बाब उघडकीस आल्यानंतर जात पंचायतीने नरसू फुलमाळीला अडीच लाख रुपयांचा दंड ठोठावला. या प्रकरणी कुटुंबाला सात पिढ्यांसाठी समाजातून बहिष्कृत करण्याचे आदेश दिले. याप्रकरणी पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे म्हणाले की, महिलेच्या तक्रारीवरून या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करण्यात येत असल्याचे म्हटले आहे.

# मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरोधात एफआयआर

## *MUDA प्रकरणात पोलिसांची कारवाई*

**प्रतिनिधी**
**बंगळूरू**

कर्नाटक लोकायुक्त पोलिसांनी म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट अथॉरिटी (MUDA) प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरोधात एफआयआर नोंदवला आहे. सूत्रांनी सांगितले की, लोकायुक्त पोलिसांनी MUDA प्रकरणात सिद्धरामय्या आणि इतरांविरुद्ध एफआयआर नोंदवला आहे.

याचिकाकर्ते स्नेहमोयी कृष्णा यांच्या याचिकेवर निर्णय देताना न्यायालयाने मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले होते. आपल्या निर्णयात न्यायालयाने कर्नाटक



लोकायुक्तांना या प्रकरणाची चौकशी करून तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतर आज म्हैसूर लोकायुक्त पोलिसांनी मुख्यमंत्र्यांविरोधात गुन्हा दाखल केला.

या प्रकरणात मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना आरोपी क्रमांक एक, तर त्यांची पत्नी पार्वती यांना आरोपी क्रमांक दोन बवण्यात आले आले आहे. तर मुख्यमंत्र्यांचे मेहुणे मल्लिकार्जुन स्वामी यांना आरोपी क्रमांक तीन आणि देवराज यांना आरोपी क्रमांक चार बनवण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी आपल्या अधिकारांचा गैरवापर करून त्यांनी आपल्या पत्नीच्या नावाने म्हैसूरमधील MUDA ची जागा वाटप केल्याचा आरोप आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दावा केला की, MUDA जमीन वाटप प्रकरणात आम्हाल टार्गेट केले जात आहे.

# महिला पोलिसाला पोलीस ठाण्यातच ठार मारण्याचा प्रयत्न

**प्रतिनिधी**
**उल्हासनगर**

उल्हासनगरमधील विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेल्या एका महिला पोलिसाला पोलीस ठाण्यातील एका कक्षात कोंडून ठेऊन एका माथेफिरू हल्लेखोराने या महिला पोलिसावर धारदार पातेने हल्ला करून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. या घटनेने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. शितल भगवंत बांबळे (32) असे गंभीर जखमी महिला पोलिसाचे नाव आहे. त्या विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असतात. बाबासाहेब जंगलु सोनवणे (42, रा. भीम कॉलनी, उल्हासनगर कॅम्प 4) असे हल्लेखोराचे नाव आहे.

## उल्हासनगरमध्ये खळबळ


पोलिसांनी सांगितले, महिला पोलीस शितल बांबळे बुधवारी रात्रीपाळीसाठी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर होत्या. त्यांचे कर्तव्य गुरुवार सकाळपर्यंत होते. गुरुवारी सकाळी हवालदार बांबळे पोलीस ठाण्यात असताना पोलीस ठाण्यात स्वतावर धारदार पातेने वार करून रक्तबंबाळ अवस्थेत आरोपी बाबासाहेब सोनवणे आला. तो संतप्त झाला होता. अर्वाच्च बोलत होता. हवालदार बांबळे यांनी आरोपी बाबासाहेब सोनवणे याला बसण्यास सांगितले. त्याला तातडीने वैद्यकीय उपचारासाठी शासकीय रुग्णालयात जाण्यासाठीची कागदोपत्रांची तयारी त्या करत होत्या. यावेळी संतप्त असलेल्या बाबासाहेबाला त्या शांत राहण्यासाठी समजवत होत्या. पोलीस ठाण्यातील आर. टी. पी. सी. कक्षात हा प्रकार सुरू होता. या कक्षात आपल्या खुर्चीवर हवालदार बांबळे बसल्या होत्या. बांबळे यांना काही कळण्याच्या आत हल्लेखोर बाबासाहेब सोनवणे याने त्या कक्षाचा दरवाजा बंद करून घेतला. बेफाम झालेल्या हल्लेखोर बाबासाहेबाने पान 8 वर

# कोकणी बळीराजासाठी खुश खबर : काजू बोंडूपासून सोडा निर्मितीचे तंत्रज्ञान

## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन

**प्रतिनिधी**
**वेंगुर्ले**

काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीचा विचार करून कोकणातील वाया जाणाऱ्या काजू बोंडूपासून काजू सोडा तयार करण्याचे तंत्रज्ञान डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ अंतर्गत प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले येथे विकसित करण्यात आले आहे.



भारत हा काजूचा उत्पादक, उपभोक्ता व जगातील काजू निर्यात क्षमता असलेला देश आहे. महाराष्ट्रात काजू पिकाखाली एकूण 1.91 लाख हेक्टर क्षेत्र असून काजू बीचे उत्पादन 1.97 लाख मेट्रीक टन आहे. महाराष्ट्राची उत्पादकता 1145 किलो प्रति हेक्टर आहे. काजू उत्पादकांनी मुख्यत्वे काजू बीच्या गुणवत्तेकडे व अधिक उत्पादनाकडे लक्ष केंद्रीत केले आहे. काजू बोंडूचे उत्पादन हे वाया जाते. काजू बोंडूचे उत्पादन हे काजू बीच्या उत्पादनापेक्षा सुमारे 6 ते 8 पट अधिक आहे.

परंतू, काजू बोंडू अल्पावधीत खराब होत असल्यामुळे 90 टक्के काजू बोंडू वाया जात आहे. काजू बोंडूला आरोग्याच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे. काजू बोंडू पोषक असून शर्करा, खनिजे व जीवनसत्वे यांचा बहुमुल्य स्त्रोत आहे. काजू बोंडूमधील नैसर्गिकरित्या उपलब्ध क जीवनसत्वाचा वापर करून मानवी शरीराचे पोषण करण्यास मदत होवू शकते. काजू बोंडू मधील रसामध्ये 'क' जीवनसत्वाचे प्रमाण हे सुमारे 260 मि. ग्रॅम/100ग्रॅम रस म्हणजेच संत्र्यासारख्या फळांच्या तुलनेत सहा पटीने अधिक आहे.

काजू बोंडूला आरोग्याच्या दृष्टीने त्यातील जीवनसत्व व खनिज पदार्थामुळे संरक्षणात्मक अन्न म्हणून विशेष महत्त्व दिले आहे. ते नाशवंत असून पाण्याच्या अधिक प्रमाणामुळे परिपक्व बोंडाच्या काढणीनंतर अल्पावधीत खराब होण्यास सुरू होते. म्हणूनच वाया जाणाऱ्या काजू बोंडाचा व्यावसायिक पातळीवर वापर करून त्यापासून काजू सोडासारखा मुल्यवर्धित प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करून त्याचा मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार करणे आवश्यक होते.

या सर्व बाबींचा आणि काजू उत्पादक शेतकऱ्याच्या उत्पन्नवाढीचा विचार करून कोकणातील वाया जाणाऱ्या काजू बोंडूपासून काजू सोडा तयार करण्याचे तंत्रज्ञान डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ अंतर्गत प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले येथे विकसित पान 8 वर

# दिवटा आमदार...

## *अजित पवारांच्या 'ड्रंक अँन्ड रन...' फेम आमदारावर शरद पवारांची कठोर टीका*

**प्रतिनिधी**
**पुणे**

पुण्यातील कल्याणीनगर परिसरात 19 मे रोजी भीषण अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला. ड्रंक अँन्ड रन प्रकरणी अल्पवयीन मुलाला अटकही करण्यात आली. परंतु, या प्रकरणात अल्पवयीन चालकाला वाचवण्याचा प्रयत्न वडगाव शेरीचे आमदार सुनील टिंगरे यांनी केल्याचा आरोप शरद पवार यांनी केला आहे. सुनील टिंगरे यांचे विरोधक बापूसाहेब पठारे यांनी शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला. या पक्षप्रवेशावेळी शरद पवार पुण्यातील खराडी येथे बोलत होते.

शरद पवार म्हणाले, "सुनील टिंगरे तू कुणाच्या पक्षातून निवडून आलास? हा पक्ष कोणी काढला सगळ्या हिंदुस्थानला माहितीय. त्या पक्षाच्या वतीने तुला संधी दिली. तू सोडून गेला ते ठिकाय. निवडणुकीत तुझा कसा बंदोबस्त करायचा ते करू, दोन तरुण मुलांना त्यांनी उडवलं काय, जागच्या जागी त्यांची हत्या काय होते, अशा वेळेला जे जखमी झाले त्यांना मदत करण्याऐवजी हा दिवट्या आमदार पोलीस ठाण्यात जातो आणि



चालकाला वाचवतो. यासाठी मते मागितली होती? मतं राष्ट्रवादीच्या नावाने मागितली. शरद पवारांच्या नावाने मतं मागितली. आणि लोकांनी श्रद्धेने मतदान केलं. त्याचं उत्तरदायित्व या पद्धतीने केलं."

पवार सुरुवातीलाच म्हणाले, पुण्याचं वैशिष्ट्य काय तर कोयता गँग. पुण्याची ओळख बजाजचा कारखाना हे पुण्याचं वैशिष्ट्यं होतं, किर्लोस्करांचा कारखाना पुण्याचं वैशिष्ट्यं होतं, पुणे विद्येचे माहेरघर होतं आणि आता कोयता गँग हे पुण्याचं वैशिष्ट्य झालंय, हे दुर्दैव आहे.

# कर्मवीर विद्यालयात म्हात्रे बाबांची 105 वी जयंती साजरी

**वसई :** रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय आणि एस. पी. ज्युनियर कॉलेज, जूचंद्र येथे 27 सप्टेंबर रोजी शिक्षणप्रेमी आणि थोर देणगीदार गोपीनाथ कृष्णाजी म्हात्रे उर्फ म्हात्रे बाबा यांची 105 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात म्हात्रे बाबा व गावडे बाबा यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्प अर्पण करून करण्यात आली. स्वागत गीत आणि रयत गीताने वातावरण भारावून गेले. पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रदीप पाटील यांनी करून दिला. या सोहळ्यात गोपीनाथ म्हात्रे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांचे ज्येष्ठ पुत्र विवेकानंद म्हात्रे आणि स्थानिक सल्लागार समिती सदस्य जितेंद्र भोईर यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यालयाचे प्राचार्य जगताप व्ही. यू. आणि ज्युनियर कॉलेजचे प्राध्यापक म्हस्के एम. ए. यांनी देखील म्हात्रे बाबांच्या कार्याचा गौरव केला. विद्यार्थ्यांनीही भाषणांद्वारे म्हात्रे बाबांच्या जीवनाचा आढावा घेतला. कार्यक्रमात म्हात्रे कुटुंबीयांनी प्राचार्य जगताप व्ही. यू. यांचा सत्कार केला, त्यांची रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाच्या सहाय्यक विभागीय अधिकारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल. त्याचबरोबर राष्ट्रीय स्तरावरील चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल ज्येष्ठ शिक्षक एस. व्ही. म्हात्रे यांचा देखील सन्मान करण्यात आला.



## थोडक्यात

### वसईतील खाणीत बुडून दोन अल्पवयीन मुलांचा मृत्यू

**वसई:** वसईच्या नवजीवन परिसरातील खदानीत बुडून दोन अल्पवयीन मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या खाणीत आधीच 50 हून अधिक जणांचा मृत्यू झालेला असतानाही संबंधित प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.गुरुवारी दुपारी नवजीवन येथील उघड्या खाणीमध्ये धानिव बागच्या प्रल्हाद चाळीत राहणारे 13 वर्षीय नसीम चौधरी आणि 14 वर्षीय सोपान चव्हाण आंघोळीसाठी गेले होते. पाण्याची खोली माहीत नसल्याने ते बुडाले. त्यांच्या पालकांनी आणि स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतीसाठी धाव घेतली आणि मुलांना खदानीतून बाहेर काढले. त्यानंतर बेशुद्ध अवस्थेत असलेल्या मुलांना प्लॅटिनम हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, पण डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची नोंद वालीव पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यू म्हणून करण्यात आली आहे.

### गोखिवरेतील वनपाल व वनरक्षकाला लाचप्रकरणी अटक

**वसई:** पालघर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी रात्री सापळा रचून गोखिवरे रेंजच्या वन कार्यालयातील वाघराळ बिटच्या दोन अधिकाऱ्यांना १ लाख ३० हजार रुपयांची लाच घेताना अटक केली आहे. अटकेत असलेले वनरक्षक पन्नालाल बेलदार (३५) आणि वनपाल पंकज सनेर (४५) यांच्याविरुद्ध वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असलेल्या त्यांच्या चाळीतील दरवाजे वन विभागाच्या हद्दीत येत असल्याच्या कारणावरून आरोपींनी कारवाई करण्याची धमकी देत प्रत्येक रूममागे 80 हजार रुपये याप्रमाणे तीन रूमचे 2 लाख 40 हजार लाचेची मागणी केली. तडजोडीनंतर ३ खोल्यांसाठी एकूण १ लाख ३० हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती.

### वांद्रे येथील व्यावसायिकाची 6 कोटींची फसवणूक

**मुंबई :** कंपनीच्या पावत्यांमध्ये फेरफार करून वांद्रे येथील व्यावसायिकाची सहा कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली सनदी लेखापालासह तिघांविरोधात मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी व्यावसायिकाने कंपनीच्या व्यवहारांचे लेखापरीक्षण केले होते. त्यात हा संपूर्ण प्रकार उघड झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. उर्वरित दोन आरोपी तक्रारदाराचे भागिदार असून कर्नाटकातील रहिवासी आहेत. तक्रारदार गुरुदत्त कामथ (५२) सुगंधी तेलाचे व्यापारी आहेत. त्यांची महामाया फ्रेग्रेन्स नावाची कंपनी आहे.

# पावसाळा पूर्व कामात कसूर; वीज समस्यांनी वसईकरांचे जनजीवन विस्कळीत

## महावितरणच्या निष्काळजीपणामुळे नागरिक संतप्त

**प्रतिनिधी**
**■ वसई**

परतीच्या पावसासोबत येणाऱ्या वाऱ्यामुळे आणि विजेच्या कडकडाटामुळे वसई तालुक्यातील ग्रामीण भागातील वीज यंत्रणेवर मोठा ताण पडत आहे. सततच्या तांत्रिक बिघाडांमुळे वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिक प्रचंड नाराज आहेत. महावितरणच्या कामातील हलगर्जीपणामुळे ऐन पावसाळ्यात वीज समस्यांनी वसईकरांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

पावसाळ्यापूर्वीच वीज यंत्रणेत दुरुस्तीचे काम व्यवस्थित व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून असते. मात्र, महावितरणचे कर्मचारी आणि अधिकारी याकडे दुर्लक्ष करतात. यामुळे पावसाळ्यात अनेक भागांमध्ये विजेचा लपंडाव सुरूच असतो. तक्रारी करूनही पारोळ वीज उपकेंद्राचे कर्मचारी त्यांची योग्य दखल घेत नाहीत, असे आरोप स्थानिक रहिवाशांनी केले आहेत. पावसाळ्यात वीज तारा तुटणे, पोलांवर कार्बन जमा होणे, ट्रान्सफॉर्मर जळणे असे प्रकार वाढत असल्याने अनेक भागांत तासन्तास वीजपुरवठा खंडित होत आहे.





परतीच्या पावसामुळे नुकतेच तालुक्यातील अनेक भागात वीज यंत्रणेवर ताण पडून पिन इन्सुलेटर फुटणे, जम्पर तुटणे, फिडर फॉल्ट होणे आणि कंडक्टर तुटण्याचे प्रकार घडले आहेत. वारंवार होणाऱ्या या बिघाडांमुळे नागरिकांची गैरसोय होत असून, महावितरणच्या निष्काळजीपणामुळे संतापाची लाट उसळली आहे. वसई तालुक्यातील बहुतांश ग्रामीण भागातील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांनी महावितरणच्या कामगिरीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

महावितरणकडून पावसाळ्यापूर्वी वीज यंत्रणेची योग्य देखभाल आणि दुरुस्ती न झाल्यामुळेच नागरिकांना हा त्रास सहन करावा लागत आहे. वसईतील रहिवासी सततच्या वीजपुरवठा खंडित होण्याने त्रस्त झाले असून त्वरित उपाययोजना होण्याची मागणी करत आहेत.

# जागतिक रेबीज दिनानिमित्ताने आज पासून मुंबईत भटक्या श्वानांचे अँटी रेबीज लसीकरण



**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

जागतिक रेबीज दिनाच्या निमित्ताने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आज २८ सप्टेंबर २०२४ पासून संपूर्ण मुंबई महानगरातील भटक्या श्वानांचे अँटी रेबीज लसीकरण करण्याच्या मोहिमेला सुरुवात होणार आहे. महानगरपालिकेच्या सर्व प्रशासकीय विभागांमध्ये (वॉर्ड) या लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. लसीकरण झालेल्या श्वानांसंबंधीत माहिती नोंदवण्यासाठी यंदा ऑनलाइन ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. या ऑनलाइन ॲप्लिकेशनमध्ये संबंधित श्वानासंबंधीत आकडेवारी छायाचित्रासह उपलब्ध असेल.

प्राणी कल्याण करणे व त्यासोबतच प्राण्यांपासून मानवामध्ये होणारे संक्रमण टाळण्यासाठी पालिकेतर्फे विविध उपक्रम राबविले जात आहेत. श्वानांच्या चाव्यामुळे होणाऱ्या रेबीज या प्राणघातक रोगापासून बचाव तसेच 'रेबिजमुक्त मुंबई' करण्याच्या उद्देशाने संपूर्ण मुंबई महानगरामध्ये अँटी रेबीज लसीकरण हा आणखी एक उपक्रम हाती घेण्यात आला आहे. श्वानांच्या चाव्यामुळे होणाऱ्या रेबीज या प्राणघातक रोगासंदर्भात जनजागृती व्हावी, या उद्देशाने जागतिक आरोग्य संघटनेच्या वतीने दरवर्षी आज २८ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय रेबीज दिनाचे आयोजन केले जाते. 'रेबीजचे सीमोल्लंघन' (ब्रेकिंग रेबीज बॉर्डर्स) ही यंदाच्या आंतरराष्ट्रीय रेबीज दिनाची संकल्पना आहे. याच पार्श्वभूमीवर, पालिकेच्या पशुवैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने यूथ ऑर्गनायझेशन इन डिफेन्स ऑफ ॲनिमल्स, यूनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी आणि उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन या संघटनांच्या सहकार्याने अँटी रेबीज लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे. आजपासून या लसीकरण मोहिमेस सुरुवात होऊन सर्व भटक्या श्वानांचे लसीकरण पूर्ण होईपर्यंत (साधारणपणे मार्च २०२५ पर्यंत) ती सुरू राहणार आहे. २०१४ च्या आकडेवारीनुसार, मुंबई महानगरात सुमारे ८७ हजार भटके श्वान आहेत.

# पोलिसांविरोधात याचिका करणारे असीम सरोदे उबाठाचे निकटवर्तीय - डॉ. कायंदे

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

बदलापूरसारख्या संवेदनशील प्रकरणी पोलिसांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करणारे वकील असीम सरोदे उबाठाचे निकटवर्तीय असून ते सिलेक्टिव्ह ॲक्टिव्हीझम करत आहेत, अशी टीका शिवसेना प्रवक्त्या डॉ. मनीषा कायंदे यांनी काल पत्रकार परिषदेत केली. चिमुरड्यांवर अत्याचार करणाऱ्या नराधम अक्षय शिंदेचा वकील सरोदे यांना एवढा पुळका का आला, असा सवाल त्यांनी यावेळी केला. सरोदे पेशाने वकील आहेत. त्यांना याचिका दाखल करण्याचा पूर्ण अधिकार आहे मात्र त्यांनी पोलिसांच्या विरोधात दाखल केलेल्या याचिकेवर आमचा तीव्र आक्षेप आहे. त्यामुळे वकील असीम सरोदे एखाद्या राजकीय पक्षाचा अजेंडा चालवत आहेत का, अशी शंका डॉ. कायंदे यांनी व्यक्त केली.

मागील काही महिन्यांचा घटनाक्रम बघितला तर असीम सरोदे ठराविक राजकीय पक्षांना फायदा होईल, अशीच भूमिका घेत आहेत. उद्धव ठाकरेंशी सरोदे यांची भेट, ठाकरे कुटुंब आणि असीम सरोदे यांच्या भेटीचे फोटो सोशल मिडियावर आहेत. हेच वकील असीम सरोदे हे काही महिन्यांपूर्वी उबाठाच्या मंचावर बोलताना दिसले होते. सरोदे आणि ठाकरे यांच्या भेटीगाठींवरुन सरोदे उबाठाच्या सांगण्यावरुन याचिका दाखल करतात का असा खरमरीत सवाल डॉ. कायंदे यांनी विचारला.

बदलापूर प्रकरण घडलं तेव्हा उत्स्फूर्तपणे जनआंदोलन झाले होते. तेव्हा विरोधकांनी आरोपीला ताबडतोब फाशी द्या, अशी मागणी केली होती. याबाबत खटला सुरु होता. मात्र रिमांडमध्ये असताना आरोपीने पोलिसांवर गोळीबार केला आणि स्वसंरक्षणासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त करत वकील असीम सरोदे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. कोर्टात जाण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे मात्र वकील सरोदे यांचा पोलिसांबाबत घेतलेल्या भूमिकेवर संशय निर्माण होतो, असे डॉ. कायंदे म्हणाल्या.

# बंदर व गोदी कामगारांना भरघोस पगारवाढीचा करार संपन्न

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**



भारतातील प्रमुख बंदरामधील बंदर व गोदी कामगारांना १ जानेवारी २०२२ पासून लागू होणारा भरघोस पगारवाढीचा वेतन करार २७ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबईत संपन्न झाला. इंडियन पोर्ट असोसिएशन व सहा मान्यताप्राप्त कामगार महासंघ यांच्यामध्ये २७ ऑगस्ट २०२४ रोजी दिल्लीमध्ये समझोता वेतन करार संपन्न झाला होता. त्यानंतर इंडियन पोर्ट असोसिएशनचे व्यवस्थापकीय संचालक विकास नरवाल यांनी शुक्रवारी द्विपक्षीय वेतन समितीची बैठक बोलवली होती. या बैठकीत सर्व बंदरांचे चेअरमन व सहा फेडरेशनचे कामगार नेते यांना अंतिम वेतन करारासाठी मुंबईत निमंत्रित केले होते. दिल्लीत झालेल्या समझोता वेतन करारानुसार मुंबईत द्विपक्षीय वेतन समितीचे अध्यक्ष मुंबई पोर्ट ट्रस्ट चे राजीव जलोटा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत प्रदीर्घ चर्चेनंतर बंदर व गोदी कामगारांना १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२६ असा ५ वर्षाचा भरघोस पगारवाढीचा वेतन करार संपन्न झाला.

या वेतन करारानुसार ३१ डिसेंबर २०२१ च्या मूळ पगारात १ जानेवारी २०२२ चा ३०% महागाई भत्ता विलीन करून त्यावर ८.५० टक्के फिटमेंट दिले जाणार आहे. घरभाडे भत्ता ३० टक्के मिळेल. नोकरीत असलेल्या कामगारांना प्रति महिना ५००/ रुपये विशेष भत्ता मिळेल. वार्षिक पगारवाढ ३ टक्के मिळेल. १ जानेवारी २०२२ पासून सध्याच्या प्रथेनुसार प्रभावी वेतनश्रेणी तयार केल्या जातील. या वेतन करारानुसार पोर्ट वसाहतीमध्ये राहणाऱ्या कामगारांना कमीत कमी २८३०/ रूपये व जास्तीत जास्त १३५९०/ रूपये तर वसाहतीत न राहणाऱ्या कामगारांना कमीत कमी ५४१०/ रूपये व जास्तीत जास्त २५५००/ रुपये अशी भरघोस पगारवाढ मिळेल.

निवृत्त झालेल्या कामगारांच्या निवृत्ती वेतनात ०१/०१/२०२२ पासून कमीत कमी ११६५/ रुपये तर जास्तीत जास्त ६५४५/ रुपये वाढ होणार आहे. महासंघाच्या नेत्यांनी केंद्रीय नौकानयन मंत्री मा.श्री.सर्वानंद सोनोवाल, शिपिंग सचिव टी. के. रामचंद्रन,इंडियन पोर्ट असोसिएशनचे चेअरमन राजीव जलोटा, व्यवस्थापकीय सचिव श्री. विकास नरवाल यांचे आभार मानले.

मुंबईत झालेल्या अंतिम वेतन करारावर व्यवस्थापनाच्या वतीने इंडियन पोर्ट असोसिएशनचे चेअरमन राजीव जलोटा, व्यवस्थापकीय सचिव विकास नरवाल, प्रादेशिक श्रम आयुक्त (केंद्रीय) सुनील माळी तर कामगारांच्या वतीने ऑल इंडिया पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन ( वर्कर्स ) चे (HMS) ॲड.एस. के. शेट्ये, सुधाकर अपराज, विद्याधर राणे, ऑल इंडिया पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशनचे(HMS) मोहम्मद हनीफ, केरसी पारेख, डी. के. शर्मा, जी.एम.कृष्णमूर्ती, एल. सत्य नारायणन, वॉटर ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडरेशन ऑफ इंडियाचे( CITU) नरेंद्र राव, सी.डी. नंदकुमार यांनी सह्या केल्या आहेत.

# अपुरा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल, पालिका अधिकाऱ्यांचे खासदारांना आश्वासन

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

भांडुप, अप्पर खिंडीपाडा या ठिकाणी गेल्या काही दिवसांपासून अपूरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक त्रस्त झाले होते. याबाबत स्थानिक नागरिकांनी ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांच्याकडे तक्रार केल्यावर या भागाची मनपा अधिका-यांमार्फत पाहणी करण्यात आली. अपुरा पाणीपुरवठा लवकरच सुरळीत करण्यात येईल असे आश्वासन पालिका अधिका-यांनी यावेळी दिले.



भांडुप पश्चिम येथील अप्पर खिंडीपाडा परिसरात गेल्या काही दिवसांपासून सततचा अपुरा पाणीपुरवठा होत होता. याबाबत अनेकदा तक्रार करुनही पालिकेचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत होते. याबाबत खासदार संजय दिना पाटील यांच्याकडे तक्रार केल्यावर पालिका अधिका-यांना जाग आली.

तात्काळ त्यांनी शिवसेनेचे आमदार रमेश कोरेगावकर, युवासेना कार्यकारणी सदस्या राजोल संजय पाटील, माजी नगरसेविका दिपाली गोसावी यांच्यासह खिंडीपाडा भागाला भेट दिली. पुर्व उपनगर जलविभागाचे कार्यकारी अभियंता जेजे पाटील, बांधकाम जलविभागाचे सहाय्यक अभियंता फाटक, आशिष धुमाळ यांनी स्थानिक नागरिकांशी चर्चा करुन अपुरा पाणीपुरवठा लवकरच सुरळीत करण्यात येईल असे आश्वासन खासदार संजय दिना पाटील, आमदार रमेश कोरगावकर व राजोल पाटील यांना दिले.


## वार्षिक सर्वसाधारण सभेचे नोटीस

सर्व सभासदांना कळविण्यात येते की "शक्ति एसआरए को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. या संस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ठिक ६.०० वाजता "आनंद-मंगल हॉल", प्लॉट नं.१५०, गव्हर्मेंट इंडस्ट्रियल इस्टेट, चारकोप, कांदिवली (प), मुंबई-४०००६७ येथे आयोजित केली आहे. तरी आपण वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

**शक्ति एसआरए को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. करिता**
**सही/-**
**मा. सेक्रेटरी**
**ठिकाण- मुंबई**
**दि. २८/०९/२०२४**

## हरवले / सापडले

श्री कृष्णा को. ऑप. हा. सो. लिमिटेड. छेडा नगर, नालासोपारा पश्चिम. श्री. अभिजित बिठोबा चौगुले आमच्या वरील कॉम्प्लेक्स मधील बी /३०२ कृष्णा ज्योत सोसायटी चे २०१० पासून सभासद आहेत. त्यांचे शेअर सर्टिफिकेट गहाळ झाले आहे तरी कोणाला सापडल्यास सोसायटीशी पुढील १५ दिवसात संपर्क साधावा. दूरध्वनी - ७०५८३३३८३०


## महाराष्ट्र शासन

**उपनिबंधक सहकारी संस्था, वसई यांचे समोर**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये सुनावणी नोटिस**

सत्यमेव जयते

### जाहीर नोटिस

जा.क्र. उपनी/वसई/बी-३/पत/क्र. १०१/नोटिस/३८२३/२०२४
**कार्यालय :** उपनिबंधक सहकारी संस्था, वसई-पश्चिम
तामतलाव, जॉनी क्रॉस लेन, तालुका- वसई
जिल्हा - पालघर, पिन नं. ४०१ २०७ दि. २६/९/२०२४

या नोटिसीद्वारे खालील नमूद केलेल्या व्यक्तीस कळविण्यात येते की जैमुनी सहकारी पतसंस्था मर्यादित, सामवेद भवन, पहिला माळा, जिल्हा परिषद शाळेजवळ, उमराळे, पोस्ट- सोपारा, नालासोपारा पश्चिम, तालुका-वसई, जिल्हा पालघर यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अंतर्गत वसुली दाखला मिळणे करिता दाखल केलेल्या अर्जानुसार आपणास यापूर्वी दिनांक २३/०७/२०२४ व ०५/०९/२०२४ रोजीच्या सुनावणीसाठी काढलेल्या नोटीसा पाठवूनही आपण सदर सुनावणीस गैरहजर राहिलात. सदर प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक १७ / १० / २०२४ रोजी सकाळी ११.३० वजाता या कार्यालयात ठेवण्यात आलेली आहे.

तरी उक्त दिवशी व वेळी आपण सुनावणीस उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा सदर बाबत आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून सदर प्रकरणी कायद्यातील तरतुदीनुसार उचित निर्णय देण्यात येईल याची नोंद घ्यावी

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव व पत्ता | जामीनदाराचे नाव व पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | महेंद्र अनंत धोंडे दत्तात्रेय अपार्टमेंट, ए २०३ बोळींज नाका, बोळींज, पोस्ट-विरार | सतीश रमेश गुप्ता : ए १०१, दत्तात्रेय अपार्टमेंट, बोळींज सुभाष किसन काटे :- बी-३०१, कृष्ण रासलीला, एब्रोल, बोळींज. | ६८७५२.०० |
| २ | वैभवी सुरेश नाईक :- बोळींज भिरीम आळी, पोस्ट-विरार | प्रतीक सुरेश नाईक :- बोळींज भिरीम आळी, पोस्ट-विरार, योगेश गजानन वझे बोळींज वझे आळी, पोस्ट-विरार | १,०१,७४४.०० |
| ३ | पंकज केशव पाटील - मर्देस-माणपे, पोस्ट- निर्मळ | अमोल मनोहर पाटील :- भुईगाव जापआळी, पोस्ट-वसई, तीर्थराज विश्वनाथ पाटील :- मर्देस-माणपे, पोस्ट-निर्मळ | ४,०९,७०३.०० |
| ४ | विपुल प्रभाकर नाईक वाघोली-भादाळे तलाव, पोस्ट- निर्मळ | निलेश मधुकर नाईक :- वाघोली फुलारे आळी, पोस्ट-निर्मळ, विलास गणपत नाईक वाघोली- वावळी आळी, पोस्ट-निर्मळ | २३,९४,५०८.०० |
| ५ | गीतांजली कल्पेश नाईक :- वाघोली- पंचाळ आळी, पो-निर्मळ | रूपाली मनोज नाईक :- वाघोली-पोंडे आळी, पोस्ट-निर्मळ, अनुप सुरेश नाईक :- उमराळे - गुरुडे, पोस्ट-सोपारा | २,६१,३५१.०० |
| ६ | कमळाकर नारायण नाईक- उमराळे - गुरुडे, पोस्ट-सोपारा | प्रशांत हरेश्वर नाईक :- उमराळे-गुरुडे, पोस्ट-सोपारा अक्षय कमळाकर नाईक उमराळे गुरुडे, पोस्ट-सोपारा | ९०,८२८.०० |
| ७ | कै- धवल मुकुंद पाटील- उमराळे-पाटील आळी, वारसदार प्रमीला मुकुंद पाटील व नमिता धवल पाटील | अमोल अनंत पाटील :- उमराळे-पाटील आळी, पोस्ट-सोपारा, राहुल अनंत पाटील :- उमराळे-पाटील आळी, पोस्ट-सोपारा | २,६१,३५१.०० |
| ८ | रोहित पंढरीनाथ नाईक - आगाशी-सोमाडी, पोस्ट- आगाशी | शार्गी काशीनाथ नाईक आगाशी सोमाडी, पोस्ट-अगाशी हार्दिक कृष्णा नाईक आगाशी सोमाडी, पोस्ट- अगाशी | ४,३५,८७९.०० |
| ९ | दीप्ती सचिन पाटील उमराळे-पाटील आळी | चिन्मय रमेश नाईक :- बोळींज-भिरीम आळी, पोस्ट-विरार चिराग कमळाकर नाईक : बोळींज खवणे आळी, पोस्ट-विरार | ५,०८,२८०.०० |
| १० | चित्रा सुरेश पाटील - बोळींज, पाटील आळी | नेहा सुरेश पाटील :- बोळींज पाटील आळी, पोस्ट - विरार बाळकृष्ण दाजी पाटील : बोळींज पाटील आळी, पोस्ट-विरार | १,२०,७०७.०० |
| ११ | सुरेश पांडुरंग पाटील :- बोळींज पाटील आळी, पोस्ट-विरार | नेहा सुरेश पाटील :- बोळींज पाटील आळी, पोस्ट-विरार, कुंजन प्रकाश म्हात्रे गास, पोस्ट-सोपारा | ५,९२,०४६.०० |

सदरची नोटिस आज दिनांक २६/०९/२०२४ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह दिली आहे.

**दिनांक :- २६/०९/२०२४**
**ठिकाण :- वसई**


## महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.


### जाहीर सूचना

सूचना ह्याद्वारे सर्व जनतेला देण्यात येत आहे की आमच्या अशिलांच्या सूचनेच्या अनुसार आम्ही येथे खालील पहिल्या अनुसूचीमध्ये वर्णन करण्यात आलेल्या जागेमधील (जागा) राहुल अशोक परुळेकर आणि मिनोह्ती अशोक परुळेकर ("मालक") ह्यांचे हक्क, स्वारस्य आणि नामनिर्देश तपासत आहोत.

आम्हाला असे कळविण्यात आले आहे की येथे खालील दुसऱ्या अनुसूचीमध्ये अधिक विस्ताराने वर्णन करण्यात आलेली मूळ करार ("मूळ करार") अनावधानाने हरवली/ गहाळ झाली आहेत.

कोणत्याही कारणास्तव मूळ कराराचा ताबा किंवा ताबा असलेली कोणतीही संस्था किंवा बँक किंवा वित्तीय संस्थांसह कोणतीही व्यक्तीने, येथे निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या कार्यालय क्रमांक टी २, तिसरा मजला, मशिनरी हाऊस, बी. भरुचा मार्ग, काळाघोडा, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३ येथे समर्थनार्थ असलेल्या कागदपत्रांसह प्रकाशित झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत कळविणे.

**उपरोक्त संदर्भात पहिली अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

कुलाबा विभागामधील लँड मिल इस्टेट, कुलाबा, मुंबई ४०००१५ येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला कॅडस्ट्रल सर्वे क्र. ५१७ वर उभ्या असलेल्या फेरेना म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या तळ मजल्यावरील ४४४ चौरस फूट चटई क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. १

**उपरोक्त संदर्भात दुसरी अनुसूची**
**(मूळ कागदपत्रांचा तपशिल)**

(i) मेसर्स रिलायबल बिल्डर्स आणि श्री तेहमी एन. एरानी आणि श्रीमती खुर्शीद एस. इराणी यांच्यात २५ फेब्रुवारी १९७० रोजी अंमलात आलेल्या कराराचे लेख

(ii) ३० डिसेंबर १९७० रोजीच्या कराराचे लेख, श्री तेहमी एन एरानी आणि श्रीमती खुर्शीद एस. एरानी विक्रेता म्हणून आणि पॅरामाउंट इंडिया प्रा. खरेदीदार म्हणून लि

(iii) ३० एप्रिल १९७४च्या कराराचे लेख, मे/एस दरम्यान अंमलात आले. पॅरामाउंट इंडिया प्रा. लि. विक्रेता म्हणून आणि श्री. नलिनभाई बी. मुन्शॉ खरेदीदार म्हणून

(iv) श्री नलिनभाई बी. मुन्शॉ विक्रेता म्हणून आणि डॉ. शीला थरूमल पंजाबी खरेदीदार म्हणून अंमलात आणलेले करार

......... सप्टेंबर २०२४ रोजी दिनांकित

**सही/-**
**परीशा शाह,**
**वकील**

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की राज गुलमोहर बिल्डींग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील तळमजल्यावर सदनिका क्रमांक ए-००४ या मालमत्तेचे श्री कल्पेश रमणभाई दर्जी हे कै. श्री. रमणभाई भिखाभाई दर्जी यांच्या कायदेशीर वारसांपैकी एक आहेत याची आम्ही चौकशी करत आहोत. राज गुलमोहर बिल्डींग नं. 2 सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड, सर्व्हे क्रमांक १५७, बी एस नं. ४२३, हिसा नं. ए/२, ए/३, ए/४, एस. क्रमांक ३१६, बी, सेंट झेवियर्स हायस्कूलजवळ, युनिटेक, तिरुपती नगर फेज II, विरार - ४०१३०३, जो श्रीमती ललिताबेन रमणभाई दर्जी, श्रीमती जयश्री जितेंद्र परमार, श्री. चिराग रमणभाई दर्जी आणि श्री. नयन रमणभाई दर्जी (ज्यांनी इतर असण्याच्या क्षमतेने ते विकत घेतले) यांच्याकडून विकत घेतले. कै. श्री. रमणभाई भिखाभाई दर्जी यांचे कायदेशीर वारस)

विक्री, देवाणघेवाण, गहाण, शुल्क, भेटवस्तू, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टी, भाडेकरार, धारणाधिकार, परवाना, गृहीतक, शीर्षकाचे हस्तांतरण किंवा फायदेशीर व्याज या मार्गाने वरील संदर्भित जागेवर किंवा त्याच्या काही भागावर कोणताही दावा असलेली कोणतीही व्यक्ती कोणत्याही ट्रस्ट अंतर्गत, प्रिस्क्रिप्शनचा अधिकार, किंवा प्री-एम्प्शन किंवा कोणत्याही कराराखाली किंवा इतर प्रवृत्तीच्या अंतर्गत किंवा कोणत्याही डिक्री, ऑर्डर किंवा पुरस्कार किंवा अन्यथा दावा करून याद्वारे त्यांच्या अधोस्वाक्षरीदारांना समर्थन दस्तऐवजांसह लिखित स्वरूपात ते कळवावे अशी विनंती केली जाते. अधिवक्ता दक्षा एम. शहा, सी-७०३, शुभ शांती कॉम्प्लेक्स, एम. जी. रोड, डहाणूकरवाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७, येथे प्रकाशित केल्यापासून ७ दिवसांच्या कालावधीत (दोन्ही दिवसांसह) अयशस्वी झाल्यास अशा व्यक्ती(त्यांचा) दावा माफ केला गेला आहे आणि/किंवा सोडला गेला आहे असे मानले जाईल.

२७ सप्टेंबर २०२४ रोजी दिनांकित

**सही/-**
**दक्षा एम. शाह**
**वकील**

### नोटीस

माझ्या अशिल श्री रणजीत लालबहादूर पटेल आणि श्रीमती रेखा रणजीत पटेल यांच्या वतीने नोटीस देण्यात येत आहे, सदनिका क्र. ३०१, तिसरा मजला, "गौरव नमन क्र. १", "रवि नमन १ आणि २ कॉ ऑप हौ सो लि., गौरव संकल्प फेज-II, जी सी सी क्लब जवळ, मिरारोड पूर्व, ता. व जि. ठाणे-४०११०७ चे सध्याचे मालक. पहिल्या मालकाचा ३१/१२/२००१ रोजीचा मूळ करार बिल्डर मे. रवी डेव्होलेपमेंट आणि श्री. सतीश गंगा चौरसिया व श्रीमती. आशा एस. चौरसिया हरवले / गहाळ झाले आहेत आणि माझ्या अशिल ह्यांनी केलेल्या सर्वोत्कृष्ट प्रयत्नांनंतरही ते सापडले नाही. हरवल्याची तक्रार मिरारोड काशिमीरा पोलिस स्टेशनमध्ये हरवलेली तक्रार संदर्भ क्र. ३१०६७-२०२४ दिनांक २७/०९/२०२४ अन्वये दाखल करण्यात आली आहे. उपरोक्त मालकांनी कोणताही धारणाधिकार किंवा गहाणखत किंवा कोणत्याही स्वरूपाचा कोणताही तृतीय पक्षाचा हक्क तयार केलेला नाही, या सदनिकेचे कोणताही हक्क व शीर्षक ह्दायाचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती/ व्यक्तींनी माझ्या खालील पत्त्यावर मला लेखी कळवावे: कार्यालय क्र. १३८, पहिला मजला, ओस्तवाल ऑर्नेट, बिल्डिंग क्र. २/ए, जैन मंदिराजवळ, जेसल पार्क, भाईंदर पूर्व, जि. ठाणे - ४०११०५, सदर सदनिकाचा कोणताही हक्क, शीर्षक आणि स्वारस्य यांचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने/त्याने ही सूचना प्रकाशित केल्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह लिखित स्वरूपात कळवावे, जर विहित कालावधीत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मी माझ्या क्लायंटने विनंती केल्यानुसार गहाळ झालेला कारनामा संधर्भात नो क्लेम सर्टिफिकेट जारी करणार आणि त्यानंतर कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत.

**दिनांक: २८.०९.२०२४.**

**सही/-**
**ॲड रजत के सिंग**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 98
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ९८
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

*मुंबई :* मातोश्री येथे मुंबई, ठाण्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मदतीसाठी स्थापन झालेल्या मुंबई न्यूजपेपर व्हेंडर्स वेल्फेअर असोसिएशन या ट्रस्टला दैनिक सामना व द दांगट न्यूजपेपर एजन्सीकडून पहिला चेक ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या शुभहस्ते सदर ट्रस्टचे अध्यक्ष सुभाष देसाई व उपाध्यक्ष बाजीराव शेठ दांगट यांच्याकडे नुकताच सुपूर्द करण्यात आला. यावेळी विवेक कदम, रॉकी रॉड्रीक्स, संजय तेलंगे, दिपक शिंदे, शरद सुरवसे, मनोज जयस्वाल, अजय भट, डी. बी. शर्मा, चारूदत्त दांगट, वसंत पाटील, योगीराज वाणी, गुलाब यादव, अथी बालमुरुगन, शिवपाल दुबे, समीर कुलकर्णी, संतोष वालावलकर, मधुसूदन सदडेकर, अजित पाटील, संजय चौकेकर, रवी चिले असे मुंबईतील वृत्तपत्र कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, आणि वृत्तपत्र विक्रेत्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते .



# सरकार सांगेल तेच अदानींना करावे लागेल, अन्यथा प्रकल्पाचे कंत्राट काढून घेऊ - देवेंद्र फडणवीस

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

कोणतेही प्राधिकरण, मग ते डीआरपी असले तरी त्यांना ज्या काही गोष्टी नियंत्रित करायच्या असतील, नियम बनवायचे असतीत ते आधी सरकारकडे पाठवावे लागतील. सरकारच्या मंजुरीनंतरच ते लागू केले जातील. विरोधक जे काही आरोप करतायत की आता अदानी सगळं नियंत्रित करणार वगैरे तो खोटा प्रचार आहे. जे करायचे ते सरकारच करेल. सरकारला वाटेल तेच अदानींना करावे लागेल. जर त्यांनी तसे केले नाही तर त्यांचे कंत्राट काढून घेतले जाईल,असे उत्तर विरोधकांच्या धारावी पुनर्विकासावरील आरोपांना उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

महाराष्ट्रातील महायुती सरकारने धारावी झोपडपट्टी पुनर्वसन व विकास प्रकल्पाचं काम अदाणी समुहाला दिलं आहे. यावरून विरोधक राज्य सरकारवर टीका करत आहेत. पुनर्वसन व विकास नियमांमध्ये बदल करण्याच्या मुद्द्यावरून सध्या वाद चालू आहे. मुंबईत कोणताही बांधकाम व्यावसायिक किंवा विकासक एखादे घर बांधत असेल, इमारत उभी करत असेल तर त्याला ४०% टीडीआर अदानी किंवा धारावी पुनर्विकास प्रकल्प प्राधिकरणाकडून (Dharavi Redevelopment Project Authority) खरेदी करावा लागेल. असं झाल्यास मुंबईतील घरांच्या किमती गगनाला भिडतील किंवा मुंबईतील घरांच्या किमती गौतम अदानींची कंपनी नियंत्रित करू शकेल, असा आरोप केला जात आहे. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं आहे.

फडणवीस म्हणाले, "तो नियम उद्धव ठाकरे यांच्या सरकारने बनवला होता. टीडीआरचा नियम त्यांनीच आणला होता. उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळाने बनवलेल्या नियमांत कॅपिंग नव्हतं. याचा अर्थ तुम्ही होल्डिंग कराल आणि किंमती वाढवाल, परिणामी इतरांकडे कोणताही पर्याय उरणार नाही. आम्ही त्यात कॅपिंग आणले.

घरांच्या किंमतींवर कॅपिंग (प्रायसिंगवर कॅपिंग) नसेल असा दावा देखील केला जात आहे. यावर फडणवीस म्हणाले, "घरांच्या किंमतींवर ९० टक्के कॅपिंग आहे. किंमती त्याच्यावर नेता येणार नाहीत. उद्धव ठाकरे यांच्या सरकारचा जो निर्णय होता तो आम्ही मान्य केला असता तर विकासक २०० टक्क्यांनी किंमती वाढवू शकले असते. त्यांनी प्रायसिंग होल्ड केल्या असत्या. त्यांच्या सरकारच्या काळात टीडीआर ॲबिलिबिलीटिचा डिजीटल प्लॅटफॉर्म नव्हता, जो आम्ही तयार केला,असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### *अदानींना काही दिलेले नाही, सर्व सरकारच्या ताब्यात*

*देवेंद्र फडणवीस म्हणाले, "सर्वात महत्त्वाची गोष्ट मला इथे नमूद करायची आहे की, आम्ही कुठलीही गोष्ट अदानींना दिलेली नाही. आम्ही डीआरपीला (धारावी पुनर्विकास प्रकल्प प्राधिकरण) दिते आहे. आम्ही अदानींना काही दिलेलं नाही. अदानी प्रायव्हेट लिमिटेडला काही दिलेलं नाही. कुठलीही गोष्ट त्यांच्या कंपनीकडे हस्तांतरित केलेली नाही. सर्व काही डीआरपीच्या अखत्यारित आहे. डीआरपी आमचा अधिकारी नियंत्रित करतो. महाराष्ट्र सरकारमधील सचिव दर्जाता अधिकारी हे प्राधिकरण सांभाळणार आहे. सर्व अधिकार त्या अधिकाऱ्याकडे असतील. हे अधिकारी मुंबईच्या आयुक्त स्तरावरचे असतील.*

# अंगणवाडी कर्मचारी 1 ऑक्टोबरला संपूर्ण राज्यात करणार 'चक्का जाम'

## ३० सप्टेंबरपर्यंत मानधनवाढ, ग्रॅच्युइटी आणि मासिक पेन्शनच्या निर्णयाची मागणी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**




येत्या ३० सप्टेंबर पर्यंत शासनाने मानधन वाढ, ग्रॅच्युइटी व मासिक पेन्शनचा निर्णय न घेतल्यास १ ऑक्टोबर मुंबईसह संपूर्ण राज्यातील अंगणवाडी कर्मचारी रस्त्यावर उतरून चक्का जाम आंदोलन करतील असा इशारा कृती समितीने दिला आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी २३ सप्टेंबरपासून बेमुदत उपोषणाचे पाऊल उचलले. २४ तारखेला महिला व बालविकास मंत्र्यांनी २६ तारखेला वित्त मंत्र्यांसोबत बैठक घेऊन चर्चा करण्याचे व लगेच कॅबिनेटमध्ये मांडून निर्णय घेण्याचे मान्य केले. त्यांच्या विनंतीवरून बेमुदत उपोषणाचे रुपांतर बेमुदत धरण्यामध्ये करण्यात आले. २५ सप्टेंबर रोजी सुमारे १६ हजार अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी सत्याग्रह करून स्वतःला अटक करून घेतली. पोलिसांची संपूर्ण यंत्रणा कोलमडून पडली. २६ सप्टेंबर रोजी बेमुदत धरण्यामध्ये मुंबईतील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलन सुरू केले व मागण्या कॅबिनेटमध्ये मान्य होऊन शासकीय आदेश निर्गमित होईपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्धार जाहीर केला. इतके होऊनही शासनावर काही परिणाम झालेला दिसत नाही. त्यामुळे आज धरणे आंदोलन करणाऱ्या कृती समितीच्या प्रतिनिधींची बैठक होऊन ३० सप्टेंबर पर्यंत शासनाने मानधन वाढ, ग्रॅच्युइटी व मासिक पेन्शनचा निर्णय न घेतल्यास १ ऑक्टोबर मुंबईसह संपूर्ण राज्यातील अंगणवाडी कर्मचारी रस्त्यावर उतरून चक्का जाम आंदोलन करतील असा इशारा कृती समितीचे एम ए पाटील ,शुभा शमीम , दिलीप उटाणे कमल परुळेकर , भगवानराव देशमुख जीवन सुरुडे , जयश्री पाटील यांनी दिला आहे.

# सहकार आघाडी सहसंयोजकपदी विठ्ठलराव नाना भोसले

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश सहकार आघाडी सहसंयोजकपदी विठ्ठलराव नाना भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सहकार आघाडीचे प्रदेश संयोजक आणि भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी ही नियुक्ती केली आहे.



*विठ्ठलराव भोसले यांना सहकार आघाडीच्या सहसंयोजक पदी नेमणूक झाल्याचे पत्रक देताना भाजपा सहकार आघाडीचे प्रदेश संयोजक आमदार प्रविण दरेकर छायाचित्रात दिसत आहेत.*

विठ्ठलराव भोसले हे साडेतीन पिठांपैकी एक असलेल्या करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी अंबाबाईच्या कोल्हापूर जिल्ह्यातील आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून सहकार क्षेत्रात काम करत आहेत. त्यांचा सहकार क्षेत्रातील सहभाग आणि अभ्यास दांडगा आहे. मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ते संचालकही आहेत. त्यांची सहकार क्षेत्रातील भरीव कामगिरी लक्षात घेता आ. प्रविण दरेकर यांनी भोसले यांची सहकार आघाडीच्या सहसंयोजक पदी नेमणूक केली.

# व्यावसायिकाला खंडणीसाठी जीवे मारण्याची धमकी

## अंधेरीत बोगस पत्रकाराविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

बोगस एनजीओचा अध्यक्ष असल्याचा दावा करून वारंवार खंडणी मागणाऱ्या आणि ती न दिल्यास व्यावसायिकास जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या रफिक मुलाणी या बोगस पत्रकाराविरुद्ध अंधेरीच्या मेघवाडी पोलीस स्थानकात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

आरोपी मुलाणीने श्रीकांत जाधव या छोट्या व्यावसायिकास धमक्या दिल्या आहेत. मी सिटीझन जस्टीस प्रेस काउन्सिल ऑफ महाराष्ट्र या नोंदणीकृत संघटनेचा अध्यक्ष आहे. तुमचा धंदा अनधिकृत आहे. मला ताबडतोब ५० हजार रुपये द्या ,नाहीतर पेपरमध्ये तुमच्याविरोधात बातमी छापून आणेन. माझ्याविरोधात तुम्ही पोलिसांत तक्रार कराल तर तुम्हाला जीवे मारण्यात येईल. जाधव यांनी हि बाब पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत नमूद केली आहे.

जाधवांनी दिलेल्या तक्रारीनुसार मुलाणी या इसमाची संस्था बोगस आहे व या संस्थेला धर्मादाय आयुक्त अथवा कोणत्याही सरकारी खात्याची मान्यता नाही.प्रतिक्रियेसाठी मुलांणी यांना संपर्क केला असता तो होऊ शकला नाही.मुलांनी यांच्याविरोधात आणखी गुन्हे अथवा तक्रारी अन्य पोलीस ठाण्यात आहेत का ,याचा तपास मेघवाडी पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E- TENDER 1ST CALL NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in/ for following works

| Sr. No. | RFx. No. | E-Tender No. & Description of Material | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender |
|---|---|---|---|
| 1 | 7000033631 | **SE/EHV/O&M/CIR/KLW/TECH/ Ten-41/24-25**<br>E-Tender for work of providing Earth Pits to Transformer & Strengthening of Neutral Earthing by providing Additional Earthing (double) to Transformers at various S/S under EHV O&M Circle, Kalwa. | Tender Downloading Dates & time. Tender Sale period.<br>From **Dt: 27.09.2024, 00:00 Hrs. to Dt. 04.10.2024, 09:59 Hrs.**<br>**Technical Opening: - Dt. 04.10.2024 at 10: 00 Hrs** (Onwards if possible)<br>**Commercial Opening: - Dt. 04.10.2024 at 15:00 Hrs.** (Onwards if possible) |
| | | **Tender Fee** | **Rs. 500 + GST** |
| | | **Estimated Cost** | **Rs. 99,13,540/-** |

**Contact Person** Executive Engineer/ Dy. Exe. Engineer (O) Tel No. 9769006245 / 7506379055

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.



## पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद ठाणे

**वागळे इस्टेट रोड नं. २२, सर्कल जवळ, ठाणे (पश्चिम), जिल्हा ठाणे.**
ई -मेल:eebnthane@gmail.com । दूरध्वनी क्र.: ०२२ २५४३१२८०.

### ई-निविदा सूचना क्र. १६/२०२३-२४ (३रा व ४था)

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे ई-निविदेद्वारे विविध योजना अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांचे कडील २१ कामांसाठी Online द्वारा खुल्या निविदा मागवित आहे.

१. सदरच्या पूर्ण निविदा प्रक्रिया हि Online द्वारा खुल्या निविदा मागवित आहे.
२. विस्तृत माहिती http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
३. सदरची निविदा दिनांक २५/०९/२०२४ रोजी संध्याकाळी १८:०० वाजल्यापासून ते दिनांक ३०/०९/२०२४ रोजी संध्याकाळी १८:०० वाजेपर्यंत Online पद्धतीने Download स्विकारण्यात येतील.
४. दि. ३०/०९/२०२४ रोजी संध्याकाळी १८:०० पर्यंत भरलेली निविदा दिनांक ०१/१०/२०२४ रोजी दुपारी १५:०० वाजता उघण्यात येईल.
५. यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर काही माहिती http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुनच प्रसिद्ध करण्यात येईल.

**(दिलीप मु. जोकार )**
**कार्यकारी अभियंता,**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद ठाणे**



## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com

ई-निविदा सूचना क्र : पमपा/ उद्यान /२२२२/प्र.क्र.१४/४०७/२०२४ दिनांक : २७/९/२०२४

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | दिलेल्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू. | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग (ब) मधील विविध उद्यानांमध्ये लॉन लावणे व ३ वर्षाकरीता देखभाल करणे. | PMC / Garden /04/ 2024-25 | रु. १,८८,१०,३१८/- (GST विरहित) | १,८८,१०३/- | ३६ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र. पमपा/ जनसंपर्क /३१२४/प्र.क्र. ४९५/४९७/२०२४**
**दिनांक- २७/०९/२०२४**
**संदर्भ :- जा. क्र. पमपा/ उद्यान/२२२२/प्र.क्र.१४/४०३/२०२४**
**दिनांक : २७/०९/२०२४**

**Sd/-**
**(डॉ. प्रशांत रसाळ)**
**अतिरिक्त आयुक्त - I,**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**



## मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, मुंबई

**म्हाडाचा घटक**

म्हाडा MHADA

### ई-निविदा नोटीस

**Main portal : https://mahatenders.gov.in.** **MHADA portal: https://mhada.maharashtra.etenders.in**

कार्यकारी अभियंता ( २ ) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, महानगरपालिका (बी. विभाग) कार्यालय, रुम नं. ३०, तिसरा मजला, जे. जे. हॉस्पिटलसमोर बाबुला टैंक क्रॉस लेन, मुंबई ४०० ००९ यांचेकडून खालील दर्शविलेल्या कामासाठी मजूर सहकारी संस्था यांचेकडे नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई. निविदा क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | नोंदणी वर्ग | निविदेची किंमत (GST) धरुन | काम पुर्णकरण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ओम बावदेव बी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 29,82,562/- | निरंक | 30000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| ०२ | आम बावदेव सी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 29,86,482/- | निरंक | 30000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| ०३. | साई कृपा बी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 29,84,490/- | निरंक | 30000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| ०४ | साई कृपा सी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 29,90,279/- | निरंक | 30000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| ०५ | साई कृपा, ए विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. दी-२ विभाग मुंबई. | 32,46,773/- | निरंक | 33000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| ०६ | साई कृपा ही विंग या पी एम जी भी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. | 33,86,463/- | निरंक | 34000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| ०७ | बी-२ विभाग मुंबई. ओम बाबदेव ए विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 33,70,581/- | निरंक | 34000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| ०८ | अष्ट विनायक बी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 43,44,522/ | निरंक | 44000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| ०९ | अष्ट विनायक ए विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 46,97,495/ | निरंक | 47000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| १० | अष्टविनायक सी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 49,50,468/ | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| ११ | अरुणोदय ए विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 49,79,807/- | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| १२ | अरुणोदय बी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 49,88,419/- | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| १३ | अरुणोदय सी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. सी-२ विभाग मुंबई. | 49,84,472/- | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| १४ | प्रथम दर्शन या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे, बी-२ विभाग मुंबई. | 49,97,963/ | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| १५ | शिव दर्शन या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचं काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 49,96,080/- | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| १६ | गंगा सागर अ विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे, बी-२ विभाग मुंबई. | 49,86,916/- | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| १७ | गंगा सागर बी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 49,93,829/- | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| १८ | ओमकार अ विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 49,86,285/- | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| १९ | ओमकार बी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 49,96,163/- | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| २० | गणेश दर्शन अ विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 46,85,423/ | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |
| २१ | गणेश दर्शन बी विंग या पी एम जी पी इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम करणे. बी-२ विभाग मुंबई. | 45,37,277/ | निरंक | 50000.00 | वर्ग-VI व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |

| अनु. क्र | प्रकिया | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| ०१. | प्रकाशन दिनांक | २८.०९.२०२४ सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ०२. | कागदपत्रांची विक्री सुरुवात | २८.०९.२०२४ सकाळी १०.०५ वाजल्यापासून |
| ०३. | कागदपत्रांची विक्री शेवट | ०४.१०.२०२४ सायंकाळी १७.३० वाजेपर्यंत |
| ०४. | देकार सादर सुरुवात | २८.०९.२०२४ सकाळी १०.०५ वाजल्यापासून |
| ०५. | देकार सादर शेवट | ०४.१०.२०२४ सायंकाळी १७.३० वाजेपर्यंत |
| ०६. | तांत्रिक देकार उघडण्याची वेळ | ०७.१०.२०२४ सकाळी ११.०० वाजल्यापासून |
| ०७. | आर्थिक देकार उघडण्याची वेळ | ०७.१०. २०२४ सकाळी ११.०० वाजल्यापासून |

१. संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन (ई-टेंडरींग) दोन लिफाफे पध्दतीची असेल, निविदेसंबंधी अधिसुचना, अटी व शर्तो महाराष्ट्र शासनाची वेबसाईट https://mahatenders.gov.in यावर प्रसिध्द होईल.
२. नविदा संबंधीत दस्तऐवज वेबसाईट https://mahatenders.gov.in यावर पाहून दिनांक २८.०९.२०२४ (सकाळी १०.३० वाजेपासून) ते दिनांक ०४.१०.२०१४ (सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत) वेबसाईट वरुन डाऊनलोड व अपलोडकरता येतील.
३. वरील निविदेचे निविदा शुल्क व इसारा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावे लागेल.
४. तांत्रिक निविदा (Technical Bids) दिनांक ०७.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता व दर निविदा (Price Bids) त्याप्रमाणे पात्रताधारक ठेकेदाराना कळविण्यात येईल. कार्यकारी अभियंता, बी २ विभाग, कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, बृहमुंबई महानगरपालिका (बी. विभाग) कार्यालय, रुम नं. ३०, तिसरा मजला, जे. जे. हॉस्पिटलसमोर बाबुला टेकक्रॉस लेन, मुंबई- ४०० ००९ यांचे दालनात वेबसाईट https://mahatenders.gov.in वर उघडण्यात येईल.
५. निविदाकाराने निविदा सादर करताना अपलोड केलेली सर्व मुळकागदपत्रे पडताळणीसाठी तांत्रिक निविदा उघडण्याच्या वेळी सादर करावीत.
६. निविदाकाराने डिजिटलहस्ताक्षर हे वर्ग २/३ असावे.
७. कार्यकारी अभियंता, बी २ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, हे एक किंवा सर्व निविदा कोणते ही कारण न देता स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवत आहेत.
८. कार्यकारी अभियंता, बी २ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, हे एक किंवा सर्व निविदा कोणते ही कारण न देता स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवत आहेत.
९. जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र रु. २० लक्ष ची मर्यादा विचारात न घेता अनिवार्य आहे.
१०. जर पहीला निम्नतर निविदाकार अंदाजित निविदाधिन कामाच्या किंमतीचे धनावर्स परफॉर्मन्स सेक्युरिटी म्हणून सुरक्षा अनामत रक्कम ) भरा शकला नाही तर दुस-या निम्नतर निविदाकाराला स्वीकारण्यात येईल.
११. निविदाकारास निविदा संबंधीची संपूर्ण माहिती संकेतस्थळ https://mahatatenders.gov.in यावरुन मिळवावी. प्राधिकरणाच्या / शासनाच्या वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रक तसेच मार्गदर्शक सूचनांनुसार निविदा उघडण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
(नितीन डोंगरे )
( कार्यकारी अभियंता / (ब-२)
मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ.

**CPRO/A/774**

Follow us:@mhadaofficial

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

तुम्हाला भरभर चालायचे असेल तर एकटे चाला मात्र जास्त अंतर चालायचे असेल सर्वांसोबत चाला.



- रतन टाटा
प्रसिद्ध उद्योगपती



# चुकीचे पर्यटन निसर्गाच्या मुळावर

कालच जगभरात जागतिक पर्यटन दिन साजरा झाला. भारतानेही तो साजरा केला. इतरही जागतिक दिन असेच येतात, साजरे केले जातात आणि दिवस संपताच या दिनाच्या महत्त्वाची पाटी कोरी होते. या दिनी घेतली शपथ, योजीलेले ध्येय रोजच्या दिवसांमध्ये गडप होते. काल झालेल्या पर्यटन दिनाचेही असे होता कामा नये. पर्यटन म्हणजे आनंदासाठी केलेला प्रवास. पण आज पर्यटन हा केवळ आपल्या भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर मोठा व्यवसाय बनलेला आहे. अनेक देशांची आर्थिक मदार याच पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे. असे असले तरी वाढते पर्यटन हे पर्यावरणाला 'क' प्रमाणात धोकादायक ठरू पाहात असल्याने या विषयाकडे वेळीच सर्वांनी गांभीर्याने पाहिले पाहिजे. जागतिक पर्यटन दिनाच्या निमित्ताने हा विषय सध्या सर्वत्र चर्चिला जात आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अनेकदा मूळ निसर्गाची हानीसुद्धा अनेक ठिकाणी करण्यात येत असून त्याला वेळीच पायबंद घातला पाहिजे. त्यातच पर्यटकांची वाढती विविध प्रकारच्या प्रदूषणात मोठी भर घालत आहे. पर्यटकांसाठी हॉटेल, रिसॉर्ट बांधण्यासाठी, संबंधित गावात रस्ते तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड बिनदिक्कतपणे होत असते. पार्टीच्या नावाखाली अनेक ठिकाणी ध्वनिप्रदूषणात वाढ होते. स्थानिक जनजीवनावर त्याचा विपरित परिणाम होत असतो. याचमुळे जगभरात अनेक ठिकाणी अशा पर्यटनाला स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणात विरोधसुद्धा करत आहेत. भारताच्या जीडीपीमध्ये पर्यटनाचा वाटा सुमारे चार टक्के इतका आहे. पर्यटन क्षेत्र हे देशातील सर्वोच्च सेवा उद्योगांपैकी एक आहे. आजच्या काळात अर्थव्यवस्था मजबूत करणे ही प्रत्येक देशाची पहिली गरज आहे. आज जगात अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटन उद्योग भोवती फिरते. भारताच्या जीडीपीमध्ये पर्यटन क्षेत्राचा साडे सहा टक्के वाटा आहे तर एकूण रोजगारामध्ये ते ८.७८ टक्के योगदान असून यात वाढ अपेक्षित आहे. जगभरात भारत हा नेहमीच एक लोकप्रिय पर्यटन स्थळ राहिला आहे. ऐतिहासिक किल्ले, दिमाखदार राजवाड्यापासून घनदाट जंगल, बर्फाळ प्रदेश अशा पर्यटकांना पाहाव्याशा वाटणाऱ्या सगळ्या गोष्टी भारतात आढळून येतात त्यामुळे जगभरातील पर्यटकांचा ओढा नेहमीच इकडे असतो. दळणवळणाच्या सुविधा वाढल्याने मुक्त संचार करणे आता अत्यंत सोपे झालेले आहे. त्यामुळे देश-विदेशातल्या वाऱ्या आता वाढू लागल्याने दरवर्षी पर्यटनात २० ते २५ टक्के वाढ होत आहे. जगभरच्या उलाढालीमध्ये पर्यटनाचा तिसरा क्रमांक लागतो. यामुळे रिसॉर्ट्स, हॉटेल्स आणि विमान कंपन्यांचा प्रचंड फायदा होत आहे. अनेक विद्यापीठात पर्यटनाचे व्यवस्थापन आणि नियोजन, ट्रॅव्हल अँड टुरिझम याचे पदविका, पदवी आणि पदव्युत्तर हे अभ्यासक्रम सुरू झालेले असून तो आता महाविद्यालयीन शिक्षणाचा एक भाग झालेला आहे. टुर ऑपरेटर, गाईड, ट्रॅव्हल एजन्सी, निवास, आतिथ्य, आरक्षण, विपणन, विक्री, गुंतवणूक, वाहतूक, अन्न, समारंभ, साहसी पर्यटन हे आज सेवा देणारे क्षेत्र झालेले आहे. यामुळे देश-विदेशात खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी मोठ्याप्रमाणात उपलब्ध झालेल्या आहेत हे सत्य नाकारता येत नाही. पर्यटन हे आज प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे आधुनिक अंग झालेले असल्याने आणि संस्कृतीचा भाग आहे. जंगल, समुद्र, आकाश कुठेही पर्यटन करता येते. हजारो ट्रॅव्हल्स कंपन्या, त्यांचे प्रचंड मार्केटिंग, आधुनिक सोयी सुविधांच्या वर्तमान पत्रातल्या पानपान भरच्या जाहिराती, लाखो रुपयांचे पॅकेजेस आणि तणावरहित प्रवासामुळे आज प्रवासात एक प्रकारची निश्चितता आली आहे. पैसे भरले, बॅग भरली आणि भरपूर वेळ काढला तर कुठलाही प्रवास हा सुखकर होतो. कारण पॅकेजच्या प्रवासात जेवण्या खाण्याची आणि राहण्याची अजिबात चिंता नसते. त्यामुळे पर्यटनातल्या प्रवासाचा भरपूर आनंद घेता येतो आणि शरीर आणि मनाला एक नवीन ऊर्जा प्राप्त होते. अनेक पर्यटक नुसते भटकण्याकरिता आणि मनाला वाटणाऱ्या उभारीचा आनंद घेण्याकरिता जातात. मात्र यातले मोजकेच पर्यटक सखोल निरीक्षण करणारे असून चिकित्सक अभ्यास करणारे असतात. आज पर्यटनाचे विश्व प्रचंड प्रमाणात वाढलेले असले तरी याचा प्राचीन इतिहासात पर्यटन हे कितीतरी कष्टदायक होते हे दिसून येते. पर्यटनाचा आजपर्यंतचा इतिहास खरोखरच मनोरंजक आहे. त्या असुविधेच्या काळात पर्यटन ही आवड नसून गरज होती असे दिसून येते. तेराव्या शतकात इटलीच्या व्हेनिसचा यात्री आणि इटलीचा व्यापारी, संशोधक मार्को पोलोचे भारतात दोन वेळा आगमन झाले आणि त्याने दक्षिणेतल्या पांड्य साम्राज्याला भेट दिली. हा इतिहासातील सर्वात प्रसिद्ध पर्यटक आहे. पर्यटनाच्या संकल्पनेला चालना देण्याचे श्रेय रोमन साम्राज्याला दिले जाते. कारण जीवनात आनंद अनुभवण्याकरिता समुद्र सफरीच्या पर्यटनाची 'ग्रँड टुर' ही कल्पना त्यांनी मांडली. समुद्रातून व्यापारी मार्ग शोधणारा हा पहिला युरोपियन होता. मसाल्याच्या व्यापारावर एकाधिकार स्थापित करण्याकरिता एकूण तीन वेळा 'वास्को द गामा' हा भारतात आला आणि भारतातल्याच कोच्ची येथे त्याचा मृत्यू झाला. कोच्ची आणि लिस्बेन येथे वास्को द गामाची स्मारके आजही आहेत. या साहसी पर्यटनामुळे युरोपियन बाजार आणि पश्चिमी देशाकरिता भारताचे दरवाजे खुले झाले. त्यानंतर युरोपियन लोक भारताचे मुरीद झाले. प्राचीन भारतीय कला संस्कृती, खानपान, येथील नैसर्गिक सौंदर्य यांची चांगलीच भुरळ पडली. भारताबाबत विचार करायचा झाल्यास प्रवास आणि पर्यटनाकरिता आजही भारताची फार मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. दरवर्षी करोडो पर्यटक भारताच्या विविध ठिकाणी भेटी देतात. ऐतिहासिक स्थळे, राष्ट्रीय महापुरुषांची निवासस्थाने, अतिप्राचीन मंदिरे, प्राचीन किल्ले, समुद्रतट, आकर्षक महाल आणि हवेल्या, महाराष्ट्र आणि राजस्थान येथील किल्ले, फतेहपूर सिक्री, ताजमहाल, चारमिनार, हम्पी, दिल्ली आणि आग्र्याचा लाल किल्ला अशी शेकडो स्थळ बघण्याकरिता जगभरातून पर्यटक आणि अभ्यासक भारतात येत असतात आणि समृद्धीचा खजिना आपल्या देशात घेऊन जातात. समुद्र पर्यटन, व्यवसाय पर्यटन, सामान्य पर्यटन, क्रीडा पर्यटन, साहस पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, इको आणि जंगल पर्यटन, या सोबतच धार्मिक आणि कृषी पर्यटन यासह अनेक पर्यटन प्रकारच्या व्याख्या प्रस्थापित आणि लोकप्रिय होत आहेत. देशात आणि परदेशात पर्यटकांकरिता 'आध्यात्मिक पर्यटन' हीसुद्धा भारताची ओळख आहे. पर्यटन व्यवसायामुळे साधा चणे- फुटाणेवाला, चहावाला पैसे कमावतो, त्याचप्रमाणे पंचतारांकित हॉटेलसुद्धा चांगली कमाई करतात. याशिवाय दुकानदार, बस/रिक्षावाले, घोडेवाले सगळेच चांगला नफा कमावतात. काही पर्यटनस्थळी तर वर्षातील सहा- आठ महिने काम करूनही वर्षभराची कमाई होत असते. हिमालयावर चढाई करणे हे सोपे काम नाही. तरीसुद्धा जगभरातून हौशी आणि व्यावसायिक गिर्यारोहक येत असतात. एव्हरेस्ट, कांचनगंगासारखी शिखरे त्यांना खुणावत असतात. त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. वर चढताना त्यांना आपले खाणे बरोबर न्यावे लागते. चढाई पूर्ण झाल्यावर परतताना तयार झालेला कचरा उदा. बाटल्या, डबे परत त्यांच्याबरोबर खाली तळावर येत नाही. तो इतस्ततः फेकून दिला जातो. हिमालयासारख्या बर्फाळ प्रदेशातसुद्धा त्यामुळे ठिकठिकाणी भरपूर कचरा जमा झाला आहे. ढगफुटी झाल्याप्रमाणे थोड्या काळासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात पाऊस अनेक ठिकाणी होतो. पावसाचे पाणी डोंगरात झिरपू शकले नाही. कारण जंगले नष्ट केली गेली आहेत. हे कित्येक दशके चालू आहे. वृक्ष तोडीमुळे अवैध खाणकाम हे कारण सांगितले जाते. दरडी कोसळल्या, झऱ्यांच्या नद्या झाल्या. या प्रवाहात जे काही सापडले ते वाहून गेले किंवा गाडले गेले. अनेक ठिकाणी टुरिस्ट रिसॉर्ट बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली आहे. निसर्गाची हानी करून पर्यटन स्थळे करण्याचा प्रयत्न जर वेळीच थांबवला गेला नाही तर त्याची मोठी किंमत सर्वांना मोजावी लागणार आहे. सरकारने त्यासाठी वेळीच कडक नियमावली करून त्यांची अमलबजावणी केली पाहिजे.

# चतुरंग : महाराष्ट्राची ओळख ठरलेली सांस्कृतिक चळवळ

**'चतुरंग' संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी सांगता सोहळ्यानिमित्त 28 आणि 29 सप्टेंबरला मुंबईतील यशवंत नाट्यमंदिर (माटुंगा) इथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 29 रोजी संध्याकाळी होणाऱ्या कार्यक्रमात प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, प्रसिद्ध अभिनेते दिलीप प्रभावळकर आणि रोहिणी हट्टंगडी, पं. उल्हास कशाळकर, पं. हरिप्रसाद चौरसिया, क्रिकेटपटू चंदू बोर्डे, ख्यातनाम उद्योजक बाबा कल्याणी, ज्येष्ठ साहित्यिक महेश एलकुंचवार, संगीतकार अशोक पत्की, मेजर महेशकुमार भुरे, प्रसिद्ध चित्रकार वासुदेव कामत या 11 मान्यवरांना चतुरंग सुवर्णरत्न सन्मानाने गौरवण्यात येणार आहे. त्यानिमित्त हा विशेष लेख-**

**डॉ. सागर देशपांडे**

कला, शिक्षण, साहित्य, नाट्य, संगीत, चित्रपट अशा अनेकविध क्षेत्रांतील दिग्गजांना एकत्र आणून रसिकांशी त्यांची गाठभेट घालून देणं हे काम रसिकपणे सातत्यानं करत राहणं हे अजिबात सहजसाध्य नाही. त्यातही दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण कार्यक्रमांच्या अत्यंत आपुलकीनं केलेल्या संयोजनाचा मानदंड निर्माण करणं ही तर अक्षरशः तपश्चर्याच म्हणावी लागेल. कोकण आणि मुंबईत सुरू झालेल्या 'चतुरंग प्रतिष्ठान' या संस्थेनं गेली 50 वर्षे अव्याहतपणे सुरू ठेवलेली ही तपश्चर्या हा महाराष्ट्राच्या औत्सुक्याचा विषय आहे. म्हणूनच आता ही केवळ ध्येयनिष्ठ रसिक कार्यकर्त्यांनी उभारलेली संस्था राहिली नसून ती उभ्या महाराष्ट्रानं आपली ओळख म्हणून सांगावी अशी सांस्कृतिक चळवळच झाली आहे. महाराष्ट्र म्हणजे स्वातंत्र्यपूर्वकाळापासून कार्यकर्ते आणि संस्था/संघटनांचं मोहोळ आहे. खुद्द महात्मा गांधीजींसह अनेकांनी त्याबद्दल महाराष्ट्राचा नेहमीच गौरव केला आहे. माणसाच्या मुलभूत गरजा भागल्या तरीही प्रत्येकाची एक सांस्कृतिक भूक शिल्लक राहतेच. तिच्या तृप्तीसाठी आपल्या आजूबाजूला गुणवत्तासंपन्न, विधायक काम करणाऱ्या संस्था असतील तर त्या समाजजीवनाला आपोआपच एक सांस्कृतिक समृद्धी मिळू लागते. मनोरंजनासह ज्ञान-प्रबोधनात्मक दर्जेदार कार्यक्रमांची निर्मिती आणि त्यांचे विविध कला प्रकारांतून आकर्षकपणे सादरीकरण करत राहणे ही या सांस्कृतिक समृद्धीची सर्वात महत्त्वाची खूण म्हणावी लागेल. 'चतुरंग'नं आपल्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीत अशा पाऊलखुणांचा जणू महामार्गच तयार केला आहे.

कोकणातील चिपळूण परिसरातील खेडेगावांमधील शैक्षणिक काम असो की डोंबिवली-मुंबई परिसरातील सांस्कृतिक कार्यक्रम असोत - तिथं 'चतुरंग'ची स्वतंत्र, वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण झाली आहे. कोणीही पदाधिकारी नसलेलं दीड-दोनशे कार्यकर्त्यांचं निःस्वार्थ संघटन वर्षानुवर्षे समाजसहभागासह सांभाळणं हे महाकठीण काम आहे. जागतिकीकरणाच्या लाटेमुळं गेल्या 30-35 वर्षांमध्ये तर हे काम सातत्यानं करणं हे आणखीनच अवघड झालं होतं. पण विद्याधर निमकर यांच्यासह 'चतुरंग' मधील सर्वांनीच अगदी आपला जीव ओतून हे 'चतुरंग'चं रोपटं खास निगराणीसह वाढवत ठेवलं आहे. समाजाची शैक्षणिक, सांस्कृतिक उंची वाढवण्यासाठी आपापल्या आवडीच्या क्षेत्रात आयुष्यभर ज्यांनी योगदान दिलं आहे, अशांना सन्मानित करण्याची योजना 'चतुरंग'नं आखली. पण त्यासाठी एकच एक धनवान दाता घेतला नाही तर समाजातील रसिकांनी प्रत्येकी एक हजार रु. देऊन ही धनराशी तयार झाली. त्यातून सुरू झालेल्या पुरस्काराचं खुद्द पु. ल. देशपांडे यांनीच बारसं केलं - जीवनगौरव पुरस्कार. चतुरंगमधील कार्यकर्त्यांच्या हस्तक्षेपाशिवाय समाजातील जाणत्या मान्यवरांच्या दरवर्षी नव्याने तयार होणाऱ्या समितीकडून पुरस्कारासाठी सुयोग्य व्यक्तीची निवड होत असते. सध्या तीन लाख रु. आणि सन्मानचिन्ह, मानपत्र असं घसघशीत स्वरुप प्राप्त झालेला हा चतुरंग जीवनगौरव पुरस्कार हजारो रसिकांच्या साक्षीनं एका रंगसंमेलनात ज्या सन्मानपूर्वक दिला जातो, त्यामुळं साऱ्या महाराष्ट्राचीच ही कौतुकाची थाप आहे असं पुरस्कारप्राप्त मान्यवरांना वाटत राहतं.

चित्रतपस्वी भालजी पेंढारकर, पु. ल. देशपांडे, सुधीर फडके, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, पांडुरंगशास्त्री आठवले, भारतरत्न लता मंगेशकर, नानाजी देशमुख, डॉ. जयंत नारळीकर, पं. सत्यदेव दुबे, साधनाताई आमटे, डॉ. विजय भटकर, प्रो. राम ताकवले, विजया मेहता, डॉ. गो. बं. देगलूरकर, सय्यदभाई अशी चतुरंग जीवनगौरव सन्मान लाभलेल्या दिग्गजांची नावं पाहिली की ऊर भरून येतो. त्यांचा सन्मान करण्यासाठी लाभलेल्या अशाच दिग्गज हातांची नावं पाहिली तर तीही अशीच विलक्षण आहेत. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, उपपंतपधान लालकृष्ण अडवाणी, सरन्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड, एअरचीफ मार्शल अनिल टिपणीस, लोकमान्यांचे नातू जयंतराव टिळक, प्रख्यात कवी-गीतकार गुलजारजी, श्याम बेनेगल, ख्यातनाम शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, प्राचार्य शिवाजीराव भोसले..... अशी ही यादी मोठी आहे. या जीवनगौरव पुरस्कार सोहोळ्याच्या निमित्तानं दरवर्षी आयोजित केलं जाणारं रंगसंमेलन ही तर 'चतुरंग'ची निजखूण आहे. एकाच वेळी साहित्य, नाट्य, संगीत, चित्र, नृत्य, गायन, वादन, व्याख्यान, मुलाखत अशा बहुविध कलांचा आविष्कार या रंगसंमेलनातून रसिकांना साक्षात् अनुभवता येतो. पं. बिरजू महाराज, उस्ताद झाकीर हुसेन, माधुरी दीक्षित, आर. के. लक्ष्मण, मन्ना डे, महेंद्र कपूर, अरुण दाते, श्रीनिवास खळे, भारतरत्न भीमसेन जोशी, पं. हरिप्रसाद चौरसिया, पं. शिवकुमार शर्मा, मंगेश पाडगावकर, हेमामालिनी, ज्योत्स्ना भोळे, शंकर महादेवन अशा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कलाकारांसह भारतीय सेना दलाच्या तिन्ही प्रमुखांची चतुरंगच्या रंगमंचावरील उपस्थिती ही रसिकांसाठी डोळ्यांचं पारणं फेडणारीच झाली आहे. बरं यासाठी केलं जाणारं आयोजन हे इतक्या बारकाईनं, नीटनेटकं, सौंदर्यसंपन्न, आखीव-रेखीव असतं की, रसिक श्रोते अवाक् होऊन जातात. कार्यक्रमांच्या निमंत्रणापासून ते कार्यक्रमाच्या समारोपानंतर नाट्यगृहाबाहेर चतुरंगचे कार्यकर्ते दोन्ही बाजूला विनम्रपणे उभे राहून ज्या पद्धतीनं कृतज्ञता व्यक्त करतात, ती पाहिली की, महाराष्ट्राची सांस्कृतिक समृद्धीची खूण तर पटतेच, पण अजूनही टिकून असलेल्या सौजन्यशील आपुलकीचाही दुर्मिळ अनुभव येतो. विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आणि कार्यक्रमांचे उत्तम आयोजन, व्यवस्थापन करण्यामधील चतुरंगच्या मंडळींची गेल्या 50 वर्षातील हातोटी लक्षात घेता मी तर त्यांना नेहमीच सुचवत आलो आहे की, तुम्ही अशा कार्यक्रमांच्या व्यवस्थापनाचा एक प्रशिक्षण वर्ग सुरू करा. महाराष्ट्रात गावोगावी होणाऱ्या कार्यक्रमाच्या संयोजकांना त्याची नितांत गरज आहे. चिपळूण, गोवा, मुंबई, डोंबिवली आणि गेल्या काही वर्षांमध्ये पुण्यनगरीत चतुरंगची रंगसंमेलनं झाली आहेत. अशी संमेलनं, विविध सांस्कृतिक कार्यक्रम चतुरंगनं आता उर्वरित महाराष्ट्रात आणि बृहन्महाराष्ट्रात देखील घ्यायला हवेत असं वारंवार वाटत राहतं. चतुरंगचे कार्यक्रम म्हणजे सृजनांचे स्नेहमेळावेच असतात. त्यानिमित्तानं घ्यावयाचे औपचारिक उपक्रम देखील किती जिव्हाळ्यानं, आपुलकीनं, अनौपचारिकपणे, शिस्तीला-अगत्यशीलतेची जोड देऊन कसे करता येतात? हे अनुभवायचं असेल तर त्यासाठी चतुरंग हे दीपस्तंभासारखे उदाहरण आहे. येणाऱ्या प्रत्येकच रसिकाला अतिथी समजून त्याचं सांस्कृतिक विश्व अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी प्रयत्नशील असलेली, आग्रही असलेली 'चतुरंग' ही आता महाराष्ट्राची सांस्कृतिक चळवळच झाली आहे. तिनं आता सीमोल्लंघन करायला हवं. वेगानं बदलत चाललेला आपला देश आणि नवी पिढी अशा अनेक 'चतुरंगी' संस्थांच्या प्रतिक्षेत आहे. 'चतुरंग'च्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

**(लेखक शिक्षणतज्ज्ञ असून मासिक 'जडण-घडण, पुणे'चे मुख्य संपादक आहेत.)**

# खानदेशातील काँग्रेसचा बुलंद आवाज





**बाळासाहेब थोरात**
**काँग्रेस विधिमंडळ पक्ष नेते**

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते , माजी मंत्री रोहिदास पाटील यांच्या निधनाने खानदेशातील काँग्रेस पक्षाचा बुलंद आवाज हरपला आहे. आयुष्यभर ते काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिले. राज्यमंत्री मंडळात विविध खात्यांची मंत्रिपदं त्यांनी समर्थपणे भूषवली. ते खासदार म्हणूनही मोठ्या मताधिक्याने निवडून आले होते. सर्वजण त्यांना दाजीसाहेब म्हणत.

मी १९८५ साली पहिल्यांदा आमदार झालो तेव्हा ते मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात गृह राज्यमंत्री होते. संगमनेरच्या लोकहिताच्या प्रश्नावर ते मला मुख्यमंत्र्याकडे घेऊन जात असत. प्रश्न मार्गी लावण्यासाठी मदत करत. आमची त्याकाळापासून सुरू झालेली मैत्री शेवटपर्यंत होती.

मी पाटबंधारे राज्यमंत्री असताना ते नेहमी माझ्याकडे येत. धुळे जिल्ह्याला वरदान ठरणारे अक्कलपाडा धरण बांधण्यात रोहिदास पाटील यांनी पुढाकार घेतला होता. त्यासंबंधीच्या बैठका माझ्या दालनात होत असत. अक्कलपाडा हे पांझरा नदीवरील धरण. या धरणामुळे धुळे जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्न सुटायला मदत झाली. मला मंत्री म्हणून त्यात काम करायला संधी मिळाली याचं समाधान वाटतं.

मुंबईत राहत असताना सकाळी आम्ही दोघे सोबत पार्कमध्ये चालायला जात असू. त्यांचं व्यक्तिगत आयुष्य खूप शिस्तबद्ध होतं. वेळेवर जेवण, झोप , सकाळी लवकर उठणे, व्यायाम अशी शिस्तशीर दिनचर्या हे त्यांचं वैशिष्ट्य होतं. सर्व गोष्टी वेळच्या वेळी करण्यावर त्यांचा भर असे.

मंत्री असताना प्रशासनात त्यांचा दबदबा होता. लोकहिताचे निर्णय करवून घेण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांनी स्वप्रयत्नाने इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलं होतं. त्यामुळे अधिकारी त्यांना वचकून राहत. त्यांचा लोकांच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास होता.

काही दिवसांपूर्वी रोहिदास पाटील हे आपल्या मुलीकडे कोल्हापूर येथे गेले असतानाच त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांचे फूफ्फूस कमी क्षमतेने काम करत असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात व्हेंटीलेटरवर ठेवण्यात आले होते. कोल्हापूर येथील साई कार्डीयाक सेंटर येथील आयसीयूत डॉ. चंद्रशेखर पाटील आणि कोल्हापूर येथील फूफ्फूस तज्जांनी त्यांच्यावर उपचार केले होते. उपचारानंतर त्यांना दवाखान्यातून डिस्चार्ज देण्यात आला होता. विविध नेतेमंडळी त्यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस करत होती.

त्यांची अलीकडची एक आठवण आहे. काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची दुसऱ्या टप्प्यातील 'भारत जोडो न्याय यात्रा' महाराष्ट्रात आली होती. या यात्रेचा समारोप १७ मार्च २०२४ रोजी मुंबईत झाला. तत्पूर्वी नंदूरबारवरून धुळ्यात यात्रा दाखल होताच राहुल गांधी यांनी पहिली भेट दाजीसाहेब रोहिदास पाटील यांची घेतली. ही भेट देवपूर , धुळे येथील निवासस्थानी जाऊन घेतली. यावेळी राहुल गांधी यांनी "कैसे है दाजी साहब?" असं विचारित त्यांची गळाभेट घेऊन त्यांना आलिंगन दिले होते.

राहुल गांधी यांनी दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या प्रकृतीची व वैद्यकीय उपचाराची माहिती घेतली होती. यावेळी रोहिदास पाटील यांच्या पत्नी लताताई रोहिदास पाटील यांचे राहुल गांधी यांनी श्रीमती सोनिया गांधी यांच्याशी मोबाईलद्वारे बोलणे करून दिले होते. श्रीमती सोनिया गांधी यांनी दाजीसाहेबांच्या तब्येतीची विचारपूस केली होती. यावेळी आमदार कुणाल पाटील, अश्विनीताई कुणाल पाटील, नाना पटोले , डॉक्टर दिलीप पाटील यांच्यासह मी उपस्थित होतो.

धुळे जिल्ह्यात अनेक शैक्षणिक, सामजिक संस्था काढून रोहिदास पाटील यांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली. धुळे (ग्रामीण)चे आमदार कुणाल रोहिदास पाटील हे रोहिदास दाजी यांचा वारसा समर्थपणे पुढे चालवत आहेत.

त्यांच्या मंत्रिपदाच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती तारीख १९ फेब्रुवारी निश्चित करण्याबाबत महत्त्वाची जबाबदारी निभावण्याची संधी त्यांना मिळाली. त्याबद्दल ते नेहमी मनस्वी आनंद व्यक्त करत असत.

काँग्रेस पक्षाला त्यांच्या मार्गदर्शनाची आज गरज असताना ते आपल्यात नाहीत ही उणीव भरून न निघणारी आहे. रोहिदास दाजी पाटील यांना काँग्रेस पक्षातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

## पत्र मानस

### तत्वाची परिसीमा कोणी का बाळगत नाही ?

बदलापूरकरांच्या बदल्याची लोकक्षोभ याचा उद्रेक साऱ्यांनीच पाहिलेला आहे अनेकांनी तो अनुभवला आहे. अक्षय शिंदेचा इन्काऊटर झाला हे कळल्याबरोबर बदलापुरकरांनी आनंद व्यक्त केला. पेढे वाटुन फटाकेसुद्धा वाजवले. हा " असुरी आनंद " आहे. आता तर अक्षय शिंदेचे प्रेतही स्मशानात "अग्नी "द्यायला विरोध केला जात आहे. " मृत्युनंतर सर्व द्वेष, राग, अहंकार नष्ट होतो म्हणतात " पण येथे उलटं घडत आहे. इन्कांउंटर केल्याने सुटलो एकदाचे . आता मते मागायला मोकळीक अशी समजुत सत्ताधाऱ्यांची झालेली आहे. निश्चितपणे सोय झालेली आहे का ? असे म्हटले तर अतिशयोक्तिचे होणार नाही. अर्थात यात न्यायालयाच्या कक्षेत अनेक जण गुंतलेले आहेत यात सुटका झाली असे म्हणता येईल का ? कारण विरोधी पक्षाचे नेते सारखा किस काढीत आहेत. सत्ताधारी हे "विरोधक राजकारण" करीत आहेत. असे चॅनेलवर सुनावत आहेत. अक्षय शिंदेला न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली असती व अमलबजावणी तातडीने झाली असती तर ती लोकांची भावना होती. पण हीच इच्छा सत्ताधाऱ्यांच्या सोयीने चालत नसते." तत्वाची तमा "कोणीच बाळगलेली नाही यात निश्चितपणे " बदला हिच भावना " दिसुन आलेली आहे हेच सकृतदर्शनी दिसुन येत आहे. कोणी काहीही म्हणोत , खरं तर हा बदल्याच्या भावनेचा, उन्मादीपणाचा कळसच निश्चितपणे यात आहे. खरं तर हा " नियतीचा "एक भाग आहे. तो भोगावाच लागणार आहे.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर. अंधेरी**

### भारतमाता सिनेमा सुरु होणार आनंदाची बातमी

लालबाग परिसरातील जुने एक पडदा भारतमाता चित्रपटगृह मराठी चित्रपटाचे माहेरघर म्हणून ओळखले जायचे. या चित्रपटगृहात कमी तिकीट मराठी चित्रपट पाहिले जायचे.मराठी चित्रपट पाहण्यासाठी रसिकांच्या तिकिटासाठी मोठ्या रांगा लागायच्या चित्रपट हाऊस फुल्ल गर्दीत चालायचे.पण सदर चित्रपटगृह अनेक वर्ष बंद होते.व आता त्याचे नूतनीकरण काम वेगाने चालू असल्याचे म्हटले जात आहे.त्यामुळे भारतमाता चित्रपट पुन्हा सुरू होऊन मराठी रसिकांना पर्वणी ठरणार आहे.व पुन्हा एकदा भारतमाता सिनेमा म्हणजे मराठी चित्रपट लागणारे हक्काचे चित्रपटगृह म्हणून पाहिले जाणार आहे

**- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव**

### निराधार आरोप मुळीच करु नये

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे निष्ठावंत शिवसैनिक व खासदार तसेच संपादक असलेले संजय राऊत याना सध्या न्यायालयाने पंधरा दिवसांची साधी कैद आणि काही रक्कम देखील भरावयाची शिक्षा दिलेली आहे. मविआ तसेच शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे याना राज्याचे मुख्यमंत्री बनविण्यात खा. संजय राऊत यांची मोठी भूमिका राहिली आहे. पण या दरम्यान भाजपच्या अनेक मोठ्या नेत्यांना खा.संजय राऊतानी अंगावर घेतले होते म्हणजेच लढा दिला होता आणि या सगळ्यात त्यांना तीन महिने तुरुंगातही जावे लागले होते. भाजपा नेते माजी खा. किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांच्यावर खोटे व निराधार भष्ट्रचाराचे आरोप लावले गेले होते असे सिद्ध झाल्याने आता तरी खा.संजय राऊतांनी चुकीचे व निराधार आरोप कदापि लावू नये असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

५ वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, शनिवार, २८ सप्टेंबर २०२४

## ऋता आव्हाडांनी केली लादेनची कलामांशी तुलना

**मुंब्रा :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि कळवा-मुंब्राचे जितेंद्र आव्हाड यांच्या पत्नी ऋता आव्हाड या वादात अडकल्या आहेत. मुंब्रा येथे एका कार्यक्रमा मार्गदर्शन करत असताना नकळतपणे त्यांनी केलेल्या एका विधानावर आक्षेप घेतला जात आहे. सदर विधानाचा व्हिडीओ एक्स वर व्हायरल झाला असून ऋता आव्हाड यांच्यावर टीका होत आहे. दरम्यान ऋता आव्हाड यांनी या वादानंतर स्पष्टीकरणही दिले आहे. तसेच त्यांच्या विधानाचा चुकीचा अर्थ काढला जात असल्याचेही त्या म्हणाल्या आहेत. मुंब्रा येथे आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात ऋता आव्हाड यांनी एपीजे अब्दुल कलाम आणि ओसामा बिन लादेन यांची जडणघडण कशापद्धतीने झाली याबाबत सांगितले. त्या म्हणाल्या, “ओसामा बिन लादेनचे आत्मचरित्र वाचा. ज्यापद्धतीने एपीजे अब्दुल कलाम घडले, त्याप्रमाणे ओसामा बिन लादेन का घडू शकला नाही? ओसामा आईच्या पोटातून दहशतवादी बनून आला नव्हता.



# श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांचे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात घुसून आंदोलन

प्रतिनिधी
■ ठाणे

श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी गेल्या आठ दिवसांपासून येथील कोर्टनाका चौकात बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. मात्र या कालावधीत त्यांच्या मागण्या समाधानकारक मान्य होत नसल्यामुळे संतापलेल्या या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी संध्याकाळी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत घुसून जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर त्यांनी विविध घोषणा देत आंदोलन केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीसह प्रांगणात या श्रमजीवीच्या कार्यकर्त्यांनी गर्दी करून त्यांच्या मागण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे मुंबईला निवडणूक कामकाजाच्या बैठकीतसाठी मंत्रायात होते. यावेळी कार्यकत्यांनी त्यांच्या दालनासमोर, पायऱ्यांवर बसून टाळ, मृदुंग वाजवत, आंदोलनाचे गाणे गात कार्यालय दणाणून सोडले. ठाणे जिल्ह्यातील तब्बल ४३ गाव पाड्यातील रहिवासी आणि वन पट्ट्यांचे दावेदार एक हजार ५२९ परिवार कुटुंबानी या बेमुदत आंदोलनात सहभाग घेतला आहे. गेल्या आठ दिवसांपासून सुरू असेल्या या आंदोलनाची दखल न घेतल्यामुळे संतापलेल्या या कार्यकर्त्यांनी श्रमजीवीचे जेष्ठ नेत बाळाराम भोईर यांच्या नेतृत्वाखाली या कार्यालयाच्या इमारतीत घुसून आंदोलन छेडले.



सेंट्रल मैदान व पोलीस कवायतीच्या मैदानाजवळील रस्त्यावर या कार्यकर्त्यांनी बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. पण आजच्या आठव्या दिवशी संध्यकाही थेट जिल्हाधिकारी कायार्लयाच्या इमारतीत प्रवेश करून आंदोलन छेडल्यामुळे प्रशासनामध्ये खळबळ उडाली आहे. पहिल्या दिवसापासून विश्राम गृहाजवळील रस्त्यावर हे आंदोलन सुरू आहे. आंदोलक २५ ते ३० चुली पेटवून रस्त्यावरच जेवण तयार खात असत. त्यामुळे त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत असे. याशिवाय प्रशासनाकडून त्यांच्या संपूर्ण मागण्यां गांभीर्याने घेतल्या नसल्याचा आरोप या आंदोलकांकडून केला जात आहे.

## यशवंत सेनेने शिवसेनेचा पाठिंबा काढला

■ ठाणे

धनगर आरक्षण तसेच समाजाच्या विविध मागण्या जाणून घेण्यासाठी जर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वेळ नसेल तर आम्हाला देखील तुमची गरज नाही असे सांगत धनगर समाजासाठी काम करणाऱ्या यशवंत सेनेचे प्रमुख माधव गडदे यांनी शिवसेना शिंदे गटाला दिलेला पाठींबा काढत असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत केली. यशवंत सेनेचे प्रमुख माधव गडदे यांनी शुक्रवारी ठाण्यातील शासकीय विश्राम गृहात पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी यशवंत सेना कोषाध्यक्ष बाळासाहेब मोटे, नवी मुंबई जिल्हाप्रमुख अभिजित कोकरे उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कामाचा धडाका व निर्णय घेण्याची क्षमता पाहून यशवंत सेनेने शिवसेना शिंदे गटाला लोकसभा निवडणुकीत पाठींबा दिला होता. त्याचा परिणाम म्हणून धनगर समाजाने केलेल्या मतदानात कल्याण लोकसभेसह महाराष्ट्रात अनेक खासदार निवडून आले. संपूर्ण महाराष्ट्रात धनगर आरक्षणाचा विषय पेटलेला असताना मुख्यमंत्री शिंदे यांना याकडे लक्ष द्यायला वेळ नाही.

# न्यायालयासाठी आवश्यक पदांना राज्य सरकारची मंजुरी

प्रतिनिधी
■ भाईंदर

मीरा-भाईंदर, जिल्हा ठाणे येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करणे आणि त्याअनुषंगाने पदे मंजूर करण्याबाबत शासन निर्णय महाराष्ट्र सरकारच्या विधी व न्याय विभागाने जारी केला आहे. आता ही पदे नेमण्याची प्रक्रिया पूर्ण करून जानेवारी महिन्यापासून नवीन वर्षात मीरा -भाईंदरचे न्यायालय सुरू होण्याची शक्यता आहे. मीरा-भाईंदर येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करण्यास आणि त्यासाठी आवश्यक असणारी १२ नियमित पदे आणि ४ मनुष्यबळांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

गेली अनेक वर्षे आजपर्यंत मीरा -भाईंदरच्या नागरिकांना ठाणे न्यायालयात जावे लागते. त्यामुळे मीरा- भाईंदरमध्ये स्वतंत्र न्यायालय इमारत मंजूर करून न्यायालयीन इमारतीचे काम मीरारोड येथे पूर्ण करून घेतले. पण न्यायालय चालविण्यासाठी आवश्यक पदांना मंजुरी नसल्याने शहरातील वकील संघटनांनी लक्ष वेधले होते. त्यानंतर सदर शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याच्या अटीच्या अधीन राहून ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करण्याची आणि उपरोक्त मंजूर पदांमधून सदर न्यायालयासाठी पदे उपलब्ध करुन घेण्याची मंजुरी देण्यात आल्याचा शासन निर्णय विधी सल्लागार आणि सह सचिव विलास गायकवाड यांनी काढला आहे. मीरा -भाईंदरमध्ये कोर्ट सुरु व्हावे यासाठी आमदार प्रताप सरनाईक यांनी पाठपुरावा केला आहे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग एक सहाय्यक अधीक्षक १ पद, लघुलेखक एक, वरिष्ठ लिपिक दोन, कनिष्ठ लिपिक चार व बेलीफ तीन अशी एकूण १२ पदे मंजूर केली आहेत. तर दोन शिपाई, एक पहारेकरी आणि एक सफाई कामगार अशी चार पदे ही बाह्य यंत्रणाद्वारे घेण्यात येणार आहेत.

# माहिती अधिकार दिनानिमित्ताने पालिकेत कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी
■ पनवेल

जागतिक माहिती अधिकार दिनानिमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहांमध्ये ‘माहितीचा अधिकार' बाबत कार्यशाळेचे आयोजन आज करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. बापुराव बनसोडे यांनी माहिती अधिकाराबाबत अभ्यासपुर्ण माहिती उपस्थितांना दिली. यावेळी उपायुक्त रविकिरण घोडके, सहायक आयुक्त स्वरूप खारगे, अधिक्षक दशरथ भंडारी, मनोज चव्हाण, राजेश डोंगरे, महापालिका अधिकारी,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दिनांक 28 सप्टेंबर हा जागतिक माहिती अधिकार दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो.या दिवसाचे औचित्य साधून सामान्य प्रशासन विभागाच्यावतीने महापालिकेतील सर्व गट अ, गट ब व गट क अधिकारी-कर्मचारी यांनी 'माहिती अधिकार' बाबत माहिती मिळावी या हेतूने ही कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते बापूराव बनसोडे यांनी माहिती अधिकाराची सुरूवात करण्यामागील हेतू , त्याची गरज याबाबत विस्तृत माहिती दिली. माहिती अधिकारांतर्गत येणाऱ्या आस्थापना, सार्वजनिक आस्थापना, अशासकीय संघाटनांमध्ये माहिती कशा पध्दतीने विचारावी याबाबत माहिती दिली. माहिती अधिकाराच्या अनुषंगाने येणारी कलमे ,अधिनियमाबाबत माहिती दिली.

## ‘लाडकी बहीण’ योजनेसाठी बँकखाते आधारकार्डशी संलग्न करण्याचे आवाहन

**नवी मुंबई :** ‘मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण’या योजने अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महिलांनी अर्ज सादर केले आहेत. ज्या महिलांचे अर्ज पात्र असलेबाबत त्यांना भ्रमणध्वनीवर संदेश (SMS) प्राप्त झाले आहेत. परंतू अद्यापपर्यंत योजनेचा लाभ त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झालेला नाही, अशा महिलांनी आपले बँक खाते आधारकार्डशी संलग्न (आधारसीडेड) असल्याची त्वरित खात्री करून घ्यावी आणि आधार संलग्न केलेले नसल्यास संबंधित बँकेत जावून बँक खाते आधारकार्डशी संलग्न करण्याची कार्यवाही त्वरित करून घ्यावी, असे नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

# ’स्वच्छता ही सेवा’ मोहीमेत उद्यानांचीही सखोल स्वच्छता

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

‘स्वच्छता ही सेवा’ मोहीमेमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील वर्दळीच्या ठिकाणी तसेच दुर्लक्षित ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमा हाती घेण्यात येत असून या अंतर्गत आठ विभाग कार्यालय क्षेत्रातील मोठया उद्यानांमध्येही सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विषयक विविध उपक्रम ‘स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता’ या अभियानात राबविण्यात येत असून उद्यान विभागाचे उपआयुक्त श्री. दिलीप नेरकर यांच्या नियंत्रणाखाली विविध 13 उद्यानांमध्ये लोकसहभागातून सखोल स्वच्छता करण्यात आली. यापुढील काळात इतरही उद्यानांमध्ये स्वच्छता मोहीमा राबविण्यात येणार आहेत.



या स्वच्छता मोहीमेमध्ये उद्यानांतील माळी व बहुउद्देशीय सेवक यांच्यासमवेत उद्यान अधिक्षक, उद्यान सहाय्यक तसेच स्वच्छताकर्मी आणि एनएसएसचे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला व इतर स्वच्छताप्रेमी नागरिक उत्साहाने सहभागी होते. या स्वच्छता मोहीमे अंतर्गत बेलापूर विभागात से 11 सागरविहार, से 2 मँगो उद्यान, डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान या उद्यानांमध्ये स्वच्छता करण्यात आली. नेरुळ विभागातही से 4 येथील नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान, सरदार वल्लभभाई पटेल उद्यान, डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान त्याच प्रमाणे वाशी विभागात से 10 मिनाताई ठाकरे उद्यान, से 9 राजीव गांधी जॉगर्स पार्क याठिकाणी लोकसहभागातून स्वच्छता मोहीम पार पडली. कोपरखैरणे निसर्ग उद्यान याठिकाणच्या स्वच्छता मोहीमेत 250 हून अधिक नागरिक सहभागी झाले. से 22 कोपरखैरणे उद्यान व चिकणेश्वर उद्यान याठिकाणीही लोकसहभागातून स्वच्छता मोहीम पार पडली. घणसोलीतील सेंट्रल पार्क येथेही मोठया संख्येने नागरिक उद्यान स्वच्छता मोहीमेत सहभागी झाले. ऐरोली विभागात दिवागाव तलाव परिसरातील हरितपट्टयाची लोकसहभागातून स्वच्छता करण्यात आली.

# नवरात्र उत्सव मंडळांना अधिकृत वीजजोडणी घेण्याचे महावितरणचे आवाहन

■ कल्याण

सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळांनी सवलतीच्या दराने तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध असलेली अधिकृत वीजजोडणी घ्यावी. तसेच उत्सव मंडळांनी उत्सवातील देखावे, मंडप, रोषणाई व वीज सुरक्षेतील त्रुटीमुळे होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी गांभिर्यपूर्वक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणकडून नवरात्र उत्सव मंडळांना घरगुती वीज ग्राहकांच्या दराने वीजपुरवठा देण्यात येणार आहे. उत्सवाच्या कालावधीत संभाव्य धोके टाळण्यासाठी वीजयंत्रणेची योग्य काळजी घ्यावी. मंडपाची व रोषणाईसाठी विद्युत व्यवस्था व संच मांडणी ही अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घेणे आवश्यक आहे. मंडपातील वीजयंत्रणेचे अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. मंडळाच्या अंतर्गत वायरचे इन्सूलेशन खराब झाल्यास अशा वायर्समधून मंडपाच्या लोखंडी पत्र्यांमध्ये किंवा ओल्या वस्तुंमध्ये विद्युत प्रवाह येऊ शकतो. हा प्रकार टाळण्यासाठी वायर्सचे जोड काढून टाकावेत किंवा योग्य क्षमतेच्या इन्सूलेशन टेपने जोड देण्यात यावा. स्वीचबोर्डच्या मागे प्लायवूड किंवा लाकडी फळी लावावी. विजेच्या लघुदाब, उच्चदाब वाहिनी व रोहित्रांचा नवरात्र उत्सवातील आणि मिरवणुकीतील देखाव्यांना स्पर्श होणार नाही, याची काळजी घ्यावी. उत्सवात वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्युट्रल घेणे अत्यावश्यक आहे. वीजपुरवठा बंद असतांना जनरेटर सुरू केल्यास एकाच न्युट्रलमुळे जनरेटरमधील वीज ही लघुदाब वाहिनीत प्रवाहित होते आणि त्यातून प्राणांतिक अपघात घडतात. नवरात्र उत्सवाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधीत क्षेत्रातील महावितरणचे अभियंता व कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत. तसेच तक्रारींसाठी किंवा तातडीच्या मदतीची गरज भासल्यास २४ तास उपलब्ध असलेल्या १८०० २१२ ३४३५ किंवा १८०० २३३ ३४३५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# वक्तृत्व व निबंध प्रत्येक स्पर्धेत 10 हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी मांडले स्वच्छता विचार

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

स्वच्छता ही नियमित करण्याची गोष्ट असल्याने स्वच्छतेची सवय लागणे महत्वाचे आहे हे लक्षात घेत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई शहराचे भविष्य असणा-या नव्या पिढीच्या मनावर स्वच्छताविषयक विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थीदशेपासूनच स्वच्छतेचे संस्कार रूजविले जात आहेत. या माध्यमातून शहराचे भविष्य स्वच्छ व सुरक्षित केले जात आहे.

त्यानुसार 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणा-या ‘स्वच्छता ही सेवा’ पंधरवड्यामध्ये नमुंमपा शिक्षण विभागाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार व उपआयुक्त श्रीम. संघरत्ना खिल्लारे यांच्या नियंत्रणाखाली शालेय स्तरावर विविध स्पर्धात्मक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जात आहे. या अनुषंगाने नुकत्याच महापालिका शाळांप्रमाणेच खाजगी शाळांमध्येही वक्तृत्व आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होत आपले विचार मांडले.



# दिव्यांग व मतिमंद व्यक्तींसाठी पालिकेमार्फत फिजोओथेरेपी सारख्या सुविधा विनामुल्य

■ कल्याण

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे सुमारे 5,500 दिव्यांग व्यक्तींनी आपली नोंद केलेली आहे. या दिव्यांग व्यक्तींसाठी आतापर्यंत महापालिकेमार्फत फिजीओथेरेपीची कोठलेही सुविधा विनामुल्य स्वरुपात उपलब्ध नव्हती. त्यामुळे महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी सदर बाबीची दखल घेवुन, आता महापालिकेकडे नोंदणीकृत असलेल्या दिव्यांग आणि मतिमंद व्यक्तींना ही सुविधा विनामुल्य उपलब्ध व्हावी, या दृष्टिकोनातून समाज विकास विभागाने काढलेल्या निविदेला महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी मंजुरी दिली असून, या कामाचे कार्यादेश "आधार रिहॅबिलेटेड सर्विसेस" यांना देण्यात आले आहेत.यामुळे ३/क प्रभाग कार्यालया शेजारी असलेल्या महिला कल्याण केंद्राच्या वास्तुमधील तळमजल्यावर हि सुविधा संबंधित लाभार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. सदयस्थितीत ही सुविधा 3 वर्षासाठी उपलब्ध राहणार असून, त्याकरिता रूपये 4,00,75,000/- हजार इतका खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी दिली आहे. या केंद्रांमध्ये Medical Consultation, Orthopedic Consultation, Neurological Consultation, Ayurvedic Consultation, Homeopathic Consultation, Psychological Counselling त्याचप्रमाणे फिजिओथेरपी, शारीरिक उपचार, व्यावसायिक थेरपी (Occupational therapy), स्पीच थेरपी, Activities of Daily Living, Interventional Learning Activties, योग आणि ध्यान, केअरगिव्हर्सना वैयक्तिकृत प्रशिक्षण आणि समुपदेशन हे सर्व विनामुल्य स्वरुपात उपलब्ध होणार आहेत. या उपचारांमुळे व्याधीग्रस्त नागरीकांना/दिव्यांगाना त्यांच्या उपचारांसाठी/ फिजिओथेरपीसाठी महापालिका क्षेत्राबाहेर ठाणे व मुंबई येथे जावे लागणार नाही. महापालिका दिव्यांगासाठी करीत असलेल्या या सोयीसुविधेमुळे दिव्यांग व्यक्तींना नवसंजिवनी प्राप्त होवून, त्यांचे जीवन अधिक गतीमान व आनंदी होण्यास मदत होईल.


## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

### ई-निविदा सुचना

कार्यकारी अभियंता (शहर) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४८४) हे जिल्हा उप निबंधक/शहर / मुंबई शहर जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण ३४ कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक ३०.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून दिनांक ०७.१०.२०२४ सायंकाळी ५.३५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर), मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

CPRO/A/ 807
Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

म्हाडा - गृहनिर्मान क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

### ई-निविदा सुचना

कार्यकारी अभियंता (पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी / एमईएस/मुंबई महानगरपालिका /सिडको रेल्वे बीपीटी / एमआयडीसी एम. जे. पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण १ कामांकरीता बी-१ (Percantage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | २८/०९/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदापूर्व बैठक | ०१/१०/२०२४ दुपारी ३:३० वाजता |
| ३ | निविदा विक्री बंद | ०५/१०/२०२४ दुपारी ६:१५ वाजता | ४ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०७/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |
| ५ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | ०९/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर | | | |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

CPRO/A/ 791
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (प),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई



## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
म्हाडा MHADA

### ई- निविदा सुचना

कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३ यांनी खाली दर्शविलेल्या कामाकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था कडून बी-१ (टक्केवारी नमुन्यात) ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचे अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कामगार सहकारी संस्थेचा नोंदणी वर्ग | निविदा रक्कम (१२% GST सहीत) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी.एम.जी.पी. इमारत विकास दर्शन ई-२ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील बाह्य व अंतर्गत संरचनात्मक काम. | ४९,५५,८४६/- | निरंक | १५,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातून कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळयाचा कालावधी धरुन) |
| २. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी. एम.जी.पी. इमारत तिरंगा बि-विंग ई- २ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील बाह्य व अंतर्गत संरचनात्मक काम. | ४९,६०,६९४/- | निरंक | १५,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातून कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळयाचा कालावधी धरुन) |
| ३. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी. एम.जी.पी. इमारत ओम नम शिवाय ए विंग ई- २ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील बाह्य व अंतर्गत संरचनात्मक काम. | ४९,७३,३०६/- | निरंक | १५,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातून कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळयाचा कालावधी धरुन) |
| ४. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी.एम.जी.पी. इमारत ओम नम शिवाय बि-विंग ई- २ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील बाह्य व अंतर्गत संरचनात्मक काम. | ४९,७६,७१७/- | निरंक | १५,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातून कपात) | वर्ग-अ | | १८ महिने (पावसाळयाचा कालावधी धरुन) |
| ५. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी. एम.जी.पी. इमारत तिरंगा ए विंग ई- २ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील बाह्य व अंतर्गत संरचनात्मक काम. | ४९,८०,२३४/- | निरंक | १५,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातून कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळयाचा कालावधी धरुन) |

| अ. क्र. | स्टेज | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | जाहिरात दिनांक | ३०/०९/२०२४ सकाळी १०:०० वाजता |
| २. | निविदा विक्री सुरू | ३०/०९/२०२४ सकाळी १०:०५ वाजता |
| ३. | निविदा विक्री बंद | ०७/१०/२०२४ सायंकाळी १७:३० वाजेपर्यंत |
| ४. | निविदा स्विकृती सुरू | ३०/०९/२०२४ सकाळी १०:०५ वाजता |
| ५. | निविदा स्विकृती अंतिम दिनांक | ०७/१०/२०२४ सायंकाळी १७:३५ वाजेपर्यंत |
| ६. | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०९/१०/२०२४ सकाळी ११:०० वाजता |
| ७. | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | ०९/१०/२०२४ सकाळी ११:०० वाजता |

१) संपूर्ण निविदा पध्दती ही ऑनलाईन स्वरूपाची राहील. त्याबाबतच्या सर्व सुचना, अटी व शर्थी http://mahatenders.gov.in MHADA Website-http://mhada. maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिध्द केल्या जातील.
२) निविदा विषयीची कागदपत्रे दि. ३०/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०५ नंतर ते ०७/१०/२०२४ सायंकाळी १७:३० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करू शकता येतील.
३) निविदा अर्जाची रक्कम तसेच इसारा रक्कम ऑनलाईन भरणे आवश्यक राहील.
४) तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक ०९/१०/२०२४ सकाळी ११:०० वाजता व आर्थिक बोली उघण्याचा दिनांक ०९/१०/२०२४ सकाळी ११:०० वाजता कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३, यांचे दालनात उघडल्या जातील.
५) निविदाकारांनी ई निविदेद्वारे अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती तांत्रिक बोली उघण्याच्या वेळेस खातरजमा करण्याकरीता सादर करणे आवश्यक राहील.
६) निविदाकारांनी तांत्रिक बोली मध्ये नमूद कागदपत्रे पीडीएफ फॉर्मेट मध्ये तांत्रिक बोलील्या लिफाफ्यात सादर करावीत.
७) निविदाकारांकडे वर्ग ॥ / || मान्यताप्राप्त प्राधिकारणाकडून मिळविलेली डीजीटल सिग्नेचर प्रमाणपत्रे असणे आवश्यक राहील.
८) कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, यांचेकडे (निविदा स्विकृती अधिका-यांकडे) निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राहील.
९) निविदाकारांनी जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक आहे
१०) ई निविदा कागदपत्रे व ई निविदा विषयक मार्गदर्शक सुचना http://mahatenders.gov.in, या संकेत स्थळावरून डाऊनलोड करता येतील. मदतीसाठी : १८००-३०७०-२२३२ Mail eproc. support@maharashtra.gov.in
११) जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा- यांनी अतिरिक्त सुरक्षा अमानत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्यांची निविदा मंजूर केली जाईल अतिरिक्त सुरक्षा अमानत बाबत सविस्तर सुचना पहावी

CPRO/A/800
Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, (अ.का.)
मुं. इ. दु. व पू. मंडळ, मुंबई

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

## शक्तिपीठ महामार्ग रद्दसाठी शेतकऱ्यांकडून सरकारचे 'महाळ'

**सांगली :** शक्तिपीठ महामार्ग रद्द झाला पाहिजे, या प्रमुख मागणीकडे राज्य सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शुक्रवारी (दि. २७) सांगलीतील स्टेशन चौकात सरकारचे महाळ घातले. तसेच राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणाचा शेतकऱ्यांनी तीव्र शब्दात निषेध केला. शक्तिपीठ महामार्गाबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उलट-सुलट विधाने करून बाधित शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहेत. म्हणून महाराष्ट्र सरकारचे स्टेशन चौकात महाळ घालून निषेध केला. यावेळी ५०० शेतकऱ्यांना जेवण देण्यात आले. त्याअगोदर प्रभाकर तोडकर यांनी शासनाच्या प्रतीकात्मक प्रतिमेला हार घालून विधिवत पूजा केली. त्यानंतर उपस्थित शेतकऱ्यांनी घोषणा देऊन सरकारचा निषेध करून उपस्थित शेतकऱ्यांना भात, आमटी आणी शिरा असे जेवण दिले. महाराष्ट्र सरकारमधील मंत्री एका बाजूस महामार्ग रद्द झाला आहे, असे सांगत आहेत. दुसऱ्या बाजूस मुख्यमंत्री शिंदे हे फक्त नांदेड, कोल्हापूरचा विरोध आहे, असे विधान करत आहेत.



# जरांगेंनी उमेदवार न दिल्यास शरद पवारांच्या इशाऱ्यावर आंदोलन चालत होते हे स्पष्ट

**प्रतिनिधी**

**■ सांगली**

शरद पवारांचे खरे स्वरुप समोर आले आहे. ते फक्त मराठा नेते झाले आहेत. मनोज जरांगे यांच्या ओबीसीमधून आरक्षण द्या या मागणीला ते आतापर्यंत टाळत आले, मात्र रत्नागिरी येथे त्यांनी या मागणीला पाठिंबा दिला. त्यामुळे जरांगे यांच्या आंदोलनाला राजकीय पाठिंबा हा शरद पवारांचा असल्याचे उघड झाले असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. मनोज जरांगे यांनी जर मराठा समाजाचे उमेदवार आगामी विधानसभेत उभे केले नाही तर ते शरद पवारांच्या सांगण्यावरुनच काम करतात हे सिद्ध होईल, असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार हे मनोज जरांगे यांची मागणी एवढे दिवस सफाईने टाळत होते. रत्नागिरी येथील पत्रकार परिषदेत मात्र त्यांनी जरांगेंच्या मागणीला पाठिंबा दिला. त्यामुळे ओबीसी नेते जो आरोप करत होते की शरद पवार फक्त मराठ्यांचे नेते आहेत. यावर आता शिक्कामोर्तब झाला आहे, असा आरोप प्रकाश आंबेडकरांनी केला.

ते म्हणाले की, "मराठवाड्यात मनोज जरांगे आणि ओबीसी असा संघर्ष सुरु आहे. महाराष्ट्रातील इतर भागात तो दिसत नसला तरी मानसिक संघर्ष आहे. विधानसभा निवडणुकीनंतर ओबीसींनी आरक्षण जाण्याची भीती आहे. उद्धव ठाकरे देखील ओबीसींचे आरक्षण मराठ्यांना देण्यासाठी अनुकूल आहेत. मनोज जरांगे यांनी जर निवडणूक लढली नाही तर ते पवारांच्या इशाऱ्यावर काम करतात हे सिद्ध होईल." प्रकाश आंबेडकर म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत संविधानाचा मुद्दा पुढे करुन इंडिया आघाडीने दलित आणि मुस्लिमांची मते घेतली. आरक्षण हा घटनेतील महत्त्वाचा मुद्दा आहे. हिंदू धर्मशास्त्रानुसार जसा शरीर आणि आत्मा असते तसाच आरक्षण हा संविधानाचा आत्मा आहे. तो आत्माच इंडिया आघाडी काढून घेण्याचे काम करत असल्याचे गंभीर आरोप प्रकाश आंबेडकरांनी केला. त्यामुळे हा समाज येत्या विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीच्या बाजूने उभा राहील असे वाटत नसल्याचे आंबेडकर म्हणाले.

## गोंड गोवारी समाजाचे आंदोलन

**■ नागपूर**

नागपूरातील आदिवासी गोंड गोवारी जमातीच्यावतीने आमरण उपोषण करण्यात येत आहे. आज या उपोषणाच्या सातव्या दिवशी जेल भरो आंदोलन करण्यात आलं. यावेळी पोलिस आणि आंदोलकांमध्ये धरपकड झाली. गोंड गोवारी जमातीला एसटीचे लाभ मिळावे, या मागणीसाठी किशोर चौधरी, सचिन चचाने आणि चंदन कोहरे आमरण उपोषणावर बसले आहेत. २९ सप्टेंबरपासून नागपूरातील संविधान चौकात हे आमरण उपोषण सुरु आहे. जानेवारी महिन्यातंही कार्यकर्त्यांनी उपोषण केलं होतं. सरकारच्या आश्वासनानंतर उपोषण सोडण्यात आलं होतं. आता वडणे समितीचा अहवाल सादर करावा यासह इतर मागण्यांना धरून आज जेल भरो आंदोलन करण्यात आलं.

# मुंबई गोवा महामार्ग येत्या डिसेंबरमध्ये पुर्ण होणार - उद्योगमंत्री उदय सामंत

**प्रतिनिधी**

**■ रत्नागिरी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम येत्या डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचा विश्वास रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला आहे. मात्र या महामार्गाचे काम पूर्ण होण्यास आनखी दोन वर्ष जातील असे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी यापुर्वीच जाहीर वक्तव्य केले आहे. त्यामुळे मुंबई गोवा महामार्गाचे काम कधी पुर्ण होणार याकडे कोकण वासियांचे लक्ष लागून राहिले आहे. मुंबई गोवा महामार्गाचे काम २०१२ पासूनच सुरू आहे. ठेकेदारांच्या पळपुटेपणामुळे हा महामार्ग रखडला असून त्याला एकच सरकार जबाबदार नाही. असे उद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.



ते म्हणाले, मुंबई-गोवा महामार्ग हा 'बीओटी' तत्त्वावर बांधला जाणार होता. मात्र, नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाल्यानंतर या महामार्गासाठी केंद्र शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे. परंतु, ठेकेदारांच्या पळपुटेपणामुळे हा मार्ग रखडला. केंद्र व राज्य शासनातील मंत्र्यांनीही या मार्गाबाबत अनेकदा खंत व्यक्त केली असताना आपल्यालाही हा महामार्ग लवकर व्हावा, असे वाटत आहे. राष्ट्रवादी पक्षाचे नेते शरद पवार यांनी चिपळूणमध्ये महामार्ग व कामाबाबत शंका व्यक्त केली होती. याबाबत त्यांना चुकीच्या पद्धतीने माहिती पुरवली गेली असावी, अशी सामंत यांनी शंका व्यक्त केली. काहीही झाले तरी विधानसभा निवडणुका महायुती एकत्रच लढणार आहे. यात शंका नाही. महायुतीमधील राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्याशी शिवसेना व भाजपाच्या नेत्यांचे 'बाँडिंग' चांगले असल्याचे मत सामंत यांनी व्यक्त केले. आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती म्हणूनच सामोरे जाणार आहोत. रत्नागिरी जिल्ह्यात पाचही आमदार हे महायुतीचे विजयी होणार आहेत, असा विश्वास सामंत यांनी व्यक्त केला.

# महायुतीच्या वतीने कणकवलीत 5 ऑक्टोबरला आरक्षण बचाव रॅली

**प्रतिनिधी**

**■ कणकवली**

देशाचे विरोधी पक्ष नेते व काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेमध्ये एका कार्यक्रमात काँग्रेसची सत्ता आली तर भारतामध्ये जी आरक्षण व्यवस्था आहे, ती संपवून टाकू, असे वक्तव्य केले होते. राहुल गांधींच्या या प्रवृत्तीचा आणि विचाराचा आम्ही विरोध करणार आहोत. त्यामुळे कणकवली येथे भाजपा, शिंदेसेना, आरपीआय (आठवले गट), राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या महायुतीच्या पक्षांच्यावतीने ५ ऑक्टोबरला आरक्षण बचाव रॅली काढण्यात येणार आहे अशी माहिती आमदार नितेश राणे यांनी दिली.

कणकवली येथे गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आरपीआय (आठवले गट) जिल्हाध्यक्ष अजितकुमार कदम, भाजप अनुसूचित सेल जिल्हाध्यक्ष नामदेव जाधव, किरण जाधव,



भाजपा मंडल अध्यक्ष मिलिंद मेस्त्री आदी पदाधिकारी उपस्थित होते. नितेश राणे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानानुसार जो आरक्षणाचा हक्क दिलेला होता, तो संपूर्ण संपुष्टात आणण्याचे काम राहुल गांधींनी केलेले आहे. वर्षानुवर्षे आमचा हा समाज या हक्काने वावरतो आहे. शिक्षण, नोकरी आणि विविध स्तरांमध्ये त्यांना जो अधिकार मिळतो आहे, तो काढून घेण्याचे आणि आरक्षण संपवण्याचे काम राहुल गांधींच्या काँग्रेसच्या माध्यमातून होताना दिसत आहे. त्यामुळे जेव्हा असा प्रयत्न होईल, तेव्हा त्याला तीव्र विरोध केला जाईल.

# शेतकरी खरा हिरो, त्यांनी आत्महत्या करु नये - कपिल देव

**प्रतिनिधी**

**■ नांदेड**

शेतकरी आमच्यासाठी हिरो आहेत. शेतकऱ्यांनी आत्महत्या केले की मला फार वाईट वाटतं, शेतकऱ्यांनी परिस्थितीशी लढून नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे, असे आवाहन भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि दिग्गज खेळाडू कपिल देवयांनी केलं आहे. नांदेड येथील एका खाजगी कृषी कंपनीच्या कार्यक्रमाला कपिल देव यांनी नांदेडमध्ये हजेरी लावली होती. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी हे भाष्य केलं आहे.

देशातील शेतकरी सगळयांना अन्नपुरवठा करतात. मात्र, शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे जेव्हा मी ऐकतो अथवा वाचतो तेव्हा मला फार वाईट वाटतं. वाईट काळ येतो तेव्हा आपण पण शेतकऱ्यांनी धीर धरला पाहिजे, आयुष्यात प्रत्येकाने धिराने लढलं पाहिजे. शेती पिकाच्या भाव वाढीबाबत लक्ष द्यावे लागेल. शेतकरी कष्ट करून संपूर्ण देशाचे पोट भरतात,





त्यांना त्रास होत असेल तर आपल्या सगळयांना वाईट वाटलं पाहिजे. असेही कपिल देव यावेळी म्हणाले.

देशातील शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाकडे वळले पाहिजे. एखादी कंपनीने काही चुकीचे केल असेल तर सगळ्या कंपन्यांना आपण चुकीचं ठरवू शकत नाही. हिंदुस्थानात शेतकरी आणि सैनिक त्यांच्यापेक्षा मोठा कोणी नाही. शेतकऱ्यांना मी एवढं सांगेल पूर्ण देशाचे पोट तुम्ही भरता. तुम्ही नाहीतर आम्ही नाही, जेवढे कष्ट शेतकरी आणि सैनिक करतात तेवढे कष्ट कोणीही करत नाही. खऱ्या अर्थाने आमच्यासाठी शेतकरी हिरो आहेत. सरकार सरकारचं काम करेल, आपण काय करतो हे पाहणं महत्त्वाचं आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्यात बदल घडवण्यासाठी सकारात्मक बातम्या देणेही गरजेचे असल्याचे मत कपिल देव यांनी यावेळी बोलताना व्यक्त केलं आहे.

# अजित पवारांची कोकणातील दौरा संपताच आठ नगरसेवकांनी मांडली वेगळी चूल

**प्रतिनिधी**

**■ रत्नागिरी**



कोकणात घडणाऱ्या राजकीय घडामोडी या महत्त्वाच्या आहेत. मुख्यबाब म्हणजे राज्याच्या राजकारणात कोकणाला असलेलं महत्त्व देखील सध्या अधोरेखित होत आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कोकणात नेत्यांचे दौरे वाढले आहेत. शक्ती प्रदर्शन, सभा यांनी सध्या कोकणचं राजकीय आभाळ भरून गेलं आहे. मतदारसंघावर होत असलेले दावे - प्रतिदावे, शक्ती प्रदर्शन यांनी साऱ्या गोष्टी ढवळून निघत आहेत. कोकणात प्रत्येक पक्ष आपली ताकद आजमवणे आणि दाखवण्याच्या मागे लागला आहे. त्यात दोन्ही राष्ट्रवादी देखील कुठं मागे नाहीत. शरद पवार आणि अजित पवार यांनी नुकताच कोकण अर्थात चिपळूण - संगमेश्वर या मतदारसंघाचा दौरा केला. या ठिकाणी असलेले विद्यमान आमदार शेखर निकम सध्या अजित पवार यांच्यासोबत आहेत. तसं म्हटलं तर राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद कोकणात फार मोठी नाही. पण, चिपळूण - संगमेश्वर मतदारसंघातील उमेदवारी, विजय यासाठी सध्या दोन्ही बाजूनं जोर लावला जात आहे. अजित पवार यांच्या दौऱ्यानंतर शरद पवार यांचा देखील दौरा झाला. पण, अजित पवार यांची पाठ फिरताच कोकणात त्यांना मोठा धक्का बसला आहे. दापोली नगरपरिषदेतील आठ पैकी सात नगरसेवकांनी थेट आपला वेगळा गट स्थापन केला आहे. त्यामुळे त्यांच्या आगामी राजकीय भूमिकेकडे सध्या सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.

उपनगराध्यक्ष खालिद रखांगे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या सात नगरसेवकांनी मांडलेली वेगळी चूल सध्या राजकीय चर्चेचा विषय आहे. कारण, हा धक्का अजित पवार यांच्यासह सुनिल तटकरे यांना देखील मानला जातो. तटकरे या मतदारसंघाचे आमदार आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर नगरसेवकांनी घेतलेली भूमिका राष्ट्रवादी काँग्रेससाठी धक्का मानला जात आहे. अद्याप तरी या नगरसेवकांनी आपली राजकीय भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे या घडामोडीकडे कोकणचं लक्ष लागून राहिलं आहे. अजित पवार यांना हा एक धक्काच मानला जात आहे.

# पंढरपूरमध्ये दिवाळी खरेदीचे एकाच छताखाली आयोजन

## दिवाळीनिमित्त मनसे आणि वीरशैव महिला मंडळ यांचा नाविन्यपूर्ण उपक्रम जाहीर

**प्रतिनिधी**

**■ पंढरपूर**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना व आद्य वीरशैव महिला मंडळ पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील महिला उद्योजकांसाठी पंढरपूर मध्ये भव्य असा एक्सपो घेऊन दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता यावी. या हेतूने दिवाळीनिमित्त नाविन्यपूर्ण उपक्रम येथील टिळक स्मारक मैदानावर दिनांक १९,२० ऑक्टोबर २०२४ रोजी भरवण्यात आला आहे. यामध्ये भाग घेणाऱ्या महिला उद्योजकांसाठी मोफत स्टॉल व स्टॉल उभारण्यासाठी विना व्याज कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त



महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी स्टॉलची बुकिंग करावी असे आवाहन मनसे नेते दिलीपबापू धोत्रे आणि डॉक्टर शोभा कराळे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केले आहे.

यावेळी मनसेचे पदाधिकारी व आद्य वीरशैव महिला मंडळाचे अध्यक्ष डॉ. शोभा कराळे, सुवर्णा स्वामी, आरती पावले, कविता पावले, विशालाक्षी पावले, संजीवनी ठीगळे,मनीषा वासकर, अनुराधा स्वामी उपस्थित होत्या. पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा. नागरिकांना दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता यावी. या हेतूने महाराष्ट्र नवनिर्माण सेना व आद्य वीरशैव महिला मंडळाच्या वतीने पंढरपुरात प्रथमच दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता येणार आहे. या एक्सपो मध्ये २०० स्टॉल उभारण्यात येणार असून यामध्ये भाग घेणाऱ्या महिलांना नाम मात्र नोंदणी फी १०१ ठेवण्यात आली आहे. भाग घेणाऱ्या महिला भगिनींना मोफत सुसज्ज स्टॉल दिले जाणार आहेत. तसेच महिलांना २५ हजार रुपये स्टॉल उभारण्यासाठी कर्ज स्वरूपात देण्यात येणार आहे. हे कर्ज एक्सपो संपल्यानंतर भरावे लागणार आहेत. याला कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. यामध्ये भाग घेणाऱ्या महिलांना नाव नोंदणी ५ ऑक्टोबर पर्यंत करता येणार आहे.

## श्रीक्षेत्र सुदुंबरे समाधी मंदिर विकासासाठी 66 कोटींचा निधी

**■ पुणे**

श्री संत संताजी महाराजांचे श्रीक्षेत्र सुदुंबरे येथील समाधी मंदिर विकास कार्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून ६६.११कोटी निधी मंजुर झाला आहे. या तिर्थक्षेत्र व पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत विकास आराखड्या नुसार विकासकामाचे भूमिपूजन शुक्रवार,दि.४ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजता सुदुंबरे तालुका चाकण जिल्हा पुणे येथे होणार आहे भूमिपूजन सोहळयाचे साक्षीदार सर्वांनी व्हावे असे आवाहन श्री संत संताजी जगनाडे महाराज महासंघ प्रसिद्धी प्रमुख श्री दिलीप खोंड यांनी मुंबईमध्ये मीटिंग घेऊन केले आहे सदर मिटिंग मध्ये अध्यक्ष श्री मधुकर नेराळे दत्ताजी कहाणे देवीदास राऊत सुभाष कसाबे विजय निगडकर इतर समाज मुख्य प्रतिनिधी उपस्थित होते

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**
(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना**

**Main Portal : https://mahatenders.gov.in,**
**MHADA Portal :https://mhada.gov.in**

कार्यकारी अभियंता (फ/ उत्तर) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, सोनावाला बिल्डींग, नं. ८, शंकर आबाजी पालव मार्ग, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४, यांचेकडे मुंबई शहर जिल्हा अंतर्गत Deputy District Registar यांचेकडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या म्हाडा नोंदणीकृत पात्र मजुर सहकारी संस्थांकडुन एकुण ०५ कामाकरीता बी - १ ( Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

निविदा विक्री आणि स्विकृती दि. ३०/०९/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता सुरु होऊन दि.०७/१०/२०२४ रोजी संध्याकाळी ०४ वाजता बंद होईल. तांत्रिक बोली दि. ०८/१०/२०२४ रोजी दुपारी ४:०० नंतर उघडण्यात येतील. तसेच पात्र निविदाची आर्थिक बोली दि. ०९/१०/२०२४ रोजी सकाळी १०.३० नंतर उघडण्यात येतील.

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवले आहेत. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिपः १ विस्तृत ई-निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

टिपः२ निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

CPRO/A/ 783

Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता फ/ उत्तर विभाग
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

म्हाडा - गृहनिर्मान क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

# 'राजकोट पुतळा' भ्रष्टाचाराबाबतचे पुरावे द्या पोलिस अधिकाऱ्यांची वैभव नाईकांना नोटीस

**प्रतिनिधी**

**■ मालवण**

राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आमदार वैभव नाईक यांनी शिंदे - फडणवीस सरकारवर आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री व अधिकाऱ्यांवर केला आहे. त्या पार्श्वभूमीवर कणकवली उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी वैभव नाईक यांना त्यांनी केलेल्या आरोपांबाबत उपलब्ध पुरावे चार दिवसात सादर करून तपासात सहकार्य करण्याची विनंती केली आहे. दरम्यान, आमदार वैभव नाईक यांनी त्या नोटिसीला उत्तर दिले आहे. त्याबाबतचे पत्र त्यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी यांना इमेल केले आहे.

या पत्रात म्हटले आहे कि, मालवण- राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा कोसळल्या प्रकरणी झालेल्या भ्रष्टाचाराबाबत आपण माझ्याकडे माहिती मागविली आहे. छत्रपतींच्या पुतळ्याचे काम नौदलाने केले असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री आणि अधिकाऱ्यांनी प्रसार माध्यमांसमोर जाहीर केले आहे. मात्र, पुतळा





सुशोभिकरण आणि नौदल दिनाचा खर्च अनुक्रमे सार्वजनिक बांधकाम विभाग ,कणकवली यांनी २.५ कोटी रुपये, आणि जिल्हा नियोजन सिंधुदुर्ग यांनी ५.५ कोटी रुपये खर्च केला असल्याची लेखी माहिती मला संबंधित विभागाकडून प्राप्त झाली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे नौदलाचे हे काम असेल तर सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली, आणि जिल्हा नियोजन सिंधुदुर्ग यांनी केलेला खर्च कुठे गेला? याबाबत प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे नौदल दिनानिमित्त नौसेनेने केलेल्या खर्चाचा तपशील देण्याबाबत नौसेना अधिकाऱ्यांशी मी पत्रव्यवहार केला आहे. नौसेनेने अद्याप याबाबत माहिती दिलेली नसून नौसेनेकडून ती माहिती मिळताच त्याबाबतची माहिती आपल्याला देण्यात येईल.

हा अत्यंत संवेदनशील विषय असून महाराष्ट्रात घडणाऱ्या अशा संवेदनशील विषयात पोलिस अधिकाऱ्यांकडून केलेल्या कारवाईची माहिती प्रसारमाध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहोचवली जाते. मात्र,राजकोट पुतळा प्रकरणातील केलेला तपास, अटक केलेले आरोपी जयदीप आपटे, चेतन पाटील यांनी दिलेले जबाब, अन्य संशयित आरोपींना अटक कधी होणार ? याबाबत कोणतीच माहिती प्रसारमाध्यमांना आणि जनतेला आपण दिलेली नाही. त्या प्रकरणाबाबत केलेल्या कारवाईची सविस्तर माहिती जनतेसाठी लवकरात लवकर जाहीर करावी. असेही वैभव नाईक यांनी पत्रात म्हटले आहे.

**MUMBAI HOUSING & AREA DEVELOPMENT BOARD**
**A REGIONAL UNIT OF**
**(MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHROITY)**

म्हाडा MHADA

Ref. No.: EE/Elec/MB/20/2024-25

**e-TENDER NOTICE**

The Executive Engineer (Electrical) Division, M.H.& A.D. Board, Room No. 368, 2nd Flr., Griha Nirman Bhavan, Bandra (E), Mumbai-400051. (Unit of Maharashtra Housing & Area Development Authority) invite sealed tenders in B-1 form (percentage rates) for Mumbai Slum Improvement Board work from the Original Manufacturer or their authorized agency or Electrical contractor having Electrical contractor License and experience of such type of work. And qualitfying eligibility criteria given in tender document.

| e-tender no. | Name of Work | Estimated cost Without GST | E.M.D 1% of Estimated cost | Security Deposit 2% of Estimated cost | Registration (Class) of Electrical contractor | Tender price (including 18% GST) in Rs | Time limit for Completion of Work |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Providing Solar Mini High Mast for various places at Kandivali (East), Mumbai | 20,92,730.00 | 20930.00 | 42000/- (50% initially & 50% through Bill | Original Manufacturer or their authorized agency or Electrical Contractor having Electrical Contractor License and experience of such type of work. | Rs. 590.00 | 3 months (including monsoon) |
| 2. | Providing IP Based CCTV Surveillance System at Samarth CHS, Hanuman. Nagar, Kandivali East, Mumbai | 13,49,120.00 | 13450.00 | 27000/- (50% initially & 50% through Bill | Original Manufacturer or their authorized agency or Electrical Contractor having Electrical Contractor License and experience of such type of work. | Rs. 590.00 | 3 months (including monsoon) |
| 3. | Providing IP Based CCTV Surveillance System Road no. 2 & 3, Lokhandwala, Kandivali East, Mumbai | 16,86,304.00 | 16865.00 | 33800/-(50% initially & 50% through Bill | Original Manufacturer or their authorized agency or Electrical Contractor having Electrical Contractor License and experience of such type of work. | Rs. 590.00 | 3 months (including monsoon) |
| 4. | Providing Solar Street Lights for various places at Vadarpada, Kandivali East, Mumbai | 8,25,036.00 | 8250.00 | 16500/- (50% initially & 50% through Bill | Original Manufacturer or their authorized agency or Electrical Contractor having Electrical Contractor License and experience of such type of work. | Rs. 590.00 | 3 months (including monsoon) |
| 5. | Providing IP Based CCTV Surveillance System at various places in Borivali Mumbai | 8,43,209.00 | 8432.00 | 17000/- (50% initially & 50% through Bill | Original Manufacturer or their authorized agency or Electrical Contractor having Electrical Contractor License and experience of such type of work. | Rs. 590.00 | 3 months (including monsoon) |
| 6. | Providing IP Based CCTV Surveillance System. at various places in Kandivali Mumbai | 8,43,209.00 | 8432.00 | 17000/- (50% initially & 50% through Bill | Original Manufacturer or their authorized agency or Electrical Contractor having Electrical Contractor License and experience of such type of work. | Rs. 590.00 | 3 months (including monsoon) |
| 7. | Providing IP Based CCTV Surveillance System. at various places in Dahisar Mumbai | 8,43,209.00 | 8432.00 | 17000/- (50% initially & 50% through Bill | Original Manufacturer or their authorized agency or Electrical Contractor having Electrical Contractor License and experience of such type of work. | Rs. 590.00 | 3 months (including monsoon) |

| Sr.No. | Stage Dese | Date of time period |
|---|---|---|
| 1 | Published Date | 30/09/2024 |
| 2 | Documents sale start | 30/09/2024 at 10.30 A.M. |
| 3 | Documents sale end | 06/10/2024 at 03.00 P.M. |
| 4 | Bid Submission start | 30/09/2024 at 10.35 A.M. |
| 5 | Bid Submission end | 06/10/2024 at 03.00 P.M. |
| 6 | Technical bid opening | 07/10/2024 at 04.00 P.M. onward |

The complete bidding process will be online (e-tendering) in two bid system. All further notifications / information and detailed terms and conditions regarding this tender notice hereafter will be published online on website https://mahatenders.gov.in. Corrigedum / Addention if any will be published on the website only.

CPRO/A/809

MHADA-Leading Housing Authority in the Nation

Follow us:@mhadaofficial

SD/-
Executive Engineer
Electrical Division/Mumbai Board
MHADA

## माझी माऊली चषक मोफत शालेय कॅरम स्पर्धा 3 ऑक्टोबरपासून

**मुंबई :** सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळ-जेजे व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे आंतर शालेय १६ वर्षाखालील मुलांची विनाशुल्क कॅरम स्पर्धा ३ ते ११ ऑक्टोबर दरम्यान दैवत रंगमंच, जे.जे. हॉस्पिटल कंपाऊंड, भायखळा-पूर्व येथे आयोजित करण्यात आली आहे. विजेत्या-उपविजेत्यांना एकूण १६ आकर्षक चषक-मेडल पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती नवरात्र महोत्सव मंडळाचे सरचिटणीस भूषण परुळेकर यांनी दिली. शालेय मुख्य कॅरम स्पर्धे अगोदर मुंबई व इतर जिल्ह्यातील शालेय खेळाडूंना स्पर्धात्मक सराव मिळण्यासाठी यंदा देखील २४वी शालेय कॅरम स्पर्धा भरविण्यात आली आहे. सबज्युनियर कॅरमपटूना प्रोत्साहन देण्यासाठी चॅम्पियन कॅरम बोर्डावर दर्जेदार स्पर्धेचे पूर्णपणे मोफत आयोजन करण्यात येणार आहे. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या शालेय खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा मंडळाचे कार्यवाह चंद्रकांत करंगुटकर (९९८७८ ३१६२२) यांच्याकडे २९ सप्टेंबरपर्यंत संपर्क साधण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष कृष्णा रेणोसे यांनी केले आहे.




## कार्याध्यक्ष चषक 2024 स्पर्धा खडकवाडी चॅम्पियन टीमने जिंकली



प्रतिनिधी
■ मुंबई

कांगोरीगड क्रिकेट क्लब कामथे विभाग अंतर्गत कार्याध्यक्ष चषक 2024 पावसाळी क्रिकेट स्पर्धा 2024 भरवण्यात आली होती. आई गावदेवी बोरघर यांच्या माध्यमातून क्रिकेट स्पर्धेचे घाटकोपर भटवाडी येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उदघाटन माजी नगरसेवक दिपक बाबा हांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाखाप्रमुख मंगेश भोर , माजी सरपंच नरेश सुतार, सदस्य पपू पार्टे, महादेव पार्टे, प्रमोद उतेकर , सचिन कदम , कार्याध्यक्ष नामदेव पार्टे उपस्थित होते.

या स्पर्धेत एकूण 16 संघाने सहभाग घेतला होता. या स्पर्धेत खडकवाडी चेंपियन टीमने कार्याध्यक्ष चषकावर आपले नाव कोरले. तर शिवशंभू अडावले हा संघ उप विजेता संघ ठरला. जय भवानी स्पोर्ट्स क्लब पांगुळवाडी हा संघ तृतीय आणि काळभैरवनाथ युवा मंच मोरसडे आडाचाकोडं हा संघ चतुर्थ संघ ठरला. मालिकावीर तेजस करंजे , उत्कृष्ट गोलंदाज आकाश शेडगे , उत्कृष्ट फलंदाज राहुल काशितकर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण संदेश कदम यांना मिळाले. खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख कृष्णा कदम , उद्योजक निलेश कोळसकर, सह संपर्क प्रमुख कृष्णा कदम , नगरसेवक शिवराज पार्टे, अध्यक्ष विकास उतेकर , गणेश मालुसरे , संभाजी पार्टे, किशोर शिंदे उपस्थित असल्याचे आयोजक कार्याध्यक्ष नामदेव पार्टे यांनी सांगितले.

## कानपूर टेस्टच्या पहिल्या दिवशी बांगलादेश 3 बाद 107

### पावसामुळे 35 षटकेच टाकली गेली



वृत्तसंस्था
■ कानपुर

भारताविरुद्ध खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवशी बांगलादेशने 3 विकेट गमावून 107 धावा केल्या आहेत. शुक्रवारी सामन्याच्या पहिल्या दिवशी कानपूरमध्ये मुसळधार पावसामुळे स्टंप लवकर करण्यात आले. आज केवळ 35 षटके खेळता आली.

दुसऱ्या सत्रात खराब प्रकाशामुळे खेळ थांबवण्यात आला. त्यानंतर काही वेळाने पाऊसही सुरू झाला. यानंतर स्टंप्स करण्यात आले. मोमिनुल हक 40 आणि मुशफिकर रहीम 6 धावांवर नाबाद आहे.

दोन सामन्यांच्या मालिकेत भारत 1-0 ने आघाडीवर आहे. दुसरा सामना कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमवर खेळला जात आहे. टीम इंडियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. बांगलादेशचा कर्णधार नझमुल हसन शांतो 31 धावा करून बाद झाला. त्याला रविचंद्रन अश्विनने एलबीडब्ल्यू केले. त्याने पन्नासची भागीदारी तोडली. तत्पूर्वी आकाश दीपने शादमान इस्लाम (24 धावा) आणि झाकीर हसन (0) यांना बाद केले.

***दोन्ही देशांचे अंतिम संघ***

***भारत:*** *रोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, विराट कोहली, केएल राहुल, ऋषभ पंत, रवींद्र जडेजा, रविचंद्रन अश्विन, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज आणि जसप्रीत बुमराह.*

***बांगलादेश:*** *नजमुल हसन शांतो (कर्णधार) , शादमान इस्लाम, झाकीर हसन, मोमिनुल हक, मुशफिकुर रहीम, शकीब अल हसन, लिटन दास (विकेटकीपर), मेहदी हसन मिराज, तैजुल इस्लाम, हसन महमूद आणि खालिद अहमद.*

### बांग्लादेशी चाहत्यांने केला मारहाणीचा आरोप



*लंच ब्रेक होण्यापूर्वी कानपूर स्टेडियममध्ये मोठी घटना घडली. बांगलादेशी क्रिकेट चाहत्याला प्रेक्षक गॅलरीत मारहाण केल्याचा आरोप त्याने केला आहे. त्यानंतर वैद्यकीय सुविधा देण्यात आल्या. मात्र या घटनेचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.बांगलादेशचा हा चाहता स्वत:ला 'सुपर फॅन रॉबी' म्हणतो. घटनेच्या वेळी त्याने वाघाचा पोशाख परिधान केला होता आणि तो स्टँड सीच्या बाल्कनीत बसला होता. उत्तर प्रदेश क्रिकेट असोसिएशनच्या (यूपीसीए) अधिकाऱ्याने सांगितले की, रॉबी घटनांचा नेमका क्रम सांगू शकला नाही, पण त्याला खूप वेदना होत होत्या. माध्यमांशी बोलताना त्याने एका भांडणात कोणीतरी पोटात मुक्का मारल्याचे संकेत दिले. 'सुपरफॅन रॉबी' ने सांगितले की सुमारे १५ लोकांच्या जमावाने त्याच्यावर क्रूरपणे हल्ला केला. मात्र, यूपी पोलिसांनी रॉबीचा दावा फेटाळून लावला. तो डीहायड्रेशनमुळे तो बेशुद्ध झाल्याचे यूपी पोलिसांचे म्हणणे आहे, त्याच्यावर कोणीही हल्ला केलेला नाही. रॉबीच्या म्हणण्यानुसार ही घटना लंच ब्रेकच्या आधी घडली.*

## लालडोंगर नाल्यातील कचरा स्वच्छता व नाल्यावरील पायवाट दुरुस्तीकडे पालिकेचा कानाडोळा

### माजी नगरसेवक कप्तान मलिक यांचा मनपाकडे पाठपुरावा



प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिका एम, पश्चिम चेंबूर च्या हद्दीतील सुमन नगर, लालडोंगर येथील नाल्यातील कचरा स्वच्छ करून नाल्यावरील पायवाट दुरुस्त करण्याची मागणी माजी नगरसेवक कप्तान मलिक यांनी दिनांक 9 ऑगस्ट 2024 रोजी केली असताना या समस्या विषयी पालिकाकडून कानाडोळा केला जात असल्याने मोठी घटना घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मनपा सहाय्यक आयुक्त एम/पश्चिम चेंबूर यांना माजी नगरसेवक कप्तान मलिक यांनी गेल्या महिन्यात निवेदन पत्राद्वारे मागणी केली होती की सुमन नगर, लालडोंगर येथील नाल्यात पडलेले झाडांची फांदी व कचरा उचलणे, शाळेकरी विद्यार्थी, नागरिक शिवसृष्टी गणेश मंदिराच्या पाठीमागील पायवाट मध्ये ये जा करत असतात या ठिकाणी नाल्यावरील रॅलिंगची दुर अवस्था झाल्याने शाळेकरी विद्यार्थी, पालक, स्थानिक नागरिकांचा तोल जाऊन नाल्यात पडण्याची शक्यता नाकारता येत नाही, तरी उपरोक्त विषयावर संबधित आधिकारी यांनी ही समस्या काळजीपूर्वक दखल घेऊन कृती करावी मात्र अद्याप कोणतीच प्रक्रिया होत नसल्याने माजी नगरसेवक कप्तान मलिक यांच्या लेखी निवेदनाकडे बृहन्मुंबई महानगर पालिकेचा कानाडोळा करतय का प्रश्न उपस्थित झाला आहे. सहाय्यक आयुक्त एम/ पश्चिम चेंबूर विभाग यांना शिवसृष्टी गणपती मंदिराच्या पाठीमागील नाल्यात पडलेले झाडांच्या फांद्या व कचरा उचलण्याबाबत तसेच नाल्यावरील पायवाट डागडुजी करण्याबाबत लेखी निवेदन देऊन सुद्धा बृहन्मुंबई महानगर पालिकेचा कानाडोळा होत असल्याने येथील रहिवाशीयांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

## आज सिनियर, सब-ज्युनिअर ज्युनिअर, मास्टर्स पुरुष व महिला बेंचप्रेस पॉवरलिफ्टिंग निवड चाचणी



■ मुंबई

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य सिनियर,सब ज्युनीयर, ज्यनिअर मास्टर्स, पुरुष,महिला गटाची पॉवरलिफ्टिंग निवड चाचणी स्पर्धा दिनांक २८ ते २९ सप्टेंबर २०२४ रोजी * *नागरिक सहाय्य केंद्र संचालित ज्ञानेश्वर विद्यालय, रफि किडवाई मार्ग वडाळा मुंबई ४०००३१ या ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. या राज्य स्पर्धेतून १४ ते १८ ऑक्टोंबर २०२४ या कालावधीत गोवा या ठिकाणी होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठीचा महाराष्ट्राचा संघ निवडण्यात येणार आहे.

स्पर्धेची प्रवेशिका maharashtrapowerlifting 2020@gmail.com या ईमेलवर पाठवावी. लिखित स्वरूपात स्पर्धेच्या बैठकी दरम्यान संजय सरदेसाई यांच्याकडे सुपूर्द करावी. या स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी स्पर्धा संचालक - सूर्यकांत गर्दे-९८६९७३६७११ , प्रशांत सरदेसाई-९८२०३७०४९७ , जितेंद्र यादव -९८१९५९३५९० यांच्याशी संपर्क करावा.

## बेस्ट उपक्रमातील विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी सुहास सामंत यांनी केली तातडीची बैठक घेण्याची विनंती

प्रतिनिधी
■ मुंबई

आशिया खंडात नावाजलेली आणि मुंबई मध्ये जनतेला अहोरात्र सेवा देणारी बेस्ट आज बंद होण्याच्या मार्गावर आहे. त्यासंदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी तातडीची बैठक घेऊन तारीख व वेळ कळवावी अशी विनंती बेस्ट समितीचे माझी जेष्ठ सदस्य व बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांना पत्राद्वारे केली आहे.

बेस्ट मध्ये स्वमालकीचा ३३३७ बस ताफा घेण्यात यावा., बेस्ट मध्ये खाजगीकरण बंद करून सर्वच विभागात कायमस्वरुपी कामगार भरती करवी,. बेस्ट मधून निवृत कामगार वर्गाची देणी तत्काळ देण्यात यावी.सदर विषय अतिशय महत्वाचे असून आपण याकडे लक्ष घालून आम्हाला बैठकीसाठी तत्काळ वेळ द्यावी, अशी विनंती केली आहे.

सद्या बेस्टची अवस्था अतिशय खराब असून यावर तोडगा काढणे ही आपली आणि सरकारची जबाबदारी आहे. आपण याकडे लक्ष दिले नाही तर आम्ही मुंबई मध्ये सर्व जनतेला घेऊन. जनआंदोलन करू व महापालिकेवर मोर्चा काढू असा इशाराही भूषण गगराणी यांना सुहास सामंत यांनी दिला आहे.



*__मुंबई :__ करुणाकर एस. शेट्टी यांचा मुलगा अक्षन के. शेट्टी याने नुकत्याच नायजेरिया येथे झालेल्या लागोस आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत रौप्य पदक आणि पोलंडमधील पोलिश आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कांस्य पदक जिंकले आहे. माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी त्यांचा सत्कार करून भविष्यातील स्पर्धांसाठी त्याला आशीर्वाद दिले.*

## कुर्ल्यात खा. डॉ. श्रीकांत शिंदे ह्यांच्या जनसंवाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

### कुर्ला व कालिना विधानसभा क्षेत्रातील शिवसैनिकांशी जनसंवाद साधला




प्रतिनिधी
■ मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव खासदार डॉ. श्रीकांत शिंदे ह्यांनी मुंबई मध्ये जनसंवाद दौरा सुरु केला असून या दौरात ठीक ठिकाणी जनसंवाद कार्यक्रम आयोजित करून शिवसैनिकांमध्ये उत्साह वाढवण्याचे कार्य केले जात आहे. कुर्ला नेहरू नगर विधानसभा क्षेत्रातील शिवसेना आमदार मंगेश कुडाळकर यांच्या मतदार संघात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे ह्यांचा जनसंवाद दौरा संपन्न झाला.

या दोऱ्यात दिनांक २३ सप्टेंबर श्रीकांत एकनाथ शिंदे ह्यांनी यावेळी आमदार मंगेश कुडाळकर यांच्यासह आमदार मनीषा कायंदे, शिवसेना सचिव, प्रवक्ते किरण पावसकर , प्रवक्ते संजय निरुपम , प्रवक्त्या शीतल म्हात्रे, माजी खासदार राहुल शेवाळे, नेत्या मीनाताई कांबळी, उपनेत्या कला शिंदे , युवासेना सरचिटणीस अमेय घोले यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी उपस्थित होते. या जनसंवाद दौऱ्यातील बैठकीत खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे ह्यांनी आगामी निवडणुकीसाठी सविस्तर चर्चा करून मोलाचं मार्गदर्शन केले.

## प्रणव दिलीप लांडे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा



प्रतिनिधी
■ मुंबई

चांदिवली विधानसभा क्षेत्रातील शिवसेना आमदार दिलीप लांडे यांचे थोरले चिरंजीव प्रणव लांडे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा करण्यात आला. कुर्ला काजूपाडा येथील शिवाजी मैदान येथे प्रणव दिलीप लांडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा आणि आशीर्वाद देण्यासाठी चांदिवलीतील वाल्मिकी समाजाच्या माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या दरम्यान वाल्मिकी समाजाच्या शेकडो महिलांना प्रणव लांडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने साडी वाटप करण्यात आले. या प्रसंगी वाल्मिकी समाजाच्या वतीने आमदार दिलीप लांडे यांना भगवान वाल्मिकी चे फोटो भेट देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी आमदार दिलीप लांडे यांनी चांदिवली विभागातील वाल्मिकी समाजाच्या पाठीशी उभे राहून वस्ती सुधाण्याचे कार्य करत असल्याचे सांगितले.


## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

### निविदा सुचना

कार्यकारी अभियंता ब-१ विभाग, मुं. इ.दु. व पु. मंडळ, रुम नं. १०१, १ला मजला, इ.क्र. ५७-५९बी, दादरकर कंपाऊंड, ताडदेव, मुंबई-३४ यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या इमारतीच्या दुरूस्ती कामाकरीता म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग/ कें. सा.बां.वि./ रेल्वे/ बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रु. | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रु. (५०% सुर्वातीस व ५०% चालू देवकातून) | कोऱ्या निविदेची रक्कम (विना परतावा रु. १८% GST सह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ८. | ९. | १०. | |
| १. | इमारत क्र. ३५-४१ भंडारी स्ट्रिट [आमदार निधी] | २,२४,९९५/- | २५००/- | ५०००/- | २३६/- | ०१.१०.२०२४ ते ०७.१०.२०२४ सकाळी १० ते दु. १.०० वाजेपर्यंत | ०७.१०.२०२४ ते सकाळी १० ते १०.१०.२०२४ दु. १.०० वाजेपर्यंत | १२ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| २. | इमारत क्र. ५-७ सय्यद मुकरी स्ट्रिट ( आमदार निधी) | २,२५,३७०/- | २५००/- | ५०००/- | २३६/- | | | १२ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| ३. | इमारत क्र. ४७-४९ जंजीकर स्ट्रिट [ आमदार निधी] | २,२५,५००/- | २५००/- | ५०००/- | २३६/- | | | १२ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| ४. | इमारत क्र. १७-१९-२१ सय्यद मुकरी स्ट्रिट. [ आमदार निधी] | २,२५,२४५/- | २५००/- | ५०००/- | २३६/- | | | १२ महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| ५. | इमारत क्र. २५८-२६२ सॅम्युअल स्ट्रिट [ आमदार निधी] | ३,७८, ९०६/- | ४०००/- | ८०००/- | ५९०/- | | | १२ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ६. | इमारत क्र. ४२-४८ रघुनाथ महाराज स्ट्रिट [ मंडळ] | ८,७४,४८१/- | ९०००/- | १८०००/- | ५९०/- | | | १२ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ७. | इमारत क्र. ३९-४३ अब्दुल रेहमान मंडळ] २रा वेळी | ९,४४,५३९/- | ९५००/- | १९०००/- | ५९०/- | | | १२ महिने | वर्ग ७ व त्यावरील |

१. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युन्तम देकर सादर करणा-यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम निविदा उघल्याचा दिनांकापासून ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय नूनतम देकाराच्या निविदाकास लेखी विचारणा करुन त्यानी प्रथम न्यूनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मूंजर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सुचना पहावी.
२. कोऱ्या निविदा म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग/ कें.सा.बां.वि./ रेल्वे/ बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
३. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी/ निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नांव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
४. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे
५. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं. इ. दु. व पु. मंडळ यांच्या नांवावर द्यावी.
६. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता ब-१ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, रुम नं. १०१, १ला मजला, इ.क्र. ५७-५९बी, दादरकर कंपाऊंड, ताडदेव, मुंबई-३४, यांचेकडून रकाना क्र. ६ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ८ प्रमाणे स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा दि.२३.०७.२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता कार्यकारी अभियंता ब-१ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
७. संयुक्तबोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
८. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत येत आहे.
९. निविदा स्विकृती दिनांकाच्या शेवटच्या दिवसापासून ३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीपर्यंत कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राहय असले पाहिजे अन्यथा त्या कंत्राटदाराचा विचार केला जाणार नाही.
१०. भाडेकरू / रहिवाशी यांनी ना हरकत प्रमाणपत्राव्दारे संरचनात्मक दुरूस्तीसाठी किंवा पुर्नविकासाठी प्रस्ताव दाखल केल्यास, ठेकेदारास जरी देकारपत्र / आदेश देण्यात आले असतील तरी कुठल्याही नुकसानीबददल हक्क किंवा दावा ग्राहय धरण्यात येणार नाही.
११. मागविण्यात आलेली निविदा एसएसआरवर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अदायगी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल.
१२. जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

CPRO/A/792

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us: @mhadaofficial

सही/-
राहुल रविंद्र पाटिल
कार्यकारी अभियंता व १ विभाग,
मु. इ. दु.पु. मंडळ, मुंबई



## बृहन्मुंबई महानगरपालिका

### (जल अभियंता विभाग)
### ई-निविदा सूचना

| | |
|---|---|
| निविदा कागदपत्रे क्र. | २०२४_एमसीजीएम_१०८७०३७_१ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | ए. ई. (देखभाल) डब्ल्यू. डब्ल्यू. प ऊ दक्षिण विभागा अंतर्गत विविध अनुभागाकरिता रोबस्ट शिलविंग सिस्टीमचा पुरवठा आणि बसविणे. |
| छाननी शुल्क | रु. ३,८९४/- (रु.३,३००/-+१८% जीएसटी किंवा लागू असलेले जीएसटी) |
| ई-निविदा मूल्य (अंदाजे मूल्य) | नग दर निविदा |
| बोली सुरक्षा ठेव/ इरठे | रु. १९,०००/- रुपये १९,०००/- बोली दारांनी पूर्ण ईरठेचा भरणा यूआरएल http://mahatender.gov.in. वरील जीओएमच्या पेमेंट गेटवे द्वारे करायचा आहे. ऑनलाईन भरणा केलेल्या ईरठेची स्कॅन केलेली प्रत लिफाफा ए मध्ये बोली सादर करताना अपलोड करावी. स्वीकृती योग्य बोली सुरक्षा नसलेल्या कोणत्याही नियोकत्याद्वारे प्रतीसाद नसल्याचे समजून नाकारण्यात येतील. |
| निविदेचे वितरण आणि विक्रीचा दिनांक | २७/०९/२०२४ रोजी ११.०० वा. पासून |
| निविदेच्या विक्रीसाठी शेवटचा दिनांक आणि वेळ आणि बोली सुरक्षा ठेव स्वीकृती | ११/१०/२०२४ रोजी १६.०० वा. पर्यंत |
| लिफाफा ए, बी आणि सी चे सादरीकरण (ऑन लाईन) | ११/१०/२०२४ रोजी १६:०० वा. पर्यत |
| पूर्व बोली बैठक | लागू नाही |
| लिफाफा ए उघडणे | १४/१०/२०२४ रोजी १६.०१ वा.पासून |
| लिफाफा बी उघडणे | १४/१०/२०२४ रोजी १६.०५ वा. पासून |
| लिफाफा सी उघडणे | २१/१०/२०२४ रोजी १५.०० वा. पासून |
| संकेतस्थळ | http://portal.mcgm.gov.in – https:// mahatenders .gov. in |
| पत्रव्यहरासाठी पत्ता: | सहाय्यक अभियंता (देखभाल) जल कार्ये पऊ एस, कॅप्टन विनायक गोरे फ्लायओव्हर ब्रिजखाली, दादाभाई पथ, विलेपार्ले (पश्चिम) मुंबई ४०००५६ |
| बोली उघडण्याचे ठिकाण: | सहाय्यक अभियंता (देखभाल) जल कार्ये पऊ दक्षिण ह्यांच्या कार्यालयामध्ये ऑन लाईन |

निविदा कागदपत्रे हस्तांतरीत करता येणार नाहीत.
बृमनपा कोणतेही कारण न देता कोणताही अर्ज स्विकारण्याचे किंवा कोणताही किंवा सर्व स्विकारलेला अर्ज नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

पीआरओ/१४२९/जाही/२०२४-२५

गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.

सही/-
उप जल अभियंता
(देखभाल)

## अमेरिकेत हेलेन चक्रीवादळ, ताशी 225 किमी वेगवान वारे

**लंडन :** अमेरिकेत हेलेन चक्रीवादळ अत्यंत धोकादायक पातळीवर पोहोचले आहे. यामुळे आतापर्यंत 4 जणांचा मृत्यू झाला आहे. सीएनएनच्या वृत्तानुसार, हेलनने गुरुवारी फ्लोरिडामध्ये प्रवेश केला. या काळात ताशी 225 किमी वेगाने वारे वाहत होते. वादळामुळे फ्लोरिडा आणि आसपासच्या जॉर्जिया, नॉर्थ कॅरोलिना, दक्षिण कॅरोलिना, व्हर्जिनिया आणि अलाबामा या राज्यांमध्ये आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे. सुमारे 1 कोटी 20 लाख लोकांना याचा फटका बसला आहे. वादळ इतर राज्यांमध्ये पसरण्याची शक्यता असून, 5 कोटी लोकांना याचा फटका बसणार आहे. वादळामुळे 1000 हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. याशिवाय 4 हजारांहून अधिक उड्डाणांना विलंब झाला आहे.



# कट करून हसीनांना हटवले:मोहम्मद युनूस यांची कबुली

## विद्यार्थी नेत्यांनी नियोजन करून आंदोलन सुरू केले,

**वृत्तसंस्था**
**ढाका**

बांगलादेशचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी शेख हसीना यांना सत्तेवरून हटवण्याचा कट रचल्याचे मान्य केले आहे. अमेरिकेतील क्लिंटन ग्लोबल इनिशिएटिव्हच्या सभेला संबोधित करताना युनूस यांनी बांगलादेशातील विद्यार्थी नेत्यांचे कौतुक केले. ते म्हणाले की, ते बांगलादेशचे नवीन रूप तयार करत आहेत.

सभेला संबोधित करताना युनूस म्हणाले, "हे निदर्शन अत्यंत सुनियोजित आंदोलन होते, ज्यामध्ये एकाही व्यक्तीला नेता बनवून अटक



करण्यात आली नव्हती. यामुळे संपूर्ण देशातील तरुणांना प्रेरणा मिळाली आणि ही चळवळ आणखीनच ताकदवान झाली."

यानंतर युनूस यांनी आपला सहाय्यक महफूज आलम यांची भेटीत ओळख करून दिली आणि याला आपण दोघे जबाबदार असल्याचे सांगितले. ढाका ट्रिब्यूनच्या वृत्तानुसार, मुख्य सल्लागार म्हणाले की, जर तुम्ही या विद्यार्थी नेत्यांचे चेहरे पाहिले तर ते सामान्य तरुणांसारखे दिसतील. पण जेव्हा ते बोलू लागतात तेव्हा तुम्ही थरथरता. त्यांनी आपल्या भाषणाने आणि समर्पणाने संपूर्ण देशाला हादरवून सोडले.

युनूस म्हणाले, माझा सहाय्यक महफूज या चळवळीमागील मेंदू युनूस म्हणाले, "या संपूर्ण आंदोलनामागे महफूजचा मेंदू होता. जरी तो सतत हे नाकारत असतो, पण त्यामुळेच त्याला ओळख मिळाली. ही चळवळ अचानक सुरू झालेली नाही. या चळवळीचे नेतृत्वही पूर्ण तयारीनिशी करण्यात आले होते." या अंतर्गत, हा नेता कोण होता हे कोणालाही माहिती नाही. यानंतर युनूस यांनी सर्व विद्यार्थी नेत्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. रिपोर्टनुसार, मुख्य सल्लागाराने शेख हसीना यांच्या सरकारच्या काळात विद्यार्थी नेत्यांवर झालेल्या हल्ल्यांचाही उल्लेख केला आहे. गोळीबार होऊनही हे नेते पूर्ण शौर्याने उभे राहिले, असे ते म्हणाले. युनूस यांच्या भाषणादरम्यान अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन त्यांच्या शेजारी उपस्थित होते.

शेख हसीना यांनी ५ ऑगस्ट रोजी राजीनामा दिला होता बांगलादेशातील हिंसाचारानंतर माजी पंतप्रधान शेख हसीना ५ ऑगस्ट रोजी भारतात आल्या होत्या. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. 22 ऑगस्ट रोजी अंतरिम सरकारने हसीना आणि त्यांच्या कुटुंबीयांचे डिप्लोमॅटिक पासपोर्टही रद्द केले होते.

यानंतर 8 ऑगस्ट रोजी बांगलादेशमध्ये अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले. नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनूस यांना या सरकारचे मुख्य सल्लागार करण्यात आले. शेख हसीना ५ ऑगस्टच्या संध्याकाळी बहिणीसह ढाक्याहून गाझियाबादच्या हिंडन एअरबेसवर पोहोचल्या होत्या.

## भाजपा आमदाराने विधानसभेत बलात्कार केला, हनीट्रॅपसाठी दबाव टाकला

## पीडितेचा धक्कादायक आरोप, न्यायालयानं सुनावली कोठडी

**वृत्तसंस्था**
**कोची**

कर्नाटकमधील भाजपाचे आमदार एन. मुनिरत्न नायडू यांनी वारंवार बलात्कार करून हनीट्रॅप करण्यासाठी बळजबरी केल्याचा आरोप एका महिलेने केला असल्याची बातमी पीटीआयने दिली आहे. या महिलेने तक्रार दाखल केली असून त्यात दावा केला की, आमदारांनी विविध ठिकाणी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. कर्नाटक विधानसभेची इमारत आणि सरकारी वाहनात अनेकवेळा बलात्कार झाला असल्याचा दावा पीडित महिलेने केला. तसेच ही घटना उघड केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकीही आमदारांनी दिली होती, असेही पीडित महिलेने सांगितले आहे.

पीडितेने दावा केला की, मुनिरत्न यांनी २०२० ते २०२३ या काळात तसेच ते मंत्री असताना ऑगस्ट २०२१ ते मे २०२३ या काळातही वारंवार बलात्कार केला. यानंतर मागच्या शनिवारी (१४ सप्टेंबर) विशेष न्यायालयाने मुनिरत्न नायडू यांना बलात्कार, लैंगिक अत्याचार आणि गुन्हेगारी कारवाई या गुन्ह्यासाठी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. यानंतर पोलिसांनी त्यांची रवानगी परप्पाना अग्रहारा येथील मध्यवर्ती कारागृहात केली. काग्गलीपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोडणाऱ्या एका



खासगी रिसॉर्टमध्ये बलात्काराची घटना घडल्यानंतर ४० वर्षीय महिलेच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच आमदारांसह आणखी सहा जणांवर गुन्हा दाखल झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान आमदार मुनिरत्न यांनी त्यांच्यावर झालेले आरोप फेटाळले आहेत. सदर आरोप झाल्यानंतर काँग्रेसतर्फे विधानसभा इमारतीचे शुद्धिकरण करण्यात येणार होते. पण पोलिसांनी काँग्रेस नेते मनोहर यांना ताब्यात घेऊन हे आंदोलन होऊ दिले नाही, अशी बातमी इंग्रजी दैनिकाने दिली आहे.

पीडित महिलेने असाही दावा केला आहे की, आमदारांनी त्यांना विविध खासगी रिसॉर्टमध्ये हनीट्रॅप करण्यासाठी बळजबरी केली. जर मी हे काम केले नाही, तर मला ठार केले जाईल, अशी धमकी त्यांनी दिली होती. या कामात आमदारांचे बॉडीगार्ड आणि त्यांचे सहकारीही गुंतले असल्याचा आरोप पीडितेने केला आहे.

पान १ वरुन

### पंतप्रधान ज्याच्यावर घोटाळ्याचा आरोप करतात त्यालाच उपमुख्यमंत्री करतात!

केजरीवाल यांनी पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल केला. मोदींच्या सरकारमधील भ्रष्ट नेत्यांचा पाढाच केजरीवाल यांनी वाचला. हिमंता बिस्वा सरमा, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल, प्रताप सरनाईक, हसन मुश्रीफ, यशवंत जाधव, संजय सेठ, के गीता, कृपा शंकर सिंह, अशोक चौहान, नवीन जिंदाल, तपस रे, अर्चना पाटील, गीता कोडा, बाबा सिद्दीकी, ज्योती मिंडा, सुझाना चौधरी अशी भाजपच्या गोटातील मंत्र्यांची यादीच केजरीवाल यांनी जाहीर केली.

### सिनेट निवडणुकीत युवासेनेकडून 'अभाविप'चा धुव्वा

नवी मुंबईत सिनेट निवडणुकीदरम्यान पकडल्या गेलेल्या बोगस पोलिंग एजंट प्रकरणी अभाविपने हायकोर्टात धाव घेतली होती. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या युवासेनेचा उमेदवार अल्पेश भोयर याला अपात्र ठरवत त्याला पडलेली मतं रद्द करण्याची याचिकेतून मागणी करण्यात आली होती. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात सिनेट निवडणुकीच्या आधी युवासेनेचे उमेदवार अल्पेश भोईर यांच्या अधिकृत पोलिंग एजंट ऐवजी भलतीच व्यक्ती उपस्थित राहिल्याचा अभाविपचा आरोप होता. भोईर यांचा पोलिंग एजंट स्वप्नील सरवदे होता. मात्र उपविधानसभेचे ऐरोली युवासेना प्रमुख स्वप्नील मढवी तिथं हजर होते. त्यामुळे अल्पेश भोईर यांना मिळालेली मतं ग्राह्य धरली जाऊ नयेत अशी हायकोर्टाकडे मागणी करण्यात आली होती.

### काजू बोंडूपासून सोडा निर्मितीचे तंत्रज्ञान

करण्यात आले आहे. काजू सोडा निर्मितीसाठी विद्यापीठाने शिफारसीत केलेल्या पध्दतीप्रमाणे काजू बोंडूपासून सिरप तयार करून ४० मिली सिरप आणि १६० मिली कार्बोनेटेड थंड पाणी ८० PSI दाबाने कार्बोनेशन करण्याची शिफारस केलेली आहे. या पध्दतीने काजू बोंडूपासून विकसित केलेला काजू सोडा ९० दिवसांच्या कालावधीपर्यंत सुस्थितीत राहतो. शीतगृहात साठवणूक केल्यास तो अधिक दिवस टिकू शकतो. सदर तंत्रज्ञानामुळे काजू बोंडूचे मुल्यवर्धन होवून त्याला व्यवसायिक महत्व प्राप्त होईल.

### महिला पोलिसाला पोलीस ठाण्यातच ठार मारण्याचा प्रयत्न

हवालदार बंबाळे यांना काही कळण्याच्या आत त्याच्या जवळील धारदार पातेने बंबाळे यांच्या हात, गाल, मानेवर, कपाळावर वार करून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. बंबाळे यांनी ओरडा केल्यानंतर सहकारी धावत येऊन त्यांनी दरवाजा उघडून हल्लेखोर बाबासाहेबाला पकडले. त्याच्या हातामधील धारदार पात पहिले काढून घेण्यात आली.

# शाळेसाठी दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा बळी

## हाथरसमधील खळबळजनक घटना

**वृत्तसंस्था**
**हाथरस**

उत्तर प्रदेशच्या हाथरस येथे एक धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमध्ये शाळेची प्रगती व्हावी यासाठी शाळेतील संचालकाने आणि त्याच्या वडिलांनी एकत्र येत एका विद्यार्थ्याचा बळी दिला आहे. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे संपूर्ण गावात भीतीचं वातावरण पसरलं आहे. सध्या या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कृतार्थ असं हत्या झालेल्या विद्यार्थ्याचं नाव असून तो इयत्ता दुसरीमध्ये शिकत होता. तो शाळेत असलेल्या हॉस्टेलमध्येच



रहायचा. गेल्या आठवड्यात येथेच त्याची हत्या करण्यात आली. हत्या झाल्याची माहिती मिळताच त्याच्या कुटुंबियांनी घटनास्थळी धाव घेतली.

कुटुंबिय मुलाच्या शाळेत पोहचताच येथील संचालकाने कृतार्थचं शव गाडीत भरून तेथून पळ काढला. अंधश्रद्धेमधून या विद्यार्थ्याचा बळी गेला आहे. शाळा संचालक आणि त्याच्या वडिलांना इयत्त दुसरीच्या काही विद्यार्थ्यांचा बळी द्यायचा होता. पोलिसांनी आरोपींना अटक केल्याने त्यांचा हा सर्व प्लान फ्लॉप झाला आहे.

दरम्यान, २२ सप्टेंबर रोजी ही घटना घडली आहे. घटनेत आतापर्यंत पोलिसांनी या प्रकरणात ५ जणांना अटक केलीये. तसेच शाळेच्या परिसरातून पोलिसांनी तंत्रमंत्रासाठी वापरलं जाणारं सामान सुद्धा जप्त केलं आहे. संचालकाने शाळेच्या प्रगतीसाठी कर्ज घेतलं होतं. कर्ज घेऊन आणि बळी दिल्याने आपली आणि शाळेची प्रगती होईल असा समज त्याच्या मनात होता.

मुलाचा बळी देण्याआधीच मृत्यू झाला. शाळेतून त्याला बाहेर घेऊन जाताना अर्ध्या रस्त्यात त्याला जाग आली होती. जाग येताच त्याने स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी धडपड केली. यामध्ये नराधमांनी त्याचा गळा आवळला आणि त्यामुळे या दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला.

# केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह यांना जीवे मारण्याची धमकी

## पाकिस्तानातून आला व्हॉट्सअॅप कॉल

**वृत्तसंस्था**
**बेगुसराय**

बेगुसरायचे भाजप खासदार आणि केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. गिरीराज सिंह यांचे खासदार प्रतिनिधी असलेले अमरेंद्र कुमार अमर यांच्या मोबाईलवर व्हॉट्सअॅप कॉल करून ही धमकी देण्यात आली.

पाकिस्तानमधून व्हॉट्सअॅप कॉल करून गिरीराज सिंह आणि मला शिवीगाळ करण्यात आली. तसेच, गंभीर परिणाम भोगण्याची धमकी देण्यात आली, असे अमरेंद्र कुमार अमर यांनी सांगितले. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. बेगुसराय मुख्यालयाचे डीएसपी म्हणाले की, वकील आणि खासदार प्रतिनिधी अमरेंद्र कुमार अमर यांनी व्हॉट्सअॅपवर शहर पोलिस स्टेशनला एक अर्ज दिला आहे. यामध्ये म्हटले आहे की, त्यांच्या फोनवर पाकिस्तानमधून व्हॉट्सअॅप कॉल आला होता.

## "आधी धर्म सांगा मग तिरुपतीचं दर्शन घ्या", माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी तिरुपती दर्शनाचा बेतच रद्द केला

**बंगळुरु**

तिरुपती बालाजी मंदिरातील लाडू प्रसादात प्राण्यांची चरबी आढळल्याप्रकरणी आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी चौकशीच्या फेऱ्यात अडकले आहेत. तसंच, सत्ताधाऱ्यांकडून ते टीकेचे धनी बनले आहेत. चोहोबाजूने त्यांच्यावर टीका होत असताना जगन मोहन रेड्डी यांनी २८ सप्टेंबर रोजी तिरुपती येथील भगवान व्यंकटेश्वर मंदिरात जाण्याचे नियोजन केले होते. परंतु, सत्ताधारी पक्षाने त्यांच्याविरोधात निदर्शने केली. तर पोलिसांनीही त्यांना नोटीस बजावली. अखेर त्यांनी मंदिरात जाण्याचे नियोजन आता रद्द केले आहे. जगन मोहन रेड्डी यांनी मंदिरात जाण्यापूर्वी त्यांचा धर्म जाहीर करावा, अशी मागणी भाजपाकडून करण्यात येत होती. या मागणीला जोर आल्याने जगन मोहन रेड्डी यांनी हा दौराच रद्द केला. "आंध्र प्रदेश रेव्हेन्यू एंडोमेंट्स, नियम १६ आणि TTD जनरल रेग्युलेशन नियम १३६ नुसार गैर-हिंदूंनी दर्शनापूर्वी वैकुंटम रांग संकुलात धर्माबाबत घोषणा सादर करणे आवश्यक आहे", असं आंध्र प्रदेश भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दग्गुबती पुरंदेश्वरी यांनी सांगितले.

# घोषला फाशीची शिक्षा होऊ शकते- CBI कोर्ट

## माजी प्राचार्यांवर पुराव्यांशी छेडछाड केल्याचा आरोप

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

आरजी करचे माजी प्राचार्य संदीप घोष यांना शुक्रवारी (27 सप्टेंबर) विशेष सीबीआय न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने संदीपला जामीन देण्यास नकार दिला. संदीपवर लावण्यात आलेले आरोप गंभीर असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. हे सिद्ध झाल्यास घोषला फाशीची शिक्षा होऊ शकते.

सीबीआयने 9 ऑगस्ट रोजी संदीप घोष आणि



ताला पोलिस ठाण्याचे माजी प्रभारी अभिजित मंडल यांना अटक केली होती. या दोघांवर पुराव्याशी छेडछाड केल्याचा आणि आरजी कर हॉस्पिटलमधील प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्याप्रकरणी एफआयआर नोंदवण्यास विलंब केल्याचा आरोप आहे. संदीप आणि अभिजीतला 30 सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

पोलिस ठाण्यात चुकीच्या पद्धतीने कागदपत्रे तयार करण्यात आली होती कोलकात्याच्या आरजी कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये 9 ऑगस्ट रोजी प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्या प्रकरणाचा तपास करत असलेल्या सीबीआयने नवे खुलासे केले आहेत. एजन्सीने 25 सप्टेंबर रोजी सियालदह न्यायालयात दावा केला होता की, ताला पोलिस ठाण्यातील बलात्कार-हत्या प्रकरणाशी संबंधित काही कागदपत्रे चुकीच्या पद्धतीने तयार करण्यात आली आणि बदलण्यात आली.

## दिल्ली MCD स्थायी समिती निवडणूक, भाजप उमेदवार विजयी

**नवी दिल्ली**

दिल्ली महानगरपालिकेच्या (MCD) स्थायी समितीच्या शेवटच्या रिक्त जागेसाठी शुक्रवारी (27 सप्टेंबर) मतदान झाले. भाजपचे उमेदवार सुंदर सिंह यांना पक्षाच्या नगरसेवकांची सर्व 115 मते मिळाली, तर आपच्या निर्मला कुमारी यांना एकही मत मिळाले नाही. वास्तविक या निवडणुकीत काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने भाग घेतला नव्हता. या विजयासह दिल्ली महापालिकेच्या 18 सदस्यीय स्थायी समितीमध्ये भाजपचे 10 सदस्य झाले आहेत. तर 'आप'चे केवळ आठ सदस्य आहेत. भाजप नेते कमलजीत सेहरावत पश्चिम दिल्लीतून खासदार म्हणून निवडून आल्यानंतर निवडणूक झालेल्या जागा रिक्त झाल्या होत्या. आम आदमी पार्टीने निवडणुकीवर बहिष्कार का टाकला? 26 सप्टेंबर रोजी ही निवडणूक होणार होती. कौन्सिलर एमसीडीमध्ये पोहोचल्यावर त्याचा शोध घेण्यात आला. यानंतर गदारोळ झाला.

## बँक ऑफ बडोदाचे को-ब्रँडेड ट्रॅव्हल डेबिट कार्ड एझमायट्रिपसोबत करार

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील आघाडीच्या बँकांपैकी एक असलेल्या बँक ऑफ बडोदाने भारतातील सर्वात मोठ्या ऑनलाइन ट्रॅव्हल टेक प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या एझमायट्रिपडॉटकॉमच्या च्या सहकार्याने बँक ऑफ बडोदा एझमायट्रिप को-ब्रँडेड ट्रॅव्हल डेबिट कार्डची घोषणा केली आहे.

सदर प्रसंगी बँक ऑफ बडोदाचे कार्यकारी संचालक संजय मुदलियार, एझमायट्रिपचे सह-संस्थापक रिकांत पिट्टी उपस्थित होते. सार्वजनिक क्षेत्रातील बँकेने लाँच केलेले हे पहिले को-ब्रँडेड ट्रॅव्हल डेबिट कार्ड असून सातत्याने देश आणि जगभ्रमंती करणारे पर्यटक तसेच आयुष्य मजेत जगू इच्छिणाऱ्यांसाठी हे डेबिट कार्ड तयार करण्यात आले आहे. प्रवास बुकिंगवर कोणतेही किमान ऑर्डर मूल्य नाही.

**अशा प्रकारचे डेबिट कार्ड देणारी सार्वजनिक क्षेत्रातील पहिली बँक**

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय फ्लाइट बुकिंगवर 10, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय हॉटेल बुकिंगवर 15, बस बुकिंगवर 10 तसेच एअरपोर्ट ट्रान्सफर/आउटस्टेशन कॅब बुकिंगवर 10 टक्के झटपट सूट अशी या डेबिट कार्डची प्रमुख वैशिष्ट्ये आणि फायदे आहेत.

# जम्मु काश्मिरमध्ये दहशतवादाचा खात्मा करणारे भाजपचेच सरकार बहुमताने निवडुन येईल -रामदास आठवले

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने जम्मु काश्मिरमधील कलम 370 हटवुन येथे मोठी क्रांती केली आहे. कलम 370 हटल्यामुळे जम्मु काश्मिरमध्ये विकास होत आहे. उद्योग वाढलेला आहे. त्यामुळे रोजगारही वाढत आहे. मोंदीच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने येथील दहशतवादाचा खात्मा करून लोकशाहीचे नंदनवन जम्मु काश्मिरमध्ये फुलविले आहे. यामुळे जम्मु काश्मिरमधील जनता निवडणुकीमध्ये उत्साहाने भाग घेवुन मतदान करीत आहे. दहशतवादाच्या भीतीवर येथील जनतेने मात केली असून जनता मोठया प्रमाणात लोकशाहीच्या उत्सव असणा-या निवडणुकामध्ये मतदान करीत




आहेत. त्यामुळे दहशतवादावर मात करुन लोकशाही मजबुत करणा-या भाजपलाच जम्मु काश्मिरमधील जनता विधानसभा निवडणुकीत बहुमताने विजयी करेल. जम्मु काश्मिरमध्ये भाजपचेच सरकार बहुमताने येईल असा विश्वास रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज व्यक्त केला.

जम्मु काश्मिरमध्ये रिपब्लिकन पक्षाचे 4 उमेदवार विधानसभा निवडणुक लढत आहेत. आज जम्मु काश्मिरमधील रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी आयोजित प्रचारसाठी ना. रामदास आठवले जम्मु काश्मिरचा दोन दिवसीय दौ-यांवर आले आहेत.

या विधानसभा निवडणुकीत जम्मु काश्मिरच्या विधानसभेत रिपब्लिकन पक्ष आपले खाते उघडणार आहे. रिपब्लिकन पक्ष नोंदणीकृत पक्ष असल्याने काही जागांवर निवडणुक लढणे आवश्यक असल्याने जम्मु काश्मिरमध्ये रिपब्लिकन पक्ष 4 जागांवर ताकदीने निवडणुक लढत आहे. उर्वरित जागांवर रिपब्लिकन पक्षाचा भाजपला जाहीर पाठिंबा आहे. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार विजयी झाल्यास रिपब्लिकन पक्षाचे विजयी उमेदवार हे भाजपलाच सरकार स्थापनेसाठी पाठिंबा देतील अशी ग्वाही रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केली.

जम्मु काश्मिरमध्ये कलम 370 हटल्यामुळे या भागात गुंतवणुक वाढुन रोजगार वाढत आहे. उद्योगधंदे वाढत आहेत. शांतता नांदत आहे. यापुर्वी जम्मु काश्मिरमध्ये दहशतवाद, आतंकवादाने थैमान घातले होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोंदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने जम्मु काश्मिरमध्ये दहशतवादाचा खात्मा करण्याचे काम केले आहे. अजुनही जम्मु काश्मिरमधील दहशतवाद संपवण्यासाठी केंद्र सरकार काम करीत आहे. जम्मु काश्मिर हा भारताचा अविभाज्य घटक आहे. जम्मु काश्मिरला भारतात अन्य राज्यांशी जोडण्याचा ; भारताचा अविभाज्य घटक करण्याचा प्रयत्न येथील पी डी पी ; नॅशनल कॉन्फरन्स आणि काँगेस पक्षांनी फारसे प्रयत्न केलेले नाहीत. मात्र कलम 370 हटवुन जम्मु काश्मिर हा भारताचा अविभाज्य घटक झाला असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सिध्द केले आहे. असे ना.रामदास आठवले म्हणाले.

## हरियाणा काँग्रेसच्या १३ बंडखोर नेत्यांवर कारवाई, ६ वर्षांसाठी पक्षातून हकालपट्टी !

**वृत्तसंस्था**
**भुवनेश्वर**

हरियाणा विधानसभा निवडणुकीमुळे राजकीय वातावरण तापले आहे. या निवडणुकीदरम्यान काँग्रेसने आपल्या १३ बंडखोर नेत्यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. हे सर्व नेते पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवत आहेत. ज्या नेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे, त्यात जिंदमधील प्रदीप गिल आणि कलायतमधील अनिता धुल्ल यांची नावे प्रमुख आहेत.

हरियाणामधील काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष उदयभान यांनी जारी केलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, निलंबित करण्यात आलेले सर्व नेते पक्षाच्या विरोधात काम करत आहेत, त्यामुळे या सर्वांना



पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात येत आहे. पत्रात म्हटले आहे की, या नेत्यांची तक्रार आली होती. त्यानुसार ती योग्य असल्याचे दिसून आले. त्यामुळे या सर्वांची पक्षातून हकालपट्टी केली जात आहे.

अंबाला कँटमधून अधिकृत उमेदवारांविरुद्ध निवडणूक लढवणाऱ्या चित्रा सरवरा यांना काँग्रेसने अलीकडेच निलंबित केले होते. चित्रा यांच्या निलंबनाचा आदेश काँग्रेस संघटनेचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी जारी केला होता. दरम्यान, काँग्रेस आधी बंडखोर नेत्यांची समजूत काढत आहे. मात्र, जे बंडखोर आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

हरियाणा काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, गुहियामधून नरेश धांडे, जिंदमधून प्रदीप गिल, पुंडरीमधून सजन्न ढुल आणि सुनीता बट्टन, निलोखेरीमधून राजीव गोंडर आणि दयाल सिरोही, पानिपत ग्रामीणमधून विजय जैन, उचाना कलांमधून दिलबाग, दादरीमधून अजित फोगाट, भिवानीमधून अभिजीत सिंह, भवानी-खेरामधून सतबीर रतेला, पृथलामधून नीतू मान आणि कलायतमधून अनिता धुल हे पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध लढत आहेत.